CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ५७ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

विनम्र अभिवादन



नरकेसरी बॅरिस्टर मो. वा. अभ्यंकर यांचा आज स्मृतिदिन

## केंद्राची शेतकऱ्यांना नवीन वर्षाची भेट

### पीकविमा योजनेला मुदतवाढ
### खतांवरील सबसिडी कायम राहणार

**नवी दिल्ली, १ जानेवारी**

केंद्र सरकारने शेतकऱ्यांना नवीन वर्षाची मोठी भेट दिली आहे. पंतप्रधान पीकविमा योजना तसेच पुनर्गठित वातावरण आधारित पीक विमा योजना २०२५-२६ पर्यंत सुरू ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. यासाठी ६९,५१५ कोटी ७१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नववर्षाच्या पहिल्या दिवशी बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकऱ्यांना दिलासा देणारे अनेक निर्णय घेण्यात आले. या बैठकीला संरक्षणमंत्री राजथसिंह, भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गृहमंत्री अमित शाह तसेच कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंह चौहान उपस्थित होते. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नंतर एका पत्रपरिषदेत या निर्णयांची माहिती दिली.

१ जानेवारी २०२५ पासून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ५० किलोची डीएपीची बॅग शेतकऱ्यांना १,३५० रुपये या सवलतीच्या दरात उपलब्ध होणार आहे, असे स्पष्ट करीत वैष्णव म्हणाले की, आंतरराष्ट्रीय बाजारात डीएपीचे भाव वाढत असतानाही शेतकऱ्यांवर त्याचा भूर्दंड पडू नये म्हणून ३८५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

डीएपी खतांवर सध्या मिळत असलेल्या न्युट्रिंयट बेस्ड सबसिडीपेक्षा हे अनुदान अतिरिक्त राहणार आहे. यामुळे खतांच्या किमती स्थिर राहण्याला मदत मिळू शकते. २०१० पासून सरकार फॉस्फेट आणि पोटॅशियमयुक्त २८ प्रकारच्या खतांवर हे अनुदान देत आहे. याआधी सरकारने एप्रिल २०२४ पासून डिसेंबर २०२४ पर्यंत डीएपीसाठी २,६२५ कोटी रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर केले होते.

मंत्रिमंडळाची आजची बैठक पूर्णपणे शेतकऱ्यांना समर्पित होती. शेतकरी कल्याणाच्या सर्व मुद्यावर या बैठकीत चर्चा करण्यात आली, याकडे लक्ष वेधत वैष्णव म्हणाले, पंतप्रधान पीकविमा योजनेला मुदतवाढ देणे हा यातील सर्वांत मोठा निर्णय होता. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या जीवनात मोठा बदल झाला आहे, त्यामुळे या योजनेसाठीच्या आर्थिक तरतुदीत भरीव वाढ करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

### दावे निकाली काढण्यासाठी नवीन यंत्रणा

पंतप्रधान पीकविमा योजनेतील दावे लवकरात लवकर निकालात काढण्यासाठी नवीन यंत्रणा तयार करण्यात येणार असून, यासाठी ८०० कोटी रुपयांच्या विशेष निधीची तरतूद करण्यात आली आहे, असे ते म्हणाले. २०१४ ते २०२४ या दहा वर्षांत खतांवरील अनुदानासाठी ११.९ लाख कोटींची तरतूद करण्यात आली होती. २००४ ते २०१४ या काळातील तरतुदीपेक्षा ही दुप्पट होती.

## ११ जहाल नक्षलवाद्यांची शरणागती



जहाल महिला नक्षली तारक्काचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

गडचिरोलीला आता महाराष्ट्रातील पहिल्या जिल्ह्याची ओळख (शेवटच्या पानावर)

### महाराष्ट्र, छत्तीसगडमध्ये होते बक्षीस

**गडचिरोली, १ जानेवारी**

येथील पोलिस मुख्यालयात १ जानेवारीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तारक्का या जहाल महिला नक्षलवाद्यासह ११ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यात ८ महिला आणि ३ पुरुष माओवाद्यांचा समावेश आहे. यातील दोन दाम्पत्य आहेत. या ११ जणांवर महाराष्ट्रात १ कोटींपेक्षा अधिकचे बक्षीस होते. छत्तीसगड सरकारनेसुद्धा त्यांच्यावर बक्षीस जाहीर केले होते.

यात दंडकारण्य झोनल कमिटीच्या प्रमुख आणि भूपतीची पत्नी तारक्काचा समावेश आहे. गडचिरोली पोलिसांसाठी ही बाब अतिशय महत्त्वाची असून फडणवीस यांनी पोलिस प्रशासनाचे कौतुक केले.

तारक्का ही ३८ वर्षांपासून नक्षली चळवळीत होती. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये ३ डिव्हिजन कमिटी मेंबर तर १ उपकमांडर, २ एरिया कमिटी मेंबर आहेत. या सर्वांना पुढचे जीवन जगण्यासाठी ८६ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली.

निवडणूक आचारसंहितेच्या काळात ५ नक्षली ठार झाले. २०२४ या वर्षांत २४ नक्षली ठार झाले आणि १८ माओवाद्यांना अटक करण्यात आली. गेल्या ६ महिन्यांत १६ जहाल नक्षलवादी आणि आज ११ असे २७ जण मुख्य प्रवाहात आले आहेत.

उत्तर गडचिरोली माओवादापासून मुक्त झाली. लवकरच दक्षिण गडचिरोलीसुद्धा होईल. गेल्या ४ वर्षांत एकही युवक किंवा युवती माओवादात सहभागी झाली नाही, ही फार मोठी उपलब्धी असल्याचे फडणवीस म्हणाले. ११ गावांनी नक्षलवाद्यांना बंदी केली आहे. सी-६० च्या जवानांनी जनतेचा विश्वास संपादन केला. आता संविधानविरोधी चळवळीत कुणीही जायला तयार नाही, ही आनंदाची बाब आहे. न्याय मिळायचा असेल तर भारतीय संविधानानेच मिळू शकतो, तो माओवादी विचारसरणीने मिळू शकत नाही, हे जनतेला आता पटले आहे. येत्या काळात गडचिरोलीला पोलाद सिटीचा दर्जा मिळणार, असेही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची अतिशय मोलाची मदत या अभियानात मिळत आहे. आता माओवादांविरोधात लढाईत राज्यांच्या सीमा उरलेल्या नाहीत. महाराष्ट्रानेसुद्धा सीमेबाहेर जाऊन कारवाया केल्या आहेत. शरणागती पत्करलेल्या नक्षल्यांचे संपूर्ण पुनर्वसन करण्यात येईल, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. (वृत्तसंस्था)

### महत्त्वाचे

#### चढ-उतारानंतर झाले 'हॅप्पी न्यू ईयर'

**मुंबई** : देशांतर्गत शेअर बाजारात नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी व्यवहारांची सुरुवात थोड्या वाढीने झाली आणि त्यानंतर जोरदार चढ-उतार पाहायला मिळाले. मात्र, सत्रअखेरीपर्यंत शेअर्स खरेदीमुळे निर्देशांक आणि निफ्टी वाढीसह बंद झाले. म्हणजेच २०२५ ची बाजाराची सुरुवात तेजीने झाली. निर्देशांक ३६८ अंकांनी वाढून ७८,५०७ वर बंद झाला, तर निफ्टी ९८ अंकांनी वधारला होता. निर्देशांकातील मारुती आणि महिंद्रा यांचे शेअर्स सर्वाधिक तेजीत राहिले.

#### महाकुंभात बॉम्बस्फोट घडवण्याची धमकी

**प्रयागराज** : महाकुंभात बॉम्बस्फोटाची धमकी मिळाली आहे. नसर पठाण नावाच्या आयडीवरून 'एक्स'वर धमकी आली होती. तुम्ही सर्व गुन्हेगार आहात. महाकुंभात बॉम्बस्फोट घडवून हजार हिंदूंना मारणार आहे. 'अल्लाह इज ग्रेट', असे यात म्हटले आहे. ३१ डिसेंबर रोजी, विपिन गौर नावाच्या तरुणाने डायल-११२ यूपी पोलिसांना टॅग केली. स्क्रीन शॉटही शेअर केला. यानंतर पोलिस सक्रिय झाले. प्रयागराज पोलिस आयुक्त आणि सुरक्षा यंत्रणांना माहिती पाठवण्यात आली. पोलिस आता पोस्ट करणाऱ्या व्यक्तीचा शोध घेत आहेत. १३ जानेवारीपासून महाकुंभ सुरू होत आहे.

#### सरपंच हत्याप्रकरणात SIT स्थापन; तपासाला वेग

**मुंबई** : बीड जिल्ह्यातील सरपंच हत्याप्रकरणाचा तपास सीआयडीकडे देण्यात आला असून खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडलाही पोलिसांनी अटक केलीआहे. तसेच, न्यायालयाने आरोपी वाल्मिक कराडला १४ दिवसांची पोलीस कोठडी दिली असून संतोष देशमुख हत्याप्रकरणातील फरार आरोपींचाही शोध घेतला जात आहे. आता, राज्य शासनाकडून संतोष देशमुख हत्येप्रकरणी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. आयपीएस अधिकारी बसवराज तेली यांच्या नेतृत्वात ही समिती स्थापन करण्यात आली असून तेली यांच्यासह १0 जणांची टीम या घटनेचा सखोल तपास करणार आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाच्या तपासला वेग येणार आहे. मस्साजोग, ता. केज, जि. बीड येथील सरपंच श्री. संतोष पंडीतराव देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उपरोक्त संदर्भ येथील शासन निर्णयान्वये विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. सदर पथकात पोलीस अधिकारी व अंमलदार यांची नियुक्ती करण्याची बाब शासन विचाराधीन होती, त्यानुसार ही एसआयटी गठित करण्यात आल्याचं गृह विभागाने परिपत्रकातून म्हटलं आहे.

## तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण लवकरच

### प्रक्रियेने घेतला वेग

**वॉशिंग्टन, १ जानेवारी**

मुंबईवरील २६/११ च्या हल्ल्यातील आरोपी तहव्वूर राणाला भारतात आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हे भारताने केलेल्या प्रयत्नांचे मोठे यश मानले जात आहे. अमेरिकी न्यायालयाने तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाला हिरवा झेंडा दाखवला आहे.



भारत-अमेरिकेतील प्रत्यार्पण कराराच्या अंतर्गत तहव्वूर राणाला भारतात पाठवण्यास अमेरिकी न्यायालयाने ऑगस्ट २०२४ मध्ये मंजुरी दिली होती. आता त्याला भारतात आणण्याच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. २६/११ हल्ल्याचा सूत्रधार डेव्हिड कोलमन हेडलीची मदत केल्याचा आरोप तहव्वूर राणावर आहे. हल्ल्यासाठी हेडलीने मुंबईत विविध ठिकाणी रेकी केली होती.

मुंबई हल्ल्यात तहव्वूर राणाचा हात असल्याचे पुरावे यापूर्वी भारताने अमेरिकी न्यायालयात सादर केले होते. अमेरिकेतील आरोपांच्या तुलनेत भारतात राणावर ठेवण्यात आलेले आरोप वेगळे आहेत, असे अमेरिकी न्यायालयाने स्पष्ट केले होते. दोन्ही देशांमध्ये असलेल्या प्रत्यार्पण कराराच्या अंतर्गत तहव्वूर राणाचे प्रत्यार्पण भारतात करणे शक्य असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

राणाला २००९ मध्ये शिकागो विमानतळावर एफबीआयने अटक केली होती. तो आयएसआय आणि दहशतवादी संघटना लष्कर-ए-तोयबाचा हस्तक होता. त्याला आता भारतात आणण्याच्या तयारीने वेग धरला आहे.

**पाकी लष्करात होता डॉक्टर**

तहव्वूर राणाचा जन्म पाकिस्तानात झाला. त्याने लष्करी वैद्यकीय महाविद्यालयातून अभ्यास पूर्ण केला तसेच पाकिस्तानी लष्करात १० वर्षांपर्यंत डॉक्टर म्हणून काम केले. मात्र, काम न पटल्याने त्याने नोकरी सोडली आणि भारतविरोधी दहशतवादी कारवायांमध्ये सामील झाला. (वृत्तसंस्था)

### सात भाषांवर प्रभुत्व

तहव्वूर राणाने कॅनडा, पाकिस्तान, जर्मनी आणि इंग्लंडमध्ये वास्तव्य केले आहे आणि त्याचे सात भाषांवर प्रभुत्व असल्याचे न्यायालयातील दस्तावेजांत म्हटले आहे. २००६ पासून नोव्हेंबर २००८ या काळात तहव्वूर राणाने पाकिस्तानात डेव्हिड हेडलीसोबत हल्ल्याचा कट रचला. यासाठी त्याला लष्कर-ए-तोयबा आणि जिहाद-ए-इस्लामीची मदत मिळाली. या प्रकरणात हेडली माफीचा साक्षीदार झाला आहे.

## संरक्षण मंत्रालयाने जाहीर केले २०२५ हे 'सुधारणेचे वर्ष'

### युनिफाईड मिलिटरी कमांड स्थापन करणे होईल सुलभ

**नवी दिल्ली, १ जानेवारी**

सुरक्षा मंत्रालयाने २०२५ हे 'सुधारणेचे वर्ष' म्हणून घोषित केले आहे. या प्रकरणाशी संबंधित अधिकाऱ्याने सांगितले की, २०२५ मध्ये संरक्षण मंत्रालय सायबर आणि अंतराळसारख्या नवीन क्षेत्रांवर आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करेल. लष्करी क्षमतेच्या जलद विकासासाठी संपादन प्रक्रिया सुलभ आणि कालबद्ध करेल. संरक्षण सुधारणांमुळे युनिफाईड लष्करी कमांड स्थापन करणे सुलभ होईल, असे संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी म्हटले आहे.

सशस्त्र दलांना तांत्रिकदृष्ट्या प्रगत आणि युद्धासाठी तयार दलांमध्ये बदल घडवण्यासाठी सुधारणा उपाय लागू केले जातील. २०२५ मध्ये सायबर आणि अंतराळ, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), मशीन लर्निंग, हायपरसोनिक्स आणि रोबोटिक्ससारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केले जाईल.

**आधुनिकीकरणाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा**

संरक्षण मंत्री राजनाथसिंह म्हणाले की, सुधारणांचे वर्ष हे सशस्त्र दलांच्या आधुनिकीकरणाच्या प्रवासातील एक महत्त्वाचे पाऊल असेल. यामुळे देशाच्या संरक्षण सज्जतेमध्ये अभूतपूर्व प्रगतीचा पाया रचला जाईल आणि अशा प्रकारे २१व्या शतकातील आव्हानांमध्ये राष्ट्राची सुरक्षा आणि सार्वभौमत्व सुनिश्चित करण्याची तयारी होईल. (वृत्तसंस्था)

## डिसेंबरमध्ये ७.३ टक्क्यांनी वाढले जीएसटी संकलन

### १.७७ लाख कोटींची कमाई

**नवी दिल्ली, १ जानेवारी**

डिसेंबर महिन्यात वस्तू व सेवा कर अर्थात् जीएसटी संकलनातून केंद्र सरकारच्या तिजोरीत १.७७ लाख कोटी रुपये जमा झाले. वार्षिक आधारावर यात ७.३ टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती केंद्र सरकारने बुधवारी जारी केलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे.

जमा झालेल्या एकूण करात केंद्रीय जीएसटी कर संकलन ३२,८३६ कोटी, राज्य जीएसटी ४०, ४९९ कोटी, एकीकृत जीएसटीतून ४७, ७८३ कोटी आणि उपकरातून ११, ४७१ कोटी रुपये सरकारच्या तिजोरीत जमा झाले आहेत.

२०२३ च्या डिसेंबरमध्ये १.६५ लाख कोटींवर असलेले जीएसटी संकलन २०२४ च्या डिसेंबर महिन्यात १.७७ लाख कोटींवर पोहोचले आहे. यात ७.३ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली. आकडेवारीनुसार देशांतर्गत व्यवहारातून मिळणारा जीएसटी ८.४ टक्क्यांनी वाढून १.३२ लाख कोटी झाला आहे. (वृत्तसंस्था)

## कारंजात कलश स्थापनेने श्रींच्या ७२५ व्या जन्मोत्सवास प्रारंभ

**कारंजा, १ जानेवारी**

दत्तात्रेय प्रभूंचा दुसरा अवतार मानल्या जाणाऱ्या श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या ७२५ व्या जन्मोत्सवास कारंजा येथील गुरू मंदिरात बुधवार, १ जानेवारीपासून प्रारंभ झाला. हा उत्सव ४५ दिवस चालणार आहे. १३ फेब्रुवारीला शैलगमन यात्रेने या महोत्सवाची सांगता होणार आहे.

श्री नृसिंह सरस्वती स्वामींच्या जन्मोत्सवानिमित्त मंदिराला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. शिवाय याच दिवशी नववर्षाची सुरुवात होणार असल्याने गुरू मंदिरात दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी दिसून आली. या जन्मोत्सव सोहळ्याची पूर्वतयारी व उत्सव कालावधीतील विविध कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडावे याकरिता श्री गुरू मंदिर संस्थानद्वारे उत्सव समितीचे गठन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे कारंजा येथे श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांचा ७२५ व्या जन्मोत्सवास नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी बुधवार, १ जानेवारीला श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थानच्या वतीने प्रारंभ करण्यात आला. १ जानेवारीपासून या जन्मोत्सवास सुरुवात झाली असून १३ फेब्रुवारीला शेलगमन यात्रेने सांगता होणार आहे. या दरम्यान सलग ४५ दिवस भाविकांना विविध धार्मिक कार्यक्रमांची मेजवानी मिळणार असून विविध नामवंत कलाकार सेवा देणार आहेत. (तभा वृत्तसेवा)




## टेंपो-कारच्या अपघातात पाच जणांचा मृत्यू

### मैंदर्गीजवळील घटना : आठ जखमींवर उपचार सुरु; मृत, जखमी नांदेड व पुणे जिल्ह्यातील रहिवासी, लहान बालकांचाही समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.१ जानेवारी,**

अक्कलकोट ते मैंदर्गी रस्त्यावर शाब्दी फार्म हाऊससमोर स्कार्पिओ आणि आयशर टेंपोचा अपघात झाल्याने दोन महिला, दोन पुरुषांचा जागीच मृत्यू झाला. उपचारासाठी नेताना एकाचा असे पाच जणांचा मृत्यू झाला.

स्कार्पिओला (क्र. एम. एच. १४/ डी. १00१ हिस आयशर टॅम्पो (क्र. जीजे १५/ व्ही. १४६६) वरील अज्ञात चालकाने जोराची समोरून धडक दिल्याने भीषण अपघात झाला. चौघांचा जागेवरच उपचारासाठी सोलापूरला नेताना तीन वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाला.हनमळू गंगाराम पाशावार (वय ३५, रा. कुंडलवाडी, नांदेड), गंगाधर राजण्णा कुर्णापल्ले (वय ४५, रा. केरुळ, ता. बिलोली), सागराबाई गंगाराम कुर्णापल्ले (रा. रा. केरुळ, ता. बिलोली), वैष्णवी उर्फ ऐश्वर्या हनमळू पाशावार (वय १४,





रा. कुंडलवाडी) ऋतुजा मोहन शिरलेवाड (वय ३, रा. चिंबली, ता. खेड, जि. पुणे) हे ठार झाले. ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे तेजेस गंगाधर मानोरे (वय ३0, रा. चिंबळी, ता. खेड), पिंटू बाबुलाल गुप्ता (वय २८, रा. पुणे), नामदेव बालाजी वाडेकर (वय २९, रा. चिंबळी, ता. खेड, जि. पुणे), छाया मोहन शिरलेवाड (वय ३५, रा. चिंबळी, ता. खेडे) यांच्यावर उपचार चालू आहेत. जयश्री पिंटू गुप्ता (वय २५, रा. चिंबळी, ता. खेड, जि. पुणे), सावित्रा हनुमंत पायवल (वय ४0, रा. कुंडलवाडी, जि. नांदेड), आकाश हनुमंत पायावल (वय १0, रा. कुंडलवाडी, जि. नांदेड), कातिर्की श्रेयस गुप्ता (वय २, रा. चिंबळी, ता. खेड) हे जास्त गंभार जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरीता सोलापूरच्या शासकीय रुग्णालयामध्ये दाखल केले आहेत. या अपघातातील आयशर टेम्पोचालक अपघात स्थळावरून फरार झाला आहे. याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलिसात योगेश गंगाधर कुर्णापल्ले यांनी अज्ञात चालका विरोधात फिर्याद दाखल केली आहे. रस्त्यावर उपघात झाल्यावर जखमींना नागरिकांनी ग्रामीण रुग्णालयात उपचार्थ दाखल केले.

**यांनी केला उपचार** : यावेळी रुग्णालयातील डॉ. निखिल क्षीरसागर, डॉ. सतीश बिराजदार, अधिपरिचारिका चिंचुरे, सलगरे, नंदे, वरदे, गंगाराम राठोड, हुसेन पाशा मुजावर, संदीप जाधव, तौफिक शेख, जाधव, मावशी आदींनी जखमींवर उपचार करून पुढील उपचारासाठी सोलापूर रुग्णालयाकडे पाठविण्यात आले. माजी नगरसेवक महेश हिडोळे यांनी ग्रामीण रुग्णालय येथे जखमींची भेट घेतली. चहा, बिस्किटे देऊन त्यांना धीर दिला.

## महत्त्वाचे

### बीएसएनएलने आणले दोन नवे रिचार्ज

**मुंबई :** सरकारी टेलिकॉम कंपनी बीएसएनएल सध्या आपल्या स्वस्त रिचार्ज प्लानमुळे चर्चेचा विषय बनली आहे. नवीन वर्षाच्या निमित्ताने बीएसएनएलने आपल्या ग्राहकांसाठी दोन नवे प्री-पेड रिचार्ज प्लॅन लॉन्च केले आहेत. नवा २१५ रुपयांचा प्लॅन ३० दिवसांच्या वैधतेसह येतो. यात ग्राहकांना दररोज दोन जीबी डेटाचा फायदा मिळणार आहे तसेच दररोज १०० फ्री एसएमएसचा लाभ मिळेल. दुसरा प्लॅन ६२८ रुपयांचा असून, ८४ दिवसांच्या वैधतेसह येतो. यात युजर्सना दररोज तीन जीबी डेटाचा फायदा मिळणार आहे. शिवाय दररोज १०० मोफत एसएमएसचा लाभ मिळेल.

### एअर इंडियाच्या देशांतर्गत उड्डाणांमध्ये वाय-फाय मिळणार

**नवी दिल्ली :** एअर इंडियाच्या काही देशांतर्गत उड्डाणांमध्ये आता वाय-फाय सुविधा उपलब्ध होणार आहे. सध्या ही सेवा फक्त एअरबस ए-३५०, बोईंग ७८७-९ आणि काही ए-३२१निओ विमानांमध्ये उपलब्ध असेल. देशांतर्गत उड्डाणांमध्ये वाय-फाय इंटरनेट सेवा देणारी एअर इंडिया देशातील पहिली विमान कंपनी ठरली आहे. वाय-फाय प्रास्ताविक कालावधीसाठी विनामूल्य असेल आणि कालांतराने ताफ्यातील इतर विमानांमध्ये हळूहळू सादर केले जाईल. इन-फ्लाइट वाय-फाय १०,००० असताना एकाच वेळी अनेक उपकरणांना 'कनेक्ट' होण्यास अनुमती देईल. ही सेवा सॅटेलाइट कनेक्टिव्हिटी आणि सरकारी निर्बंध यासारख्या घटकांवर अवलंबून असेल.

### स्वित्झर्लंडमध्ये बुरखा घालण्यावर बंदी

**बर्न :** स्वित्झर्लंडमध्ये महिलांनी सार्वजनिक ठिकाणी हिजाब, बुरखा किंवा इतर कोणत्याही साधनाने चेहरा झाकण्यावर बंदी लागू केली आहे. या कायद्याचे उल्लंघन केल्यास १००० स्विस फ्रँक्स म्हणजेच अंदाजे ९६ हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाईल. २०२१ स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या सार्वमतामध्ये ५१.२१ टक्के नागरिकांनी बुरख्यावर बंदी घालण्याच्या बाजूने मतदान केले. यानंतर बुरख्यावरील बंदीबाबत कायदा करण्यात आला, जो १ जानेवारी २०२५ (नवीन वर्ष) पासून सुरू होत आहे. स्वित्झर्लंडपूर्वी बेल्जियम, फ्रान्स, डेन्मार्क, ऑस्ट्रिया, नेदरलँड आणि बल्गेरियामध्येही याबाबत कायदे करण्यात आले आहेत. या कायद्यानंतर सार्वजनिक कार्यालये, सार्वजनिक वाहतूक, रेस्टॉरंट आदी सार्वजनिक ठिकाणी महिलांना चेहरा पूर्णपणे झाकता येणार नाही.

### भारत-पाकिस्तानने केली अणुप्रकल्पांच्या यादीची देवाणघेवाण

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तानने बुधवारी द्विपक्षीय करारांतर्गत त्यांच्या अणुप्रकल्पांच्या यादीची देवाणघेवाण केली. नवी दिल्ली आणि इस्लामाबादमधील राजनैतिक माध्यमांद्वारे अणुप्रकल्प सुविधांवर हल्ला प्रतिबंधित करण्याच्या कराराच्या अंतर्गत समाविष्ट असलेल्या आण्विक प्रतिष्ठान आणि सुविधांच्या यादीची देवाणघेवाण केली. काश्मीर प्रश्नावर तसेच सीमेपलीकडील दहशतवादावर दोन्ही देशांमधील तणावपूर्ण संबंधादरम्यान यादीची देवाणघेवाण करण्यात आली. ३१ डिसेंबर १९८८ रोजी या करारावर स्वाक्षरी झाली आणि २७ जानेवारी १९९१ रोजी अंमलात आली. करारानुसार प्रत्येक वर्षी १ जानेवारीला देवाण-घेवाण केली जाते.

### नववर्षाला उत्तराखंडातील मंदिरात भाविकांची गर्दी

**अल्मोडा :** नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी जागेश्वर धामसह मंदिरांमध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली. २०२४ ला निरोप दिल्यानंतर बुधवारी नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी शिवाची नगरी जागेश्वर धाम, जगप्रसिद्ध चितई मंदिर, कासारदेवी आदी मंदिरात दर्शनासाठी सकाळपासून भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७८,५०७.४१ (+३६८.४०) |
| निफ्टी | २३,७४२.९० (+९८.१०) |

### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टँडर्ड/१० ग्रॅम) | ७८,००० रु. |
| चांदी (प्रतिकिलो) | ९०,५०० रु. |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.२ | १८.९ |
| अमरावती | ३१.२ | १५.७ |
| भंडारा | -.- | १४.४ |
| बुलढाणा | २९.४ | १६.६ |
| चंद्रपूर | २९.२ | -.- |
| गडचिरोली | २९.६ | १५.८ |
| गोंदिया | २६.७ | ११.९ |
| नागपूर | २९.० | १४.३ |
| वर्धा | २९.५ | १५.८ |
| वाशीम | ३१.० | १८.२ |
| यवतमाळ | ३०.५ | -.- |

# गडचिरोलीला आता महाराष्ट्रातील पहिल्या जिल्ह्याची ओळख

**मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन**

**लॉईडच्या विविध उपक्रमांचा शुभारंभ**

**६२०० कोटींची गुंतवणूक**

**७७ वर्षांत प्रथमच अहेरी-गर्देवाडा बस सुरू**



पद्मश्री डॉ. तुलसी मुंडा यांना लॉईड कंपनीचे शेअर्स प्रदान करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लॉईडचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन्, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे

◆ **गडचिरोली, १ जानेवारी**

गडचिरोलीची ओळख राज्यातील शेवटचा जिल्हा म्हणून केली जात होती. मात्र, आता राज्यातील पहिला जिल्हा म्हणून गडचिरोलीची ओळख निर्माण करून हा जिल्हा स्टील हब म्हणून ओळखला जाईल. ६२०० कोटींची गुंतवणूक झाली असून, ४ हजारांवर लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. नवीन गडचिरोलीचा उदय होताना आता राज्याला दिसणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा बससेवेचा शुभारंभ करून त्यांनी बसमधून प्रवासही केला. लॉईड मेटल्स कंपनीच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६२०० कोटींची गुंतवणूक होत आहे.

१ जानेवारीला सकाळी आगमन झाल्यावर देवेंद्र फडणवीस थेट ताडगुडा ब्रीज येथे गेले. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे त्यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे जवानांशी व ग्रामस्थांशी संवाद साधला. हा परिसर अतिदुर्गम मानला जातो. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री आहेत.

दुपारी कोनसरी येथे लॉईड्सच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यात कोनसरी येथे डीआयआय प्लांट (४०० कोटी रुपये गुंतवणूक, ७०० रोजगार), पेलेट प्लांट आणि स्लरी पाईपलाईन (३००० कोटी रुपये गुंतवणूक, १००० रोजगार), हेडरी, एटापल्ली येथे आयर्न ओअर ग्राइंडिंग प्लांट (२७०० कोटी रुपये गुंतवणूक, १५०० रोजगार), वन्या गारमेंट युनिट (२० कोटी रुपये गुंतवणूक, ६०० रोजगार) याचा समावेश आहे. शिवाय लॉईड्स काली अम्मल हॉस्पिटल आणि लॉईड्स राज विद्यानिकेतन सीबीएसई शाळेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. पोलिसांसाठी निवासस्थाने, जिमखाना, बालोद्यान आदींचेही लोकार्पण करण्यात आले. कामगार आणि आत्मसमर्पित नक्षलवाद्यांना कंपनीचे १००० कोटींचे शेअर्स देण्यात आले.

गडचिरोलीत ग्रीन माईनिंगचाही शुभारंभ करण्यात आला. यातून खाणींचे संरक्षण होणार असून लोहखनिजासाठी स्लरी पाईपलाईनमुळे इंधन बचत होणार, कार्बन उत्सर्जन कमी होणार, रस्त्यावरील अपघातही कमी होणार आहेत. ग्रीन माईनिंगचा प्रयोग गडचिरोलीत प्रथमच राबविण्यात येत आहे. गोंडवाना विद्यापीठ ऑस्ट्रेलियन विद्यापीठाशी एक करार करणार असून त्यातून मायनिंगशी संबंधित सर्व अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील. यातून गडचिरोलीतील तरुणांनाच रोजगार मिळणार आहे, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यावेळी आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, लॉईड मेटल्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन्, अशोक नेते, डॉ. देवराव होळी, जिल्हाधिकारी अविशांत पंडा, पोलिस अधीक्षक नीलोत्पल आदींची उपस्थिती होती. ◀(तभा वृत्तसेवा)



# मंत्रालयातील गर्दी टाळण्यासाठी एफआरएस यंत्रणा!

## प्रत्येक प्रवेशद्वारावर होणार स्कॅनिंग

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१ जानेवारी -**

मंत्रालयातील वाढती गर्दी आणि त्यापासून निर्माण होणारे कायदा व सुव्यवस्थेची समस्या कमी करण्यासाठी एफआरएस हे अद्ययावत तंत्रज्ञान सुरु केले जाणार आहे. मंत्रालयाच्या सर्व प्रवेशद्वारावरती ही यंत्रणा बसविण्यात आली आहे. त्यानंतर मंत्रालयाच्या इमारतीमध्ये प्रवेश करतानाही पास स्कॅनिंग केल्यानंतरच आत मध्ये प्रवेश केला जाणार आहे.

अभ्यंगताचे ज्या विभागात काम असेल, केवळ त्याच विभागात संबंधितांना जावे लागणार आहे. इतर कुठल्याही ठिकाणी जात असेल तर त्यावर पोलिसांची करडी नजर असणार आहे.

**अशी असणार एफआरएस यंत्रणा**

● मंत्रालयात जर कोणाला प्रवेश करायचा असेल तर अभ्यंगताना ऑनलाईन पास स्वता काढता येईल किंवा मंत्रालय गेटवर काढता येईल.

● गेटवरून प्रवेश केल्यानंतर इम ारतीमध्ये प्रवेश करताना पुन्हा स्कॅन केल्याशिवाय मुख्य इमारतीत प्रवेश नाही.

● अभ्यंगताना ज्या विभागात जायचं आहे त्या ठिकाणाहून दुसरीकडे गेले तर पोलिसांची नजर असणार आहे.

● मंत्रालयात येऊन कोणी आत्म हत्या करण्याचा प्रयत्न किंवा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास पुन्हा त्या अभ्यंगताला मंत्रालयात प्रवेश मिळणार नाही

● ब्लॅक लिस्टमध्ये नाव टाकले जाणार आहे.

● या तंत्रज्ञानामुळे पास घेण्यासाठी मंत्रालयाच्या बाहेर तासन् तास उभे राहण्याची गरज लागणार नाही.

● सर्व सचिव ,अधिकारी, मंत्री यांनाही फेस आयडी तयार केल्यानंतरच प्रवेश मिळणार

● त्यामुळे मंत्र्यांच्या किंवा आम दारांच्या सोबत येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या गर्दीवर मर्यादा येणार आहे.

● प्रत्येक गेटवरील एफआरएस सिस्टम ही मंत्रालय कंट्रोल रुमला कनेक्ट असणार आहे.

● त्यामुळे अभ्यंगत किंवा आलेला व्यक्ती मंत्रालयात कुठे जातोय यावरती पोलिसांच लक्ष असणार आहे.

● मंत्रालयात साधारणता ८००० अधिकारी आणि कर्मचारी यांची संख्या आहे. कॅबिनेटच्या दिवशी अभ्यंगताची संख्या पाच ते सहा हजार असते त्यामुळे १२ ते १५ हजारावर गर्दी होते.

# चंद्रपूर-नागपूर मार्गावरील अपघातात तिघांचा मृत्यू

**एकाच कुटुंबाचे होते सदस्य**

◆ **आयुधनिर्माणी, १ जानेवारी**

नातेवाईकांच्या भेट घेतल्यानंतर हॉटेलमध्ये जेवण करून वणी या स्वगावी परत जात असताना समोरून येणाऱ्या ट्रकवर दुचाकी आदळून झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. ही घटना नागपूर-चंद्रपूर



मृत्युमुखी पडलेले नागपुरे कुटुंबीय

मार्गावरील डॉली पेट्रोलपंपसमोर मंगळवार, ३१ डिसेंबर रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास घडली. सतीश भाऊराव नागपुरे, मंजूषा सतीश नागपुरे व माहिरा राहुल नागपुरे अशी मृतांची नावे आहेत. तर स्मायली कामतवार ही सात वर्षीय मुलगी किरकोळ जखमी झाली आहे.

वणी तालुक्यातील रासाघोपसा येथील नागपुरे कुटुंब भद्रावती येथे नातेवाईकांकडे भेटीसाठी आले होते. भद्रावती शहरालगत नातेवाईकांच्याच मालकीच्या हॉटेलमध्ये जेवण केल्यानंतर हे कुटुंब दुचाकीने आपल्या घराकडे परत जात असताना हायवेवर यू टर्न घेताना समोरून येणाऱ्या ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली.

या अपघातात मंजूषा नागपुरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर सतीश नागपुरे व माहिरा नागपुरे या दोन वर्षीय बालिकेचा उपचारासाठी नेताना मृत्यू झाला. या अपघातात स्मायली कामतवार ही सात वर्षीय मुलगी किरकोळ जखमी झाली आहे. अपघातानंतर या घटनेनंतर ट्रकचालक नंदू चव्हाण रा. पुसद याला भद्रावती पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. पुढील तपास भद्रावती पोलिस करीत आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)



जम्मू-काश्मिरात कडाक्याची थंडी पडली असून, काही ठिकाणी उणे तापमान आहे. श्रीनगरच्या बाह्य भागातील गोठलेल्या सरोवरावर चालत असलेल्या लोकांचे छायाचित्र

## दौसा येथे वाघाच्या हल्ल्यात तीन जण जखमी

**जयपूर :** राजस्थानच्या दौसा जिल्ह्यात बुधवारी वाघाने केलेल्या हल्ल्यात तीन जण जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. बांदीकुईच्या महुखुर्द गावात ही घटना घडल्याचे अलवरचे विभागीय वन अधिकारी राजेंद्र हुडा यांनी सांगितले. मंगळवारी रात्री वाघ अलवरमधील सरिस्का जंगलातून निसटला आणि दौसा जिल्ह्यात दाखल झाला. महुखुर्द गावातील कोळी मोहल्लाजवळील रस्त्यावरील झुडपाजवळ वाघ बसला असताना उगा महावर नावाची महिला झुडपाजवळ आली. प्रतिक्रिया देण्यापूर्वीच वाघाने तिच्यावर मागून हल्ला केला. महिलेला वाचवण्यासाठी विनोद मीना आणि बाबुलाल मीना हातात काठ्या घेऊन वाघाजवळ आले असता वाघाने त्यांच्यावरही हल्ला केला.

# आभाळी वातावरणामुळे द्राक्ष बागांच्या वाढल्या फवारण्या

▸ **नाशिक पट्टा वगळता इतर द्राक्षबागा अद्याप तरी सुरक्षित**

▸ **द्राक्ष बागायतदार संघाचे संचालक गवळी यांची माहिती**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

नाशिक पट्ट्यातील द्राक्षबागांना मध्यंतरी अवकाळी पावसाचा थोडा फटका बसला असून, सोलापूर विभागातील द्राक्ष बागांची मात्र कोणतीही हानी झाली नसल्याची माहिती महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे (पुणे विभाग) संचालक हणमंत गवळी यांनी दै. तरुण भारतशी संवाद साधताना आज (दि.०१) दिली. दरम्यान, या आभाळी वातावरणामुळे द्राक्षबागांवर विविध प्रकारची विघ्ने पडू नये, यासाठी फवारण्या मात्र वाढल्या असल्याचे त्यांनी नमूद केले.

द्राक्षबागांबाबत विस्ताराने बोलताना संचालक गवळी म्हणाले की, सध्या सोलापूर विभागातील द्राक्ष बागा फ्लॉवरिंग्च्या स्टेजमध्ये असून, १५ मार्चपासून या बागांची द्राक्ष बाजारात येत असतात तर काहीजणांची द्राक्ष विदेशात निर्यात होतात. या बागांना अक्षरशः पोटच्या लेकराप्रमाणे शेतकऱ्यांना जतन करावं लागतं. त्यातच अवकाळी पावसाची भीती असते. नुसते आभाळ फिरू लागले तर या शेतकऱ्यांचा जीव कासावीस होतो. कारण हे फारच खर्चिक पीक असते. यामुळे या पिकाची वेळच्या वेळी काळजी घेणे गरजेचे असते. यामुळे अनेक शेतकरी प्लॉट टप्प्याटप्प्याने घेतात. एखाद्या प्लॉटचे नुकसान झाले तरी दुसऱ्या प्लॉटमध्ये ते नुकसान भरून निघावे अशी त्यांची अपेक्षा असते. सध्याच्या वातावरणाचा द्राक्षबागांना धोका नसून, गारपीट किंवा मोठ्या पावसाचीच जास्त भीती या बागांना असते.

जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनीही गेल्या महिन्यापासून मासिक प्रक्षेत्र भेट हा उपक्रम जिल्ह्यात राबविण्यास सुरूवात केली आहे. तेही त्यांची टीम घेवून द्राक्षबागा, फळबागा आणि हंगामी पिकांची पाहणी करत आहेत. अशा आभाळी वातावरणात त्यांच्या कृषी अधिकाऱ्यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा फायदाही शेतकऱ्यांना होत आहे. शेतकऱ्यांच्या शेतशिवार फे रीसाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी जिल्ह्यातील ११ तालुक्याचे कृषी अधिकारी, मोहोळचे कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख संशोधक डॉ. लालासाहेब तांबडे, जाधव, विभागीय कृषी केंद्र राहुरीचे पवार, जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाचे मंगरूळे व इतर काही सहकाऱ्यांची तगडी टीम त्यांनी केली आहे.

या टीमचा हा एक प्रकारे अभ्यास दौरा अन् कृषी सल्लाच देणे सुरू झाले आहे. याचा फायदा शेतकरी बांधवांना मोठ्या प्रमाणात होणार आहे आणि कृषी अधिकाऱ्यांनाही विविध तालुक्यांतील पिकांचीही बरीचशी माहिती होत आहे. रब्बी हंगाम तील पीकपाहणी बरोबर द्राक्षबागा, फळबागा त्यांनी पाहिल्या असून, अशा वातावरणातील फायदेशीरच ठरणार आहे. सध्याच्या आभाळी वातावरणामुळे ज्या पिकांवर बुरशीजन्य रोग पडला आहे. त्या ठिकाणच्या पिकांवर कोणत्या औषधांची फवारणी करायची, याचाही सल्ला हे अधिकारी देत आहेत.

## वाल्मीक कराडला १४ दिवसांची पोलिस कोठडी

**बीड :** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराडला केज न्यायालयाने बुधवारी १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. गेल्या अनेक दिवसांपासून फरार असलेला वाल्मीक कराड मंगळवारी पुणे सीआयडीला (गुन्हे अन्वेषण विभाग) शरण गेला होता. चौकशी केल्यानंतर कराडला न्यायालयात हजर करण्यात आले होते. सीआयडीने वाल्मीक कराडची पत्नी आणि काही जवळच्या लोकांची चौकशी केली होती. त्यानंतर ३१ डिसेंबरला ११ वाजताच्या सुमारास त्याने शरणागती पत्करली होती. त्यानंतर सीआयडीने दुपारी त्याला पुण्यातून बीडला हलवले आणि बुधवारी दुपारी केजच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. व्ही. पावसकर यांच्यासमोर हजर केले. यावेळी सरकारी वकिलाने संतोष देशमुख यांच्या हत्येत वाल्मीक कराडचा प्रभाव दिसून येतो. खून, ॲट्रॉसिटी आणि खंडणी प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले फरार असून, त्याला शोधण्यासाठी पोलिस कोठडीची आवश्यकता असल्याचा युक्तिवाद करीत १५ दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली.

# वाचन संकल्प महाराष्ट्र उपक्रमांतर्गत महाविद्यालयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर दि. १ जानेवारी-**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे औचित्य साधून आणि राज्यातील वाचन संस्कृती वृद्धींगत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.०१ जानेवारी २०२५ ते दि.१५ जानेवारी २०२५ या कालावधीत "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा अनोखा उपक्रम राबविण्यासाठी दि.२० डिसेंबर २०२४ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे.

या उपक्रमांतर्गत सामुहिक वाचन,कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धा हे कार्यक्रम राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. नवीन वर्षाची सुरवात समाजातील सर्व घटकांतील तसेच नागरिकांनी आपल्या आवडीचे पुस्तकाचे वाचन करून करावी असे आवाहन मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य चंद्रकांत दादा पाटील यांनी केले आहे.

१ जानेवारी रोजी राज्यातील ६ हजारवर महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभाग घेतला असून या उपक्रमाच्या सुरुवातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या सभागृहामध्ये ग्रंथालयामध्ये सामुहिकरीत्या पुस्तकांचे वाचन सुरु केले आहे. यानिमित्ताने राज्यातील जवळजवळ ४५ लाखाच्या वर विद्यार्थ्यांच्या हातात विविध प्रकारची पुस्तके दिसून आलेत.

येत्या १५ दिवसांत सदर पुस्तक वाचन पूर्ण करण्याचा संकल्प या निमित्ताने प्रत्येक विद्यार्थ्याने केला आहे. तसेच येत्या पंधरवड्यात राज्यातील प्रत्येक महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढावे यासाठी वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. स्थानिक लेखकांना महाविद्यालयात निमंत्रितकरून विद्यार्थी वाचक व




लेखक या परिसंवादाचे आयोजन करण्यात येणार आहे. वाचन पंधरवडा निमित्ताने महाविद्यालयामध्ये पुस्तक परिक्षण स्पर्धा आणि पुस्तक कथन स्पर्धा आयोजितकरण्यात आले आहे.पहिल्याच दिवशी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमास सोलापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी करून घेतले व वाचन संस्कृतीचे जतन करण्यासाठी त्यांना त्यांच्या आवडीच्या पुस्तकांची निवड करून पुस्तकासंबंधीचे अभिप्राय १५ दिवसांच्या आत महाविद्यालयास सादर करण्यासंबंधी सुचित केले आहे. त्यास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे असा प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.

## 'अवामी लीग'ला निवडणूक लढविण्यास बंदी नाही

**ढाका :** सरकार अथवा न्यायालय बंदी घालत नाही, तोपर्यंत माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा अवामी लीग पक्ष निवडणूक लढवू शकतो, असे बांगलादेशचे मुख्य निवडणूक आयुक्त एएमएम नसीर उद्दीन यांनी म्हटले आहे.

३० डिसेंबर रोजी चितगाव सर्किट हाऊस येथे निवडणूक अधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत मुख्य निवडणूक आयुक्तांनी उपरोक्त माहिती दिली. स्वतःच्या देशातून निर्वासित झालेल्या शेख हसीना यांच्यासाठी हा मोठा दिलासा आहे. बैठकीत नसीर उद्दीन यांनी सांगितले की, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक पार पडावी यासाठी योग्य ती आवश्यक पावले उचलली जातील. कुठल्याही बाह्यशक्तीच्या प्रभावात न येता देशात निवडणूका होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यादीत बोगस मतदार असल्याची कबुली देत येत्या सहा महिन्यात मतदार याद्या अद्ययावत केल्या जाणार असल्याचे सांगितले. अवामी लीग पक्षावर सरकार किंवा न्यायालयाने बंदी घातलेली नाही. त्यामुळे कायद्यानुसार या पक्षाला निवडणुकीत सहभागी होण्यापासून रोखता येत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# राज्यातील कारागृहांत कैद्यांचा कोंडमारा

**क्षमतेपेक्षा जास्त बंदिवानांची गर्दी**

◆ **मुंबई, १ जानेवारी**

राज्यातील कारागृह कैद्यांनी तुडुंब भरले असून, कैदी ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. राज्यातील काही मध्यवर्ती व काही जिल्हा कारागृहांत दुप्पट कैदी ठेवले जात आहेत. राज्यात असलेली ६० कारागृहे ही पूर्णतः भरली असून, २७ हजार ११० कैदी क्षमता असणाऱ्या कारागृहांमध्ये तब्बल ४१ हजारांपेक्षा अधिक कैद्यांना ठेवण्यात आले आहे. यामुळे कारागृहातील बंदिवानांना एकप्रकारे कोंडमारा सहन करावा लागतो आहे.

बेरोजगारीप्रमाणेच समाजातील वाढती गुन्हेगारीची समस्याही दिवसागणिक गंभीर होताना दिसते आहे. कारागृहांमध्ये कैदेत असलेल्या बंदिवानांची संख्या त्या-त्या कारागृहाच्या क्षमतेपेक्षा दुप्पट आहे. राज्यातील कारागृहांतील चित्र काही वेगळे नाही.

महाराष्ट्र कारागृह विभागाने नोव्हेंबर २०२४ च्या कारागृह बंदी संख्येच्या मासिक अहवालानुसार राज्यभरातील कारागृहांमध्ये सुमारे ४०,७२३ बंदी आजघडीला आहेत. हे प्रमाण कारागृहांच्या क्षमतेच्या दुप्पटीने आहे.

राज्यात एकूण ६० कारागृहे आहेत. यामध्ये मध्यवर्ती कारागृह ९, जिल्हास्तरीय २८, खुली कारागृह १९ आणि विशेष कारागृह, महिलांसाठी कारागृह, किशोर सुधारालय खुली वसाहत प्रत्येकी एक आहे.

**कारागृहात दुप्पट बंदीसंख्या**

राज्यातील एकूण ६० कारागृहांपैकी कल्याण जिल्हा कारागृह २०८६ कैद्यांचे वास्तव्य आहे. ठाणे मध्यवर्ती कारागृह ४००५, मुंबई मध्यवर्ती कारागृह ३४१४, सोलापूर जिल्हा कारागृह ४०७, बुलडाणा जिल्हा कारागृह ३१७, नांदेड ६१८, जळगाव ५५८, सातारा ३९५, येरवडा ६४९६, बीड ३५६, अलिबाग १७४ आणि भायखळा जिल्हा कारागृहात ४१८ बंदी आहेत. या बाराही कारागृहात त्याच्या एकूण क्षमतेच्या दुप्पट कैदी बंदिस्त आहेत. ◀(वृत्तसंस्था)

## माजी आमदार प्रदीप नाईक यांचे निधन

**श्रीक्षेत्र माहूर :** किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार प्रदीप हेमसिंग नाईक यांचे बुधवार, १ जानेवारीला पहाटे ५ वाजता हैदराबाद येथे हृदयविकाराने निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी बेबीताई, मुलगा कपिल, दोन मुली असा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने किनवट व माहूर तालुक्यांवर शोककळा पसरली आहे.



गुरुवार, २ जानेवारीला सकाळी ११ वाजता त्यांच्यावर मूळ गावी किनवट तालुक्यातील दहेली तांडा येथे अन्त्यसंस्कार होणार आहे. प्रदीप नाईक यांनी किनवट विधानसभा मतदारसंघाचे सलग तीन वेळा प्रतिनिधित्व केले आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे (शप) त्यांनी चांगली झुंज दिली होती. मतदारसंघाच्या विकासासाठी प्रदीप नाईक यांचे चांगले योगदान आहे. आम्ही राजकीय विरोधक असलो तरी आमचे संबंध मित्रत्वाचे होते. त्यांच्या अकाली जाण्याने धक्का बसला आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशी भावना आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केली.

# मणिपुरातील गावावर बंडखोरांचा हल्ला

## कादंगबंदवर गोळीबार, बॉम्बही फेकले

◆ **इम्फाळ, १ जानेवारी**

मणिपूरच्या पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातील कादंगबंद भागात बंडखोरांनी धुडगूस घालत बुधवारी पहाटे गोळीबार करीत बॉम्ब फेकले. गावकऱ्यांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आहे.

सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, कांगपोक्पी जिल्ह्यातील एका डोंगरावर लपून बसलेल्या बंडखोरांनी अत्याधुनिक शस्त्रांनी कादंगबंद या सखल भागात राहणाऱ्या नागरिकांवर गोळीबार करीत बॉम्ब फेकले. त्यांना ग्रामस्थ व स्वयंसेवकांनी जोरदार प्रत्युत्तर दिले.

या घटनेत काही घरांना आग लागली मात्र कुठलीही जीवितहानी झालेली नाही. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा दलाला त्या भागात तैनात करण्यात आले. या घटनेनंतर गावकऱ्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. विशेष बाब अशी की, मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेनसिंह यांनी हिंसाचाराच्या घटनांबाबत जाहीर माफी मागितल्यानंतर काही तासांतच बंडखोरांनी हा हल्ला केला आहे.



सुरक्षा दलांनी बुधवारी मणिपुरातील डोंगराळ भागात तसेच खोऱ्यात शोधमोहीम राबवली

**बिष्णुपूर-थौबलमध्ये शस्त्रसाठा जप्त**

बिष्णुपूर आणि थौबल जिल्ह्यात सुरक्षा दलाने मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्र आणि दारुगोळ्याचा साठा जप्त केला, अशी माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. बिष्णुपुरातील थोंगखोग्लोक गावातून मंगळवारी सुरक्षा दलाने एसएलआर रायफल व तिचे मॅग्झिन, .३०३ रायफल, १२ बोअरची सिंगल बॅरल बंदूक, ९ मिमी व्यासाची दोन पिस्तुले, दंगाविरोधी बंदूक, एलएमजीचे दोन मॅग्झिन, इन्सास रायफलीची दोन मॅग्झिन, चार ग्रेनेड, एक डिटोनेटर आणि काडतुसे जप्त केली. लिशांगथेमच्या इकोप पॅट येथून सुधारित स्नायपर रायफल व तिचा स्कोप आणि मॅग्झिन, ग्रेनेड, चार एमके १३ टी रायफली आणि काडतुसे जप्त केली. (वृत्तसंस्था)

### मागील दोन महिन्यांतील हल्ल्याच्या घटना

**११ नोव्हेंबर २०२४ :**
बंडखोरांनी मैतेई समाजाच्या ६ नागरिकांच्या अपहरणानंतर सुरक्षा दलांनी १० कुकी बंडखोरांचा खात्मा केला

**१७ नोव्हेंबर २०२४**
जिरीबाम जिल्ह्यात पोलिसांच्या गोळीबारात एक मैतेई आंदोलक ठार झाला, त्यानंतर परिस्थिती चिघळली

**१५ डिसेंबर २०२४**
बिहारमधील दोन मजुरांची गोळ्या झाडून हत्या झाली, थौबल येथील चकमकीत १ बंडखोर ठार आणि ६ जणांना अटक केली

**२७ डिसेंबर २०२४**
सणसाबी भागात बंडखोरांसोबत झालेल्या चकमकीत एक पोलिस व स्थानिक तरुण जखमी झाला

**२८ डिसेंबर २०२४**
थामनपोक्पी आणि सणसबी येथील गोळीबारात एक महिला आणि पत्रकार जखमी झाले.

# देश विकसित होण्यासाठी शिक्षणावर हवा ६ टक्के खर्च

## कमी गुंतवणुकीवर 'सीआयआय'च्या अहवालात नाराजी



◆ **नवी दिल्ली, १ जानेवारी**

विकसित देशांच्या तुलनेत भारताचा शिक्षणावर खर्च तुलनेत सर्वांत कमी आहे. भारतीय उद्योग महासंघानुसार (सीआयआय) भारताने शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या ६ टक्के करणे आवश्यक आहे. अहवालात काही वर्षांत भारतात शिक्षणावर ३ टक्क्यांपेक्षा कमी गुंतवणूक केल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. सहा वर्षांत भारताचा शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या २.७ टक्के आणि २.९ टक्के या दरम्यान राहिला आहे. त्यामुळे भारताने शिक्षणावरील गुंतवणूक तत्काळ वाढविण्याची गरज अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांमधील तणाव कमी करण्यासाठी भारताने चीनच्या मॉडेलपासून प्रेरणा घेण्याची गरज आहे. स्विडनच्या मॉडेलपासून धडा घेत प्रशिक्षणाचा विस्तार आणि उद्योग व महाविद्यालयांत भागीदारी वाढीसाठी प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. (वृत्तसंस्था)

### शिक्षणावर कोणत्या देशाचा अधिक खर्च

| | |
|---|---|
| स्विडन | ६.९० टक्के |
| ऑस्ट्रेलिया | ५.५० टक्के |
| ब्रिटन | ५.५० टक्के |
| अमेरिका | ५.०० टक्के |
| चीन | ४.१० टक्के |
| थायलंड | ४.०० टक्के |
| इंडोनेशिया | ३.७० टक्के |
| भारत | २.७० टक्के |

### भारतात माध्यमिक शाळांमध्ये मोठी सुधारणा आवश्यक

देशातील माध्यमिक शिक्षणात सुधारणा करणे ही काळाची गरज आहे. जगाच्या तुलनेत भारताचा शिक्षणावरील कमी खर्च ही आपली आर्थिक स्थिती दर्शविते. जगातील विकसित अर्थव्यवस्था मात्र जीडीपीच्या पाच ते सात टक्के शिक्षणावर खर्च करीत आहेत. अनेक देशांत प्राथमिक शिक्षण भक्कम आहे. माध्यमिक शिक्षणावर थोडी अधिक मेहनत बाकी आहे. त्याचवेळी भारतात माध्यमिक शिक्षणावर अधिक मेहनत घेण्याची गरज आहे. भारतात माध्यमिक शाळांची स्थिती ७९.६ टक्के चांगली आहे. विकसित देशांत ब्रिटन (१०० टक्के), स्विडन (१०० टक्के), अमेरिका (९८ टक्के), चीन (९२ टक्के), (९० टक्के), इंडोनेशिया (८२ टक्के) आणि थायलंडमध्ये (८० टक्के) इतकी चांगली आहे.

# नवीन वर्षात रेल्वेचे नवे वेळापत्रक लागू होणार



## १३६ वंदे भारत सुरू होणार

## एआय मॉडेलवर काम होणार

◆ **नवी दिल्ली, १ जानेवारी**

भारतीय रेल्वेचे नवीन वेळापत्रक आता १ जानेवारी २०२५ पासून लागू होणार आहे. याअंतर्गत अनेक गाड्यांच्या वेळेत बदल करण्यात येणार आहेत. याशिवाय अनेक गाड्यांच्या संख्येतही बदल होणार आहेत.

पूर्वी हा बदल दरवर्षी ३० जूनला व्हायचा आणि १ जुलैपासून लागू केला जात होता. मात्र, यावेळी रेल्वे नववर्षाच्या निमित्ताने वेळापत्रकात बदल आहे. 'ट्रेन्स ॲट अ ग्लान्स' ची ही ४४वी आवृत्ती आहे.

रेल्वे मंत्रालय २०२५ मध्ये नमो भारत रॅपिड रेल (वंदे मेट्रो), दोन अमृत भारत एक्सप्रेस गाड्या आणि सर्व १३६ वंदे भारत एक्सप्रेस गाड्या सुरू करण्याची योजना आखत आहे. २०२४ मध्ये ६४ वंदे भारत ट्रेन सुरू झाल्या. २६ डिसेंबर २०२४ भारतीय रेल्वे नेटवर्कवर एकूण १३६ वंदे भारत ट्रेन सेवा धावत आहेत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव सांगतात की, २०२५ मध्ये रेल्वेला कृत्रिम बुद्धिमत्तेने (एआय) सुसज्ज करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**महाकुंभात १३ हजार गाड्या धावणार**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाकुंभासाठी १३,००० गाड्या चालवल्या जातील, ज्यामध्ये ३,००० विशेष गाड्यांचा समावेश असेल. या महाकुंभात ४५ कोटी भाविक सहभागी होतील, त्यापैकी १० कोटी रेल्वेने प्रवास करतील असा अंदाज आहे. भारतीय रेल्वे महाकुंभ दरम्यान एक लाख प्रवाशांच्या मुक्कामाचीही व्यवस्था करीत आहे. यासाठी आयआरसीटीसीने त्रिवेणी संगमाजवळ महाकुंभ ग्राम हे लक्झरी टेंट सिटी बनवले आहे. १० जानेवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत महाकुंभ ग्राम मुक्कामासाठी ऑनलाईन बुकिंग सुरू आहे. आयआरसीटीसीच्या वेबसाईटवर जाऊन बुकिंग सहज करता येते. (वृत्तसंस्था)

# मणिपूरच्या मंत्र्याची सीतारामन् यांच्याशी चर्चा

◆ **इम्फाळ, १ जानेवारी**

मणिपूरचे सार्वजनिक बांधकाम मंत्री गोविंददास कोंथौजम यांनी नुकतीच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांची राजधानी नवी दिल्ली येथे भेट घेतली. यावेळी त्यांनी आशियाई विकास बँक (एडीबी) व जागतिक बँकेच्या सहकार्याने विकसित होणाऱ्या राज्यातील दोन प्रकल्पावर चर्चा केली.

कोंथौजम यांनी समाज माध्यम 'एक्स'वर दिलेल्या माहितीनुसार नवी दिल्लीतील दौऱ्यावेळी मंगळवारी सीतारामन यांच्याशी भेट झाली. यावेळी इम्फाळ शहरात होणारा ५१.२३ किमी लांबीचा रस्ते मार्ग आणि राज्यात कौशल्य विकास व उद्योगाला चालना देणारा मणिपूर इन्फोटेक इनेब्लेड डेव्हलपमेंट प्रकल्पावर विस्तृत चर्चा झाली. हे दोन्ही प्रकल्प एडीबी आणि जागतिक बँकेच्या सहकार्याने उभारले जाणार आहे. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशी महिला भारतात झाली सरपंच

## लवली खातूनमुळे वाढले ममता बॅनर्जींचे 'टेन्शन'

◆ **कोलकाता, १ जानेवारी**

पश्चिम बंगालमधील रशीदाबाद ग्रामपंचायतीच्या प्रमुख लवली खातून यांच्या नागरिकत्वावरून वाद दिवसोंदिवस वाढत चालल्याचे चित्र दिसत आहे. मालदा जिल्ह्यातील तृणमूल काँग्रेसच्या नेतृत्वाखालील रशीदाबाग ग्रामपंचायतीच्या सरपंच असलेल्या लवली खातून या मूळच्या बांगलादेशी असल्याचे सांगितले जात आहे. त्या बांगलादेशी असून, बेकायदेशीरपणे भारतात घुसखोरी केल्याचा आरोप आहे.



खातून यांचे खरे नाव नासिया शेख असे असल्याचे सांगितले जात आहे. अशा परिस्थितीमध्ये लाजमी सरपंच कशा झाल्या, यावरून प्रश्न उपस्थित केले जात आहे. या प्रकरणामध्ये कलकत्ता उच्च न्यायालयात उपविभागीय अधिकाऱ्यांनी एक अहवाल सादर केला आहे. सुल्तान यांनी २०२४ मध्ये उच्च न्यायालयामध्ये एक याचिका दाखल केली होती. रेहाना यांनी २०२२ मध्ये ग्रामपंचायत निवडणूक लढवली होती. या निवडणुकीमध्ये त्यांचा लवली खातून यांच्याकडून पराभव झाला होता.

सुल्ताना यांचे वकील अमलान भादुडी यांनी त्यांची बाजू मांडताना, याचिका दाखल करणाऱ्या रेहाना सुल्ताना यांनी तृणमूलच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढली. त्या लवली खातून यांच्याकडून पराभूत झाल्या. त्यावेळेस लवली यांनी काँग्रेस आणि डाव्या पक्षांकडून उमेदवार म्हणून ही निवडणूक लढून जिंकली. मात्र, निवडणूक जिंकल्यानंतर एक ते दोन महिन्यांमध्ये लवली खातून यांनी तृणमूलमध्ये प्रवेश केला, असे कोर्टाला सांगितले. (वृत्तसंस्था)




नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी दुबई येथे असलेली जगातील सर्वांत मोठी इमारत बुर्ज खलिफावर अशी रोषणाई करण्यात आली होती

## चित्रपट वार्ता

### 'छावा'साठी पाच महिने भाषा शिकली : रश्मिका

**मुंबई** : 'छावा' या चित्रपटात अभिनेत्री रश्मिका मंधाना छत्रपती संभाजी महाराजांच्या पत्नी महाराणी येसूबाई भोसले यांची भूमिका साकारत आहे. महाराणीचे पात्र साकारणे ही रश्मिकासाठी केवळ संधी नव्हती, तर एक स्वप्न होते. नुकतेच रश्मिकाने सांगितले की, स्वतःला राणीच्या भूमिकेत पाहण्याचे तिचे स्वप्न होते, जे 'छावा'ने पूर्ण केले. या व्यक्तिरेखेसाठी रश्मिकाने पाच महिने दररोज ३-४ तास भाषा शिकण्यात घालवले. लक्ष्मण उतेकर सरांच्या दूरदृष्टीनेच ते विशेष बनले. पहिल्यांदा कथा सांगताना त्यांनी सांगितले की, मला महाराष्ट्रीयन राणी म्हणून बघायचे आहे. माझे दिसणे, माझ्या चेहऱ्याची वैशिष्ट्ये सर्वकाही या पात्रासाठी योग्य होते. तुम्हाला अभिमान वाटेल असा हा चित्रपट आहे. हे केवळ सुंदरच नाही, तर हृदयाला स्पर्श करणारे आहे.



### प्रशांत दामलेंसह तीन विनोदवीर एकत्र

**मुंबई** : सध्या मराठी चित्रपटसृष्टीत चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेला चित्रपट म्हणजे 'मु. पो. बोंबीलवाडी'. परेश मोकाशी यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेला हा चित्रपट केवळ नावानेच नाही, तर त्यातील अनोख्या व्यक्ति रेखांमुळे प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण करीत आहे. चित्रपटाचा मुख्य आकर्षणबिंदू म्हणजे ऐतिहासिक दृष्टिकोनातून एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले हिटलर आणि चर्चिल या भूमिका विनोदी स्वरूपात सादर होणे. या भूमिकांत प्रेक्षकांना प्रशांत दामले आणि आनंद इंगळे हे विनोदवीर पाहायला मिळणार आहेत. ऐतिहासिक नेत्यांचे विनोदी टायमिंग आणि संवादफेक पाहणे ही प्रेक्षकांसाठी वेगळ्या प्रकारची अनुभूती ठरणार आहे. या सिनेमात वैभव मांगले यांचीही महत्त्वाची भूमिका आहे. 'मु. पो. बोंबीलवाडी' हे नाटक गाजवलेल्या मांगले यांच्यासाठी हा प्रकल्प खास आहे. १ जानेवारीला हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे.

### नंतर पश्चात्ताप करण्याच्या मताची नाही वैदेही

**मुंबई** : अभिनेत्री वैदेही परशुरामी हिच्या अभिनयाची चर्चा सध्या सिनेसृष्टीत सुरू आहे. वैदेहीने आपल्या कासवगतीने बऱ्यापैकी यश मिळवले आहे. आता ती 'संगीत मानापमान' मध्ये झळकणार आहे. तुझ्या जीवनाचा मंत्र काय आहे, याविषयी विचारले असता वैदेही म्हणाली, मी बरेचदा कृतज्ञतेविषयी बोलते. माझ्या व्यक्तिमत्त्वात ती महत्त्वाची भूमिका निभावते. मंत्राबाबत बोलायचे, तर मी कायम एक तत्त्व पाळत आली आहे. असे काही करू नका; ज्याचा शेवट पश्चातापाने होईल आणि एकदा जर तुम्ही एखादी गोष्ट केली, तर मग पश्चाताप करू नका. मला असे वाटते की, ही गोष्ट माझ्याबरोबर कायम आहे आणि ती पुढे तशीच राहावी.



# अदानी समूहाला तामिळनाडूचा धक्का

## महत्त्वाचा प्रकल्प हातातून गेला

◆ **चेन्नई, १ जानेवारी**

सातत्याने कुठल्या ना कुठल्या कारणाने चर्चेत असणारे उद्योगपती गौतम अदानी यांना वर्षाच्या पहिल्याच दिवशी मोठा धक्का बसला आहे. तामिळनाडूच्या द्रमुक सरकारने राज्यात स्मार्ट मीटर बसवण्याचे ग्लोबल टेंडर रद्द केले आहे. अदानी सोल्युशन्सने या प्रकल्पासाठी जारी केलेल्या निविदेत सर्वांत कमी किमतीची बोली लावली होती. त्यानंतर तामिळनाडू जनरेशन ॲण्ड डिस्ट्रिब्युशन कॉर्पोरेशनने ही निविदा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

अदानी एनर्जी सोल्युशन्सने खूप जास्त किंमत सांगितल्याचे कारण देत तामिळनाडू जनरेशन आणि वितरण महामंडळाने निविदा रद्द केली. अदानी एनर्जी सोल्युशन्स चेन्नई, कांचीपुरम आणि चेंगलपट्टूसह काही जिल्ह्यांचा समावेश असलेल्या पॅकेजमध्ये सर्वांत कमी बोली लावणाऱ्यांमध्ये होती. या प्रकल्पासाठी अदानी एनर्जी सोल्युशन्सने लावलेली बोली राज्य सरकारला मान्य नसल्याने निविदा रद्द केल्याचे तामिळनाडू जनरेशन ॲण्ड डिस्ट्रिब्युशन कॉर्पोरेशन अधिकाऱ्यांनी सांगितले. खर्च कमी करण्यासाठी यापूर्वीच कंपनीशी चर्चा झाल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या नवीन वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत स्मार्ट मीटर देण्यासाठी ऑगस्ट २०२३ मध्ये चार पॅकेजेसच्या स्वरूपात निविदा जारी करण्यात आल्या होत्या. एका सूत्राने सांगितले की, अदानींच्या कंपनीने चेन्नईसह ८ जिल्ह्यांना 'कव्हर' केलेल्या निविदांच्या पॅकेज-१ साठी सर्वांत कमी बोली लावली होती. यामध्ये ८२ लाखांहून अधिक स्मार्ट मीटर बसविण्याचा समावेश आहे. ही निविदा २७ डिसेंबर २०२४ रोजी रद्द करण्यात आली. (वृत्तसंस्था)

# नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी जगन्नाथ मंदिरात भाविकांची गर्दी

◆ **पुरी, १ जानेवारी**

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी भगवान बलभद्र, देवी सुभद्रा आणि भगवान जगन्नाथ या देवतांचा आशीर्वाद घेण्यासाठी लाखो लोकांनी बुधवारी १२ व्या शतकातील जगन्नाथ मंदिराला भेट दिली. मार्कट चक ते सिंहद्वार मंदिराकडे जाणाऱ्या भव्य रस्त्यावर भाविकांची एक हजार किलोमीटरहून अधिक लांब रांग दिसत होती. पुरी येथे पोलिस यात्रेकरूंच्या सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहेत.

भाविकांना पूर्वेकडील सिंहाच्या प्रवेशद्वारामधून मंदिरात प्रवेश करण्याची परवानगी आहे. तसेच त्यांना इतर तीन दरवाजातून बाहेर जाण्याचे मार्ग आहेत, असे जगन्नाथ मंदिर प्रशासकचे मुख्य प्रशासक अरबिंदा पाध्ये यांनी सांगितले. वाढती गर्दी पाहता बुधवारी पहाटे १:०५ वाजता मंदिराचे द्वार उघडण्यात आले. भाविंकाची सातत्याने मंदिरात गर्दी वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी रुग्णवाहिका सेवाही उपलब्ध आहे. मुख्य ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह संपूर्ण शहर निगराणीखाली आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# थांबलेल्या ट्रकला कारची धडक, चार ठार

◆ **जालना, १ जानेवारी**

महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यात बुधवारी दुपारी एका थांबलेल्या ट्रकला कारने धडक दिल्याने एका कुटुंबातील तीन सदस्यांसह चार जणांचा जागीच मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. सोलापूर-धुळे रस्त्यावर दुपारी १ वाजताच्या सुमारास झालेल्या अपघातात कारमधील दोघेजण जखमी झाले. पीडित अक्कलकोटला भेट देऊन छत्रपती संभाजीनगरला परत येत होते.

अंबड तहसीलमधील महाकाल गावात ट्रकचा ब्रेक खराब झाल्याने रस्त्यावर थांबला होता. कार मागून येत ट्रकवर धडकली. अनिता कुंटे, भागवत चोरे, सृष्टी चोरे आणि वेदांत चोरे यांचा जागीच मृत्यू झाला. कार चालवत असलेले परशुराम कुंटे आणि छाया चोरे हे गंभीर जखमी झाले असून, त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी रस्ता मोकळा करेपर्यंत वर्दळीच्या महामार्गावरील वाहतूक सुमारे दोन तास विस्कळीत झाली होती. या घटनेचा तपास गोंदी पोलिस करीत आहेत. (वृत्तसंस्था)

# हॉटेलमध्ये सापडले कुटुंबातील पाच जणांचे मृतदेह

◆ **लखनौ, १ जानेवारी**

येथील एका हॉटेलमध्ये पाच जणांचे मृतदेह बुधवारी पहाटे सापडले. त्यांची हत्या झाल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. आरोपीला अटक करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली. लखनौच्या नाका भागातील हॉटेल शरणजीत येथे ही घटना घडली असल्याची माहिती मध्य लखनौचे पोलिस उपायुक्त रवीना त्यागी यांनी दिली.

अर्शद असे आरोपीचे नाव असून, त्याने आपल्याच कुटुंबातील पाच जणांची हत्या केली. या भयंकर कृत्यानंतर, स्थानिक पोलिसांनी आरोपींना तातडीने घटनास्थळावरून पकडले, असे त्यागी यांनी सांगितले. आलिया, अलशिया, अक्सा आणि रहमान अशी मृतांची नावे आहेत. या सर्व अर्शदच्या बहिणी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पाचवी आसमा ही आरोपीची आई आहे.

अर्शद हा मूळ आग्रा येथील रहिवासी असून, घरगुती वादातून त्याने हे पाऊल उचलल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आल्याचे पोलिस उपायुक्तांनी सांगितले. पुरावे गोळा करण्यासाठी न्यायवैद्यक पथके गुन्ह्याच्या ठिकाणी तैनात करण्यात आली. या प्रकरणाची सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली आहे, असे त्या म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# अभिलाषावृद्धीची स्पॅडेक्स मोहीम

इस्रो अर्थात भारताची अंतराळ संशोधन संस्था दिवसाकाठी भारताच्या शिरपेचात एकाहून एक सरस अशी यशाची पिसे खोवत चालली आहे. एकामागून एक प्रयोग आणि उपग्रह प्रक्षेपण मोहिमा यशस्वी करणाऱ्या इस्रोने अंतराळ संशोधन क्षेत्रात भारताला प्रगत देशांच्या मांदियाळीत नेऊन बसविले आहे. इस्रोचे सारे नियोजित प्रयोग यशस्वी ठरत असून, या संस्थेने बजावलेल्या मोहिमा अतिप्रगत आणि जगाला आव्हान देणाऱ्या ठरत आहेत. इस्रोने ३० डिसेंबरला रात्री स्पॅडेक्स मोहिमेचे यशस्वी प्रक्षेपण करून, अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात इतिहास घडविला. विश्वसनीय ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपकावरून स्पॅडेक्स ही स्पेस डॉकिंग मोहीम प्रक्षेपित करण्यात इस्रोने यश मिळविले. आजवर केवळ अमेरिका, रशिया आणि चीनलाच अवगत असलेले हे तंत्रज्ञान आत्मसात करून भारताने या प्रगत देशांशी बरोबरी साधली आहे. इस्रोच्या अध्यक्षांनी तर या कामगिरीचे 'मैलाचा दगड' म्हणून कौतुक केले आहे. आजवर चित्रपट रसिकांनी अंतराळ संशोधनावर आधारित हॉलिवूडच्या इंटरस्टेलर चित्रपटामध्येच डॉकिंग सिस्टिम कशी काम करते, याचा अनुभव घेतला होता. आता प्रत्यक्ष डॉकिंग सिस्टिमच आपल्या संशोधनाचा भाग बनवून भारताने प्रगतिशील देशांसोबतच अग्रगत देशांच्याही मनात या तंत्रज्ञानाबाबत इच्छा, आकांक्षा जागविल्या आहेत. अंतराळात एका यानातून दुसऱ्या यानात प्रवेश करण्यासाठी या सिस्टिमचा उपयोग केला जातो. अंतराळ मोहिमा वाढल्याने भविष्यात ही सिस्टिम मोलाची ठरणार आहे. काळाची पावले ओळखून इस्रोने हे मोठे पाऊल उचलले आहे. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपित करण्यात आलेले स्पॅडेक्स अंतराळयान निर्धारित कक्षेत पोहोचले असून, आता इस्रोची नजर डॉकिंग आणि अनडॉकिंगच्या प्रयोगावर केंद्रित झाली आहे. अंतराळात एका अंतराळयानाला दुसरे अंतराळयान जोडण्याला 'डॉकिंग', तर जोडलेले दोन अंतराळ यान वेगळे होण्याला 'अनडॉकिंग' म्हणतात. या मोहिमेंतर्गत अंतराळ यानाला 'डॉक' आणि 'अनडॉक' करण्याच्या भारताच्या क्षमतेची चाचणी होणार आहे. अंतराळात ज्यावेळी एखादी मोहीम पार पाडण्यासाठी अनेक रॉकेट प्रक्षेपित करणे आवश्यक असते, त्यावेळी 'इन-स्पेस डॉकिंग' तंत्रज्ञानाची आवश्यकता असते. त्यानुसार स्पॅडेक्स मिशन अंतर्गत अंतराळात पाठवलेल्या दोन उपग्रहांपैकी चेझर आणि लक्ष्य हे पृथ्वीभोवती २८ हजार ८०० किलोमीटर वेगाने प्रदक्षिणा घालणार आहेत. दोन्ही एकाच कक्षेत एकाच गतीने बसवले जातील. आकाशात एका विमानातून दुसऱ्या विमानात इंधन भरण्याची प्रक्रिया भारताला अवगत आहे. मात्र विमानांचा वेग ताशी ७०० ते ८०० किलोमीटर असतो. दोन विमानांमधील इंधन भरण्याची प्रक्रिया स्वयंचलित यंत्रणेद्वारे संचालित केली जाते. पण डॉकिंग तंत्रज्ञान अतिशय जटिल आणि आव्हानात्मक असून, यामध्ये ताशी २८ हजार ८०० किलोमीटर वेगाने जाणारे उपग्रह जोडावे लागणार आहेत. ही आव्हानात्मक प्रक्रिया सात दिवसांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यासाठी ७ जानेवारी ही तारीख निर्धारित करण्यात आली असून, त्यासाठी साऱ्या जगाचे त्याकडे लक्ष लागले आहे.

चांद्रयान-४ आणि भविष्यातील भारतीय अंतराळ स्थानकासारख्या दीर्घकालीन मोहिमांसाठी डॉकिंग तंत्रज्ञान मोलाचे ठरणार आहे. सोबतच गगनयान मोहिमेसाठी देखील हे तंत्रज्ञान महत्त्वपूर्ण मानले जात आहे. हे तंत्रज्ञान स्पेस रोबोटिक्ससारख्या भविष्यातील प्रयोगांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. भारतासाठी हा दिवस अभिमानाचा ठरला असला तरी यामागे राजकीय इच्छाशक्तीदेखील महत्त्वाची ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षांत उचललेली पावले आणि शास्त्रज्ञांना धीर देण्याच्या त्यांच्या भूमिकेमुळे आजचा दिवस उजाडला आहे. इस्रोच्या अनेक मोहिमांचे पंतप्रधान स्वतः साक्षीदार ठरले आहेत. विदेशात असले तरी ते इस्रोच्या मोहिमांवर जातीने लक्ष ठेवून असतात, याचा अनुभव भारतीयांनी घेतला आहे. त्यांचे शब्द शास्त्रज्ञांसाठी मंत्राचे काम करीत असतात. जय जवानचा नारा देऊन ते थांबत नाहीत. दर वर्षी दिवाळीला सीमेवर जाऊन ते लष्करी जवानांच्या आनंदात सहभागी होतात. जय किसान हा त्यांचा नारा शेतकऱ्यांच्या जनकल्याणासाठीचा आहे. देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार याच मंत्रजपापोटी महिन्यावारी धान्य आणि किसान सन्मान निधी देत आहे आणि आता त्यांनी जय विज्ञानचाही मंत्रघोष केला असून, त्याद्वारे देशातील शास्त्रज्ञांचे मनोबल वाढविले आहे. चांद्रयान-२ मोहीम अपयशी ठरल्यानंतर मोदींनी इस्रो प्रमुखांची पाठ थोपटून जी सांत्वना दिली, ती साऱ्या जगाने बघितली. त्यातून भारतीय शास्त्रज्ञांचा उत्साह वाढला आणि नवसंकल्पना यशस्वी करण्याची मालिकाच उभी झाली. यात महिला शास्त्रज्ञांचीही भूमिका महत्त्वाची ठरली.

१९६२ साली डॉ. विक्रम साराभाई यांच्या अध्यक्षतेत जेव्हा इस्रोची स्थापना झाली, तेव्हा त्यांच्याकडे मोजक्याच शास्त्रज्ञांची चमू होती आणि संस्थेला पुरेसे आर्थिक पाठबळही नव्हते. भारताने पहिला उपग्रह जेव्हा प्रक्षेपित केला तेव्हा लॉंचिंग पॅडपर्यंत त्याचे पार्ट्स सायकलवरून न्यावे लागले होते, याची छायाचित्रे आपण साऱ्यांनी बघितली आहेत. पण तेव्हाचा आणि आजचा जमाना यात बरेच अंतर आहे. आज आपण चंद्रावर आणि मंगळावर जाण्याच्या मोहिमा आखत आहोत. इस्रोने तर व्यावसायिकदृष्ट्या मोठी कमाई करून देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावला आहे. इस्रोने युरोप आणि अमेरिकेच्या अंतराळ मोहिमांद्वारे सुमारे ४२७ दशलक्ष डॉलर्स कमावलेले आहेत. भारतीय रुपयात याची किंमत ३६०० कोटी असल्याचा खुलासा केंद्रीय अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी केला आहे. इस्रोचे हे व्यावसायिक उड्डाण भारताला येत्या काळात आणखी मोठा महसूल मिळवून देणार आहे. इस्रो २०२५ च्या पहिल्या सहामाहीत पाच व्यावसायिक प्रक्षेपण करणार आहे. श्रीहरिकोटा येथून प्रक्षेपित केलेली पीएसएलव्ही-६० ही इस्रोची ९९ वी मोहीम होती. याच महिन्यात १०० व्या मोहिमेचा टप्पा इस्रो गाठलेला दिसू शकतो. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. आजवर चंद्रावर कोणीही मालकी हक्क सांगितलेला नाही. भारताच्या स्पॅडेक्स मोहिमेकडे २०४० पर्यंत मानवाला चंद्रावर उतरवण्याच्या दृष्टीने टाकलेले बळकट पाऊल म्हणून पाहिले जात आहे. स्पॅडेक्स या डॉकिंग यंत्रणेला इंडियन डॉकिंग सिस्टिम असे नाव देण्यात आले आहे. इस्रोने या प्रणालीचे पेटेंटही घेतले आहे. आतापर्यंत कोणत्याही देशाच्या अंतराळ संशोधन संस्थेने या अत्यंत गुंतागुंतीच्या प्रक्रियेचा तपशील जाहीर न केल्यामुळे भारताने आपली स्वतःची डॉकिंग यंत्रणा विकसित केली आहे. या मिशनपुढे आव्हानेही आहेत. सर्वांत मोठे आव्हान दोन उपग्रहांना पृथ्वीच्या कक्षेत मिलिमीटर स्तराच्या अचूकतेसोबत जोडण्याचे आहे. नजीकच्या काळात दोन्ही उपग्रहांदरम्यान संचार आणि नेव्हिगेशन डाटाचे आदानप्रदान सुरळीतपणे कसे होईल, यावर जिकिरीने काम करावे लागणार आहे. ऑटोमॅटिक डॉकिंगसाठी अत्याधुनिक सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरची आवश्यकता इस्रो कशी पूर्ण करते, हेदेखील बघावे लागणार आहे. १९६३ मध्ये इस्रोने पहिल्या रॉकेटचे प्रक्षेपण केले होते. आर्यभट्ट हा भारताचा पहिला उपग्रह १९७५ साली प्रक्षेपित झाला होता. त्यानंतर भारताने एसएलव्ही-३ हे भारतीय बनावटीचे पहिले रॉकेट विकसित केले. पीएसएलव्ही, जीएसएलव्ही, चांद्रयान-१, मंगळयान, चांद्रयान-२ या मोहिमांचा प्रवास भारतीयांसाठी स्वप्नवत आहे. आपल्याला अवकाश तंत्रज्ञानाचे दारोदार भटकण्याचा काळ आता गेला आहे. आता आपणच विकसनशील देशांसाठीच नव्हे तर विकसित देशांसाठीही तारणहार ठरत आहोत. तिसरे जग तर भारतीय अंतराळ तंत्रज्ञानावर फिदा आहे. भूकंप, वादळे, पूर, हवामानातील चढ-उतार आदी नैसर्गिक आपत्तींच्या पूर्वनिर्धारणात तिसऱ्या जगाला भारताची मोठी मदत होत आहे. भारताची मदत देशाला गुलामीत ढकलणारी नसते, त्याची फारशी किंमत चुकवावी लागत नाही, हे सर्वमान्य झाल्यानेही शेजारी देश इस्रोकडे आशेने बघत आहेत. स्पॅडेक्स मोहिमेच्या निमित्ताने त्यांच्या अभिलाषांची पूर्ती करण्याचे सामर्थ्य इस्रोला निश्चित प्राप्त होईल, ही खात्री आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# भोळसट दिशाभूल...

आटपाट नगर होते. तिथे तथाकथित लोकशाही पद्धती होती. लोक, आपल्यावर राज्य कोणी करावे हे तिथे ठरवत असत. त्यासाठी तिथे म्हणे जनतेचे मत विचारात घेतले जात असे. एकदा जनतेला कोणी राज्य करावे हे नीट ठरवता आले नाही. त्याचा फायदा घेत त्या देशातील सर्वांत श्रीमंत अशा राजकारण करणाऱ्या महिलेला अचानक आतला आवाज ऐकू आला. आणि कुणाच्याही ध्यानीमनी नसलेल्या पण त्या श्रीमंत महिलेशी व तिच्या घराशी एकनिष्ठ असलेल्या एका अधू दृष्टीच्या माणसाला राजा केले गेले. आता सिंहासनावर बसल्यानंतर तरी हा दृष्टिहीन मिळमिळीत माणूस अंगी अवसान आणून त्याची आधीची कारकीर्द पाहून, काही चांगले काम करेल अशी भोळ्याभाबड्या जनतेची अपेक्षा होती. पण राजा म्हणून वा नेता म्हणून कोणतेच गुण नसलेल्या, मात्र जनतेच्या भोळसटपणाचा फायदा घेत पुन्हा पुन्हा तिला जाणीवपूर्वक तयार केलेल्या आपल्या खोट्या प्रतिमेच्या आधारावर फसवण्यात नव्या राजाचे कौशल्य वादातीत होते. त्याच आधारावर आणि एका परिवाराच्या पायाशी वाहिलेल्या निष्ठांमुळे त्याने या आधी देखील अनेक महत्त्वाच्या पदांवर आपली वर्णी लावून घेतली होती. आता नवा राजा, जो श्रीमंत महिलेच्या हातातील खेळणे होता, कारभार करू लागला. या नगरात सुनियोजितपणे तयार करण्यात आलेली इको-सिस्टिम, त्याची भलावण करून आपले उखळ पांढरे करून घेऊ लागली. सामान्य जनतेच्या आकलनाबाहेर असलेल्या कोणा एका शास्त्रातील त्यांच्या मोठ्या ज्ञानाचे आणि अधिकाराचे कौतुक केले जाऊ लागले. जनता, राजा आणि ती श्रीमंत महिला सगळेच सुखी झाले.

इतर नगरांमध्ये आपल्या नगराच्या हेरांचे जाळे प्रत्येकच राजा विणत असतो. तसेच जाळे या नगराने देखील विविध नगरांमध्ये तयार करण्यात यश मिळविले होते. यात त्याच्या आधीच्या राजांचे मोठे योगदान होते. अचानक एका देशी या नगराच्या असलेल्या हेरांच्या जाळ्याबद्दलची माहिती त्या देशीच्या संरक्षण यंत्रणेला देण्यात आली. आणि त्या नगराने आपल्या प्रदेशातील ते जाळे लागलीच उद्ध्वस्त केले. अनेक हेरांना ठार केले गेले, काही तुरुंगात डांबले गेले तर काही परागंदा झाले. आपल्या राजाच्या नगराच्या हेरगिरी संस्थेने चौकशी केली असता ही माहिती उघडकीस आणण्यात, आपल्याच नगराच्या तेथील राजदूताचा हात असल्याचे लक्षात आले. तसे अहवाल तोंडी पद्धतीने राजाला देण्यात आले. आता यावर खरं म्हणजे देशद्रोहाचा आरोप, अटक आणि खटला चालायला हवा होता. गादीवर बसवलेला या मिळमिळीत राजाने देश, राष्ट्र म्हणून काहीही विचार न करता उलट त्या राजदूतालाच बढती देऊन नगराचा उपाध्यक्ष केले. थोडे दिवस नगरातील लोकांनी ओरडाआरड केली. पण जनप्रतिनिधिगृहात असलेल्या बहुमताच्या आधारावर आणि स्वच्छ प्रतिमेच्या जोरावर राजाची वेळ निभावली गेली. जनता लवकरच सगळे विसरून गेली. उपाध्यक्ष झालेला हा राजदूत शत्रुराष्ट्राचा हेर असल्याचे आरोप पुढेही होत राहिले. राजाने मात्र राष्ट्रहिताचा विचार न करता मौन धारण करणेच श्रेयस्कर मानले.

काळ उलटत गेला. तिसऱ्याच एका नगरात आयोजित केलेल्या एका बैठकीसाठी राजाला आमंत्रित केले गेले. तेथे शेजारी पण शत्रू नगरीचा मुख्य प्रधान येणार होता. राजाने त्या प्रधानाबरोबर द्विपक्षीय वाटाघाटी, चर्चा आणि द्विपक्षीय समझोता असा कार्यक्रम आखला. बंद दाराआड राजाने त्या नगराच्या प्रधानाशी बोलणी केली. त्या नंतर दोघांनी एकत्र पत्रकार परिषद घेतली. त्यात या राजाने पत्रकारांना आम्ही एकमेकांच्या नगरांत कारवाया करायच्या नाहीत असे ठरविले आहे असे सांगून टाकले. एका पत्रकाराने त्यावर प्रश्न विचारला की, याचा अर्थ तुम्ही आमच्या नगरात या आधी कारवाया करीत होतात असा घ्यायचा का, त्यावर राजा नेहमीप्रमाणे मौनात गेला. एकप्रकारे या आधी आपण शेजारी नगरात कारवाया करीत होतो अशीच ही कबुली होती. काही नगरभक्तांनी राजाच्या वक्तव्यावर आणि मौनावर टीकेची झोड उठवली, परंतु श्रीमंत महिला आणि तिच्या कुटुंबाच्या पाठिंब्यावर राजा गादीवर टिकून राहिला. मग या राजाला नगरातले लोक मौनीबाबा म्हणू लागले. राजात काही दम नाही हे त्याच्या आगेमागे झुलणाऱ्या साथीदारांच्या एव्हाना लक्षात आले होते. मग ज्याच्या हाती जे लागेल ते तो साथीदार हडप करू लागला. कर्तृत्वहीन, निष्क्रिय राजा मग सगळ्या घोटाळ्यांकडे दुर्लक्ष करू लागला. त्याला काही झाले तरी खुर्चीची ऊब सोडायची नव्हती.

मग त्या नगरात एकामागोमाग एक घोटाळे उघडकीस येऊ लागले. कोळसा, जमीन, हाऊसिंग बॉण्ड, चिट फंड, अशा विविध क्षेत्रांत घोटाळे आणि संपत्ती हडप करणे नगरात सुरू झाले. याच काळात राजाने एक मोठी खेळांची स्पर्धा नगरात घेण्याचे ठरविले. या खेळांच्या आयोजनात देखील प्रचंड मोठा घोटाळा आणि आर्थिक अफरातफर उघडकीस आली. राजा श्रीमंत महिलेचा आणि घराण्याचा कृतज्ञ राहण्याच्या प्रयत्नात सर्वसामान्य जनतेशी कृतघ्न होत गेला. श्रीमंत महिला आणि कुटुंबाप्रति असलेल्या आपल्या निष्ठा दाखवण्याच्या प्रयत्नात राजा म्हणून आपल्या असलेल्या कर्तव्यांकडे आणि अधिकारांकडे पाठ करून, फक्त स्वतःला निष्कलंक राखण्यासाठी मग रेनकोट घालून बाथरूममध्ये शिरणाऱ्या माणसासारखा या साठमारीत गुंतलेल्या लोकांमध्य अंग चोरून वावरू लागला. त्याच वेळी सहजपणे लोकांच्या डोळ्यात येणार नाही अशा प्रकारे विविध फायदे तो स्वतःसाठी आणि आपल्या कुटुंबीयांसाठी न चुकता घेत राहिला.

त्यातच एकदा राजकारणातील गुन्हेगारी नियंत्रित करण्यासाठी राजा आणि त्याच्या मंत्रिमंडळाने आणलेला अध्यादेश श्रीमंत महिलेच्या लाडक्या मुलाने भर सभेत, हजारो लोक, पत्रकार व टीव्हीसमोर फाडून टाकला. लोकांना वाटलं राजा यावर योग्य ती कारवाई करेल. कारण हा संपूर्ण व्यवस्थेचा जाहीर अपमान आहे. पण राजा निमूटपणे, काहीही न करता आपल्या ऊबदार खुर्चीत बसून होता. आता जनता राजाच्या राजेपणाकडे एक अपघात म्हणून पाहू लागली. काही लोकांना त्याच्या कोडगेपणाचे आश्चर्य वाटू लागले. याच काळात नगरात ठिकठिकाणी बॉम्बस्फोट होत होते. निष्पाप नागरिकांचे हकनाक जीव जात होते. संरक्षण व्यवस्था खिळखिळी झाली होती. पण राजा पांढरे कपडे घालून मौन होता. हे सगळे घडत असताना नगराच्या सैन्याने देश संरक्षणासाठी राजाकडे मागितलेले आधुनिक युद्ध साहित्य तर सोडाच, सीमेवर आणि सीमेच्या आत लढणाऱ्या सैनिकांना बुलेटप्रूफ जॅकेट देखील एवढ्या तज्ज्ञ, अभ्यासू, विद्वान, सुसंस्कृत राजाने दिली नाही. काहीही चांगले करण्याची अथवा राजसिंहासनाची ऊब सोडण्याची देखील मानसिकता राजाने कधी दाखविली नाही. शेवटी नगराची जनता कंटाळली आणि पहिली संधी मिळताच तिने राजा, त्याची विचारधारा, आतला आवाजवाली श्रीमंत महिला यांना बाजूला सारले. नव्या कर्तृत्ववान, कर्तव्यदक्ष, धाडसी, नव्या विचारधारेच्या माणसाला लोकशाही मार्गाने राजसिंहासनावर बसवले. जुना राजा तेव्हा बाजूला झाला. नव्या राजाची धडाडी, निर्णयक्षमता याचे त्याने एकदोनदा, श्रीमंत महिलेला घाबरत घाबरत कौतुक केले. पण घेतलेले मौन व्रत आणि नाकर्तेपणा मात्र सोडला नाही. आता राजा जनतेच्या विस्मृतीत गेला होता. एक दिवस राजा मृत्यू पावला. अनेक लोक राजाला लागलीच मितभाषी, सुसंस्कृत, अभ्यासू, विद्वान म्हणून पुन्हा गौरवण्यात मग्न झाले. निर्भीड, निःस्पृहपणे राजाच्या आयुष्याचे विश्लेषण केले तर राजाने नगराची सेवा कधी केलीच नाही, केलीच असेल तर त्या श्रीमंत महिलेची आणि तिच्या परिवाराची केली असंच म्हणावं लागेल. 'मरणान्तानि वैराणि' म्हणत राष्ट्राची मौल्यवान अशी दहा वर्षे वाया घालवणाऱ्या माणसाचे मृत्युपश्चात कौतुक करणे याला त्या नगरातील जनतेचा भोळसटपणा मानावा की मूर्खपणा हा प्रश्नच आहे.

९८८१२४२२२४

## वेध

**हेमंत सालोडकर**

# नव्या वर्षात देशापुढील आव्हाने आणि संधी

नवीन वर्षाचा दुसरा दिवस उजाडला आहे. सरत्या वर्षाला निरोप आणि येणाऱ्या वर्षाचा स्वागत सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला. नवीन वर्षही मागील अनेक वर्षांप्रमाणे इतिहासजमा होईल. पण येणारा प्रत्येक दिवस हा प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, गाव, शहर, जिल्हा, राज्य आणि देशासाठी काहीतरी नवीन आव्हान आणि संधी घेऊन येत असतो. काही जण यातून धडा घेतात तर काही जण हे नेहमीचेच आहे, असे म्हणून दुर्लक्ष करतात. यातून जे खरोखर शिकतात ते नक्कीच प्रगती आणि विकासाच्या मार्गावर अग्रेसर होतात आणि जे दुर्लक्ष करतात त्यांची वाट तेथेच अवरुद्ध होते.

आपण काहीतरी नवीन शिकले पाहिजे, इतरांच्या बरोबरीने राहिले पाहिजे असा विचार करणारे समाजासोबत मार्गक्रमण करत असतात. ज्यांना 'देगा हरी पलंगावरी'ची सवय असते ते एकाच ठिकाणी चिकटून बसतात. आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. या साडेसात दशकात भारताने अनेक आव्हाने लीलया पेलली आणि काही आव्हानांचे संधीत रूपांतर केले. त्यातही विजयश्री मिळवली आहे. आज भारत जगात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैकी एक आहे. सर्व जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. भारत काय करतो, कोणत्या क्षेत्रात मुसंडी मारतो याकडे जवळपास संपूर्ण जग बघत असते. अशी स्थिती खरोखरंच काही वर्षांपूर्वी होती का, याचा विचार केला तर त्याचे उत्तर 'नाही' असेच मिळेल. भारताने आज पृथ्वी ते आकाश, समुद्र ते अंतरिक्ष, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, ज्ञान-तंत्रज्ञान, विज्ञान, कृषी अशा सर्वच क्षेत्रांत नेत्रदीपक कामगिरी केली आहे. असे असले तरी अजून बराच पल्ला गाठायचा आहे. रोज नवीन आव्हाने आणि नवीन संधी आपल्यापुढे असतात. अंतर्गत बाबींसोबत जागतिक पटलावर काय सुरू आहे, याकडेही भारताची नजर असते. देशाला लाभलेले नेतृत्व कसे आहे, त्याची दूरदृष्टी कशी आहे, तसेच पुढील



कितीतरी वर्षांचा अंदाज बांधून त्यावर काम करणारे नेतृत्व लाभल्यामुळेच आज भारताचा डंका जागतिक स्तरावर वाजत आहे. आज भारत पायाभूत सुविधा, रस्ते, सौर ऊर्जा या क्षेत्रात आघाडीवर आहे. प्रत्येक घरावर सोलर पॅनेल दिसत आहे. अशा दूरदृष्टीचा विचार यापूर्वी कोणीच केला नव्हता. त्यावेळीही सूर्य होता, त्यापासून मिळणारे लाभही घेता येऊ शकत होते, पण त्यासाठी लाभणारी दृष्टी कोणाकडेच नव्हती. आता सौर ऊर्जेचा उपयोग शेतकरी, कष्टकरी ते कामकरी सर्वांना होत आहे. ही सर्व अनुकूल स्थिती असली तरी भारतात गरिबी आणि उत्पन्न असमानता ही गंभीर समस्या आहेत. देशात दारिद्र्यरेषेखाली राहणारी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यात मोठी दरी आहे. ही दरी सामाजिक एकता आणि समावेशक विकासाला आव्हाने निर्माण करते. मागील काही वर्षांपासून अनेक तरुणांना स्टार्टअप, मुद्रा लोन यासारख्या योजनांमुळे हाताला काम मिळू लागले आहे. काही युवक तर इतरांना रोजगार देत आहेत. त्यामुळे अनेकांच्या पोटाचा प्रश्न मिटला आहे. पण अशा युवकांची संख्या फार कमी आहे. आजही अनेक युवा बेरोजगार आहे. त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे त्यांची डोकी भडकवून त्यांना वाईट मार्गाकडे वळवण्याचा प्रयत्न देशविरोधी लोक करतात. त्यांना पैशाचे आमिष दाखवून कोणत्याही आंदोलन उभे केले जाते. पहिले घोषणाबाजी, नारेबाजी, नंतर दगडफेक, जाळपोळ अशा हिंसक कृत्यासाठी त्यांचा उपयोग केला जातो. हे टाळण्यासाठी हाताला काम, पोटात अन्न या दोन गोष्टींकडे सरकारला लक्ष द्यावे लागेल. भ्रष्टाचार आणि लालफीतशाही यावर लगाम कसावा लागेल. आज दवाखान्याचा खर्च सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर झाला असताना, आरोग्यसेवेवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

आधुनिकता आणि विदेशीची सांगड घालतानाच स्वदेशीचा मोठ्या प्रमाणावर पुरस्कार करून आयात टाळता येऊ शकते. त्यामुळे विदेशात जाणारे भारतीय चलन रोखता येईल आणि देश आर्थिकदृष्ट्या मजबूत होईल. आज लहान खेड्यांमध्ये अनेक लघुउद्योग सुरू असतात. त्यांना चालना देऊन, तेथील कारागिरांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या हातात पैसा खेळता राहील. लष्कर, ज्ञान, तंत्रज्ञान, कृषी, रस्ते निर्मिती, आत्मनिर्भर भारत निर्माणासाठी नवीन वर्ष नक्कीच सकारात्मक राहील, अशी प्रत्येक देशवासीयाला खात्री आहे.

९८५०७५३२८१

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# डॉ. मनमोहनसिंगांच्या स्मारकाचे अनावश्यक राजकारण

माजी पंतप्रधान आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. मनमोहनसिंग यांच्या अन्त्यसंस्कार स्थळाचे तसेच स्मारकाच्या मुद्याचे राजकारण करत काँग्रेसने अनावश्यक वाद निर्माण केला आहे. डॉ. मनमोहनसिंग यांचा अन्त्यसंस्कार अशा ठिकाणी करावा, जिथे त्यांचे स्मारक उभारता येईल, अशी मागणी काँग्रेसने केली होती. असे करत त्यांचा अन्त्यसंस्कार राजधानी दिल्लीतील यमुना नदीच्या किनाऱ्यालगतच्या राजघाट परिसरात करण्यात यावा, अशी अप्रत्यक्ष मागणी काँग्रेसने केली. मात्र डॉ. मनमोहनसिंग यांचा अन्त्यसंस्कार निगमबोध घाटावर करण्यात आल्यामुळे मोदी सरकारने देशातील पहिल्या शीख पंतप्रधानाचा अपमान केल्याचा आरोप काँग्रेसने केला. राजघाटवर अन्त्यसंस्कार हे काही प्रतिष्ठेचे आणि राजकीय मोठेपणाचे लक्षण नाही. मोदी सरकारने डॉ. मनमोहनसिंग यांचा अन्त्यसंस्कार राजकीय इतमामात केला. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि पंतप्रधान, अनेक केंद्रीय मंत्री तसेच तिन्ही सेनादलांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. त्यामुळे मोदी सरकारने शीख पंतप्रधानांचा अपमान केला, हा काँग्रेसचा आरोप खोडसाळ आणि हास्यास्पद असा म्हणावा लागेल. सामान्यपणे राजघाट परिसरात घटनात्मक पदांवरील व्यक्तींचा म्हणजे राष्ट्रपती, पंतप्रधान आणि अन्य मान्यवरांचा अन्त्यसंस्कार होतो. मात्र याठिकाणी घटनात्मक पदांवर नसलेल्या काही अपवादात्मक राजकीय नेत्यांवरही अन्त्यसंस्कार झाला आहे. सर्वांत पहिल्यांदा याठिकाणी राष्ट्रपिता महात्मा गांधींचा अन्त्यसंस्कार झाला. महात्मा गांधी संपूर्ण देशासाठी पूजनीय तसेच राष्ट्रपिता असले तरी ते कोणत्याही घटनात्मक पदावर नव्हते. महात्मा गांधींची समाधी राजघाट म्हणून ओळखली जाते. परदेशातील राष्ट्रप्रमुख आणि पंतप्रधान देशात आल्यावर राजघाटला भेट देत असतात. राजघाटवर अन्त्यसंस्कार झालेली पण घटनात्मक पदावर नसलेली दुसरी व्यक्ती संजय गांधी होते. विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर खासदार असलेल्या संजय गांधींचा या परिसरात अन्त्यसंस्कार करण्यात आला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींचे पुत्र एवढाच त्याचा यासाठी निकष म्हणावा लागेल. राजघाटवर आतापर्यंत ४ माजी राष्ट्रपती, ८ माजी पंतप्रधान आणि दोन माजी उपपंतप्रधानांवर अन्त्यसंस्कार झाले. ग्यानी झैलसिंग, शंकरदयाल शर्मा, के. आर. नारायणन् आणि आर. व्यंकटरमन् या चार माजी राष्ट्रपतींच्या पार्थिवावर राजघाट परिसरात अन्त्यसंस्कार झाला. तसेच त्यांच्या समाध्या या भागात आहेत. पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पार्थिवावरही राजघाट परिसरात अन्त्यसंस्कार करण्यात आला. त्यांची समाधी 'शांतिवन' म्हणून ओळखली जाते. दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री याची या परिसरात असलेली समाधी 'विजयघाट' म्हणून ओळखली जाते. देशाचे पंतप्रधानपद भूषवलेले गांधी घराण्यातील इंदिरा गांधी आणि त्यांचे पुत्र राजीव गांधी यांच्या पार्थिवावरही या परिसरातच अन्त्यसंस्कार करण्यात आला होता. इंदिरा गांधींची समाधी 'शक्तिस्थळ' म्हणून, तर राजीव गांधींची समाधी 'वीरभूमी' म्हणून ओळखली जाते. चौधरी चरणसिंह, चंद्रशेखर तसेच इंद्रकुमार गुजराल या माजी पंतप्रधानांच्या पार्थिवावरही राजघाट परिसरात अन्त्यसंस्कार झाला होता. चरणसिंह यांची समाधी 'किसानघाट' म्हणून तर चंद्रशेखर यांची समाधी 'जननायक' स्थळ म्हणून परिचित आहे. इंद्रकुमार गुजराल यांचे समाधी-स्थळ 'स्मृतिस्थळ' म्हणून ओळखले जाते. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचीही समाधी या परिसरात आहे, जी 'सदैव अटल' नावाने सर्वांना परिचित आहे. देशाच्या दोन माजी उपपंतप्रधानांवरही राजघाट परिसरात अन्त्यसंस्कार करण्यात आला होता. जगजीवनराम आणि देवीलाल हे ते दोन नेते होते. खरं म्हणजे उपपंतप्रधान हे काही घटनात्मक असे पद नाही, तर ती राजकीय सोय आहे. देवीलाल यांच्या समाधी-स्थळाला नाव नसले तर जगजीवनराम यांचे समाधी-स्थळ 'समता स्थळ' म्हणून ओळखले जाते.

माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचे निधन झाल्यावर दिल्लीतील लोधी रोड स्मशानघाटात त्यांच्या पार्थिवावर अन्त्यसंस्कार करण्यात आला होता. आज डॉ. मनमोहनसिंग यांच्या पार्थिवावर निगमबोध घाटात अन्त्यसंस्कार झाल्यामुळे आकाशपाताळ एक करणाऱ्या काँग्रेस नेत्यांनी, प्रणव मुखर्जींवर लोधी घाटात अन्त्यसंस्कार झाला असताना तोंड उघडले नव्हते. त्यामुळेच काँग्रेसच्या या दुटप्पीपणावर प्रणव मुखर्जी यांच्या कन्येने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांचे तर राजधानी दिल्लीतच निधन झाले होते. त्यावेळी काँग्रेसच्या प्रमुख असलेल्या सोनिया गांधी यांनी त्यांच्या पार्थिवावर दिल्लीत अन्त्यसंस्कार होऊ दिला नव्हता. हैदराबादला त्यांच्या पार्थिवावर नाईलाजाने अन्त्यसंस्कार करावा लागला होता. हे कमी होते की काय म्हणून काँग्रेसचे अध्यक्षपद तसेच देशाचे पंतप्रधानपद भूषवलेल्या नरसिंहराव यांचे पार्थिवही सोनिया गांधींनी काँग्रेस मुख्यालयात येऊ दिले नव्हते. त्यामुळे यावेळी डॉ. मनमोहनसिंग यांच्या अन्त्यसंस्कारावरून मोदी सरकारवर आगपाखड करण्याचा कोणातही नैतिक अधिकार काँग्रेसला नाही. हैदराबादला नरसिंहराव यांचे पार्थिव अन्त्यसंस्कारासाठी पाठवताना दिल्लीत त्यांचे स्मारक उभारण्याचे आश्वासन काँग्रेसने दिले होते, पण ते पाळले नाही. त्यामुळे नरसिंहराव यांचे स्मारक मोदी सरकारने राजघाट परिसरात उभारले आहे. माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांचे २७ नोव्हेंबर २००८ ला दिल्लीतील अपोलो रुग्णालयात प्रदीर्घ आजारानंतर निधन झाले होते. २९ नोव्हेंबरला त्यांच्या पार्थिवावर अलाहाबादला (आताचे प्रयागराज) गंगा नदीच्या काठावर अन्त्यसंस्कार करण्यात आला होता. विशेष म्हणजे व्ही. पी. सिंग देशाचे असे एकमेव पंतप्रधान असावे ज्यांचे स्मारक देशात कुठेच नाही. देशातील पहिले गैरकाँग्रेसी पंतप्रधान आणि जनता पक्षाचे नेते मोरारजी देसाई यांचे १० एप्रिल १९९५ ला मुंबईत निधन झाले होते. त्यांच्या पार्थिवावर अहमदाबाद येथे साबरमती नदीच्या काठावरील अभयघाटावर अन्त्यसंस्कार करण्यात आला. राजघाटचा एकूण समाधी परिसर हा २४५ एकराचा आहे. काही काही नेत्यांच्या स्मारकासाठी कित्येक एकर जागेचा उपयोग करण्यात आला आहे. हे असेच सुरू राहिले तर राजघाट परिसरात काही वर्षांनी राजकीय नेत्यांच्या अन्त्यदर्शनासाठी जागाच उरणार नाही, हे लक्षात घेऊन, ज्या डॉ. मनमोहनसिंग यांच्या अन्त्यसंस्कारावरून काँग्रेस अकांडतांडव करत आहे, त्याच डॉ. मनमोहनसिंग यांनी राजघाट परिसरात राजकीय नेत्यांच्या स्मारकासाठी एक स्मृतिस्थळ बनवले होते. काँग्रेसने आपल्याच पक्षाच्या नेत्यांचा जसा अपमान केला, त्यांची जशी विटंबना केली, तशी करण्याची भाजपाची संस्कृती नाही. तसे असते तर मोदी सरकारने नरसिंहराव यांच्या स्मारकासाठी राजघाट परिसरात जागा दिली नसती. त्यामुळे मोदी सरकार डॉ. मनमोहनसिंग यांच्या स्मारकासाठीही राजघाट परिसरातच जागा देईल, यात शंका नाही. काँग्रेसने याचे राजकीय भांडवल करू नये, यातून त्यांच्या 'पंजा'त काहीच पडणार नाही.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### संसदेच्या कामकाजाचे टीव्हीवरील प्रसारण

नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासून म्हणजे २०१४ च्या निवडणुकीनंतरच संसदेच्या कामकाजाचे प्रसारण जनतेलाही दिसावे, संसदेत काय चालू आहे हे कळावे म्हणून प्रत्येक टीव्ही चॅनेलवरून प्रसारण दाखविण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी अशा प्रकारे पाहण्यात वा ऐकिवात नव्हते. संसदेत काय गोंधळ होतो हे फक्त वर्तमानपत्र वाचल्यानंतरच जनतेला समजत होते. पण २०१४ पासून राष्ट्रपतींचे भाषण, राष्ट्राचे आर्थिक उन्हाळी व हिवाळी अधिवेशन वा आर्थिक वर्षाचे बजेट, संसदेतील इतर अनेक कार्यक्रम प्रसारित होऊ लागले. पण ते पूर्णतः नाही. भाषण, बजेट व इतर कार्यक्रम असतील तर विशिष्ट व्यक्तीवरच संसदेतील कॅमेरा फोकस करून प्रसारित होत आहे. त्यामुळे फक्त विशिष्ट व्यक्तींचेच ते सत्ताधारी पक्षाचे असो वा विरोधी पक्षांचे असो तेच चेहरे टीव्हीवर दिसत असतात. विरोधकांनी केलेली आरडाओरड, नारेबाजी फक्त ऐकायला येत असते पण कोणत्या पक्षाचे लोक या अभूतपूर्व कार्यक्रमात सहभाग घेत आहे व कामकाजात व्यत्यय आणत आहे त्याचे दृश्य दिसत नाही. त्यावर कॅमेरा फोकस करून दाखविण्यात येत नाही. हे संसदेचे कामकाज संपूर्ण जगाला दिसावे यासाठी संसदेतील कॅमेरा, पक्ष व विरोधकांची जी लॉबी असते म्हणजे संपूर्ण संसदेत फिरवून दोन्ही पक्षांच्या खासदारांचे चेहरे टीव्हीवर दाखविण्यात आले तर बरे होईल. अन्यथा नुसती आरडाओरड ऐकू येईल. नागरिकांच्या समस्या मांडणारे कोण आणि गोंधळ घालणारे कोण हे सत्य समोर येईल.

**मधुसूदन भावे**/७६२०६२९७२८

●● ●●

### नियंत्रित वाहतूक एक आव्हान!

नागपूर शहरातील वाहतूक समस्या ही आता आव्हानात्मक झाली आहे. शहराचा विस्तार होत असून रस्त्यावर सर्व प्रकारच्या वाहनाची प्रचंड गर्दी वाढल्याने व चौकातील सिग्नल्स यांना कोणीही जुमानत नसल्याने जीव मुठीत घेऊन वाहन चालवावे लागत आहे. पायी चालणारे नागरिक तर दिसतच नाही. प्रत्येक चौकात वाहनांची प्रचंड कोंडी होते. त्यात रस्त्याच्या कडेला बसलेले विक्रेते, चौकानंतर मध्येच प्रवाशांना उतरविणारे सवारी ऑटोचालक, मोबाईलवर बोलणारे दुचाकीवाहक आणि कसेही, कुठूनही वाहन चालविण्याचे व्रत पाळणाऱ्या व जगाची घाई असलेल्या अति व्यस्त वाहनचालकांना कसे आवरावे हा खूप मोठा संशोधनाचा विषय आहे. चौकात वाहतूक नियंत्रित करणारे पोलिस कधी कधी दिसतात. सिग्नलवर एखादा मध्येच शिरून सावज शोधतो, त्याच्या वाहनाचा फोटो काढतो, त्याचे वाहन बंद करून चावी हातात घेतो आणि त्याला रस्त्याच्या कडेला बाजूला नेऊन शिकार करतो. त्यावेळेस त्याचे मोठे साहेब तिकडच्या भागात गस्तीवर असतील तर हा पोलिस त्वरित चालान तयार करून त्या वाहनचालकाला दंड ठोठावून मोकळा होतो. याविरुद्ध दृश्य असेल तर सावज कसा आहे? त्याने काय गुन्हा केला आहे? त्याचा दंड किती हजार होईल? वाहन जप्त करावे लागेल? इत्यादी नियम सांगून वाहनचालकाला मानसिक तयारी करायला वेळ देतो. त्याच्या मदतीला दुसरा पोलिस येऊन नागरिकशास्त्राचे धडे देतो. एव्हाना हा वाहनचालक त्यातील समजूतदार पोलिसांशी वाटाघाटी करून सुटलो एकदाचे! या आविर्भावात पुढे निघतो. एवढ्या वेळात रस्त्यावरील इतर वाहनचालक स्वतःहून नियंत्रित होतात आणि थोड्या वेळाकरिता का होईना आपल्याला पण सुकरपणे वाहन चालविण्याचा अल्पसा आनंद मिळतो.

**संजय पाठक**/नागपूर

●● ●●

### देशभक्तीची ऊर्जा देणारे अकोल्यातील हुतात्मा स्मारक

अकोला शहरात प्रवेश करताच शहरातील हुतात्मा स्मारक जाणाऱ्या येणाऱ्यांचे लक्ष वेधून घेते. अलिकडच्या काळात या स्मारकाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. स्मारकाच्या प्रवेशद्वारावर भारत-पाकिस्तान युद्धातील भला मोठा रणगाडा निवृत्त झाल्यानंतरही ताठ मानेने आपल्या दिव्य कामगिरीची प्रचीती देतो. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यास स्वातंत्र्य लढ्यात व विविध युद्धमोहिमेत हुतात्मा झालेल्या अकोला जिल्ह्यातील थोर सुपुत्रांची संपूर्ण माहिती व देशासाठी त्यांचं योगदान वाचून डोळ्यांच्या कडा पाणावल्याशिवाय राहात नाहीत. या स्मारकातील आणखी एक आकर्षण म्हणजे येथे स्वातंत्र्यलढ्यातील एक लोखंडी पाना संग्रही ठेवला आहे. स्वातंत्र्य लढ्यातील एका मोहिमेत रेल्वे रूळ उखडून टाकण्यासाठी हा पाना सावतराम मिलमध्ये काम करणाऱ्या आगरकर यांनी तयार करून क्रांतिकारकांना दिला होता. या पान्याचा उपयोग मिलिटरी ट्रेन पाडण्यासाठीच्या कटात केला होता असा ऐतिहासिक उल्लेख आहे. सभोवताल हिरवीगार वनराई, विविध रंगी फुलझाडे यामुळे वातावरणात वेगळीच प्रसन्नता येते. जड पावलांनी स्मारकाबाहेर पडताना देशभक्तीचा वारसा नकळत सोबत घेऊन जाताना 'कर चले हम फ़िदा जानो-तन साथियों' या देशभक्तीचे स्फुलिंग चेतवणाऱ्या ओळी नकळत ओठावर येतात.

**अखिल देशपांडे**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com



**दर्शनासाठी भाविकांची गर्दी...**
**सोलापूर : नवीन वर्षानिमित्त बुधवारी सकाळी शहरातील विविध मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती.**



**मध्यरात्री रंगल्या पार्ट्या...**
**सोलापूर : शहरात ३१ डिसेंबरच्या मध्यरात्री नवीन वर्षानिमित्त हॉटेलमध्ये नागरिकांनी जल्लोष केला.**

# चारे गावात वाघाचा धुमाकूळ

## ●गाईला गोठ्यातून ओढून नेऊन ठार मारले, नागरिक भयभीत



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १ जानेवारी-**

बार्शी तालुका व परिसरात वाघाच्या वाढत्या वावरामुळे आधीच भीतीचे वातावरण निर्माण झालेले असताना चारे गावातील प्रताप दत्तात्रय जगदाळे यांच्या गाईला वाघाने गोठ्यातून ओढून नेऊन ठार मारल्याची घटना समोर आली आहे. हल्ल्यात गाई जागीच मरण पावली असून, या घटनेमुळे चारे गावातील नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.

ही घटना मंगळवारी मध्यरात्री घडली, जेव्हा वाघाने गावातील प्रताप जगदाळे यांच्या गोठ्यातून गाईला ओढून आणले आणि काही अंतरावर ठार मारले. या घटनेमुळे नागरिक भयभीत झाले असून, रात्रीच्या वेळी घराबाहेर जाण्यासही लोक घाबरत आहेत.

या घटनेमुळे नागरिकांनी वनविभागाकडे त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली असून, वाघाचा बंदोबस्त लवकरात लवकर करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

तसेच हल्ल्यात नुकसान झालेल्या शेतकऱ्याला नुकसान भरपाई लवकरात लवकर द्यावी, अशीही मागणी गावकऱ्यांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून बार्शी तालुक्यात वाघ व बिबट्याच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्यामुळे शेतकरी व स्थानिक लोक भयभीत झाले आहेत. वन विभागाने या गंभीर परिस्थितीकडे लक्ष द्यावे व नागरिकांना संरक्षण देण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.



# ट्रॅक्टरची मोटारसायकलला धडक; १ ठार, १ जण गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ, दि. १ जानेवारी-**

आष्टी (ता. मोहोळ) येथे ऊस वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टरचा मोटार सायकलला धक्का लागून १ जण ठार तर १ जण गंभीर जखमी झाला आहे.

याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहिती नुसार ऊस वाहतूक करणार ट्रॅक्टर क्र एम एच ४५/ ए क्यू ०९८३ हा मौजे आष्टी हद्दीत आष्टी शुगर कारखान्याकडे जाणाऱ्या रोडवर जात असताना त्या ट्रॅक्टरचा मोटार सायकल क्र एम एच १३ / ई आर ५१४८ या वरून कृष्णा नाना गाडे व युवराज दिगंबर गाडे हे साखर कारखान्याकडे निघाले होते. त्यांच्या मोटार सायकलला ट्रॅक्टरची धडक लागली. त्यामुळे मोटार सायकल खाली पडली. यावेळी कृष्णा गाडे (वय २५, रा. आष्टी, ता. मोहोळ) हा रोडवर पडला. त्याचे डोक्यावरून टॅकरचे चाक गेलेने तो मयत झाला. तर त्याच्या सोबत असलेला युवराज दिगंबर गाडे हा गंभीर जखमी झाला त्यास पंढरपूर येथील हॉस्पीटल मध्ये उपचारासाठी पाठवण्यात आले.

हा अपघात १ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडला. यातील ट्रॅक्टर चालक दीपक विनायक जाधव (रा. मढा) यांच्याविरुद्ध मोहोळ पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार आदलिंगे करत आहेत.

## निधन वृत्त...

### कमल घोडके



**बार्शी, दि. १ जानेवारी-**

बार्शी येथील श्रीमती कमल रामचंद्र घोडके (वय ७८) यांचे वृद्धपकाळाने आज निधन झाले. त्यांच्यावर येथील मोक्षधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या. ॲड. संगिता देशपांडे यांच्या मातोश्री व अनिल देशपांडे यांच्या सासू होत.

### पार्वती सुरवसे



**चपळगाव, दि. १ जानेवारी-**

रविकिरण शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नागनाथ सुरवसे यांच्या मातोश्री पार्वती शंकर सुरवसे (वय९८ वर्षे) यांचे बुधवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे. बुधवारी रात्री जेऊर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली होती.

### पांडुरंग देशमुख



**टेंभुर्णी, दि. १ जानेवारी-**

टेंभुर्णीचे प्रगतिशील बागायतदार पांडुरंग भानुदास देशमुख यांचे (वय ८५) यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे.

### रोहित जाधव



**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

सैफुल परिसरातील रहिवासी रोहित जाधव (वय ३४) यांचे दि.१ जानेवारी रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात वडील, दोन भाऊ, पत्नी आणि दोन मुली असा परिवार आहे.



# सूरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे बाबुरावजी डिसले पुरस्कार जाहीर

**▸ सोमवारी वितरण : धनुर्विद्या प्रशिक्षक दीपक चिकणे यांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १ जानेवारी**

सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने दरवर्षी प्रदान केले जाणारे कै. बाबुरावजी डिसले स्मृती जीवन पुरस्कार आणि कै. शिवाजीराव डिसले स्मृती २०२४-२५चे जीवनगौरव पुरस्कार मंडळाचे अध्यक्ष रविंद्र कापसे यांनी जाहीर केले.

पुरस्कार वितरण सोहळा शिवाजीराव डिसले यांच्या ७१व्या जयंतीनिमित्त ६ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता अर्णव शिक्षण संकुल, सासुरे फाटा, वैराग (सोलापूर-बार्शी रोड) येथे होणार आहे. पुरस्कारांचे स्वरुप- सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल असे असल्याची माहिती मंडळाचे सचिव प्रताप दराडे यांनी दिली.

**सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्राचा सन्मान**

कै. बाबुरावजी आणि कै. शिवाजीराव डिसले यांच्या स्मृती जागवणारा हा पुरस्कार २१ वर्षांपासून विविध क्षेत्रातील मान्यवरांना त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी प्रदान केला जातो. निवडलेल्या व्यक्तींनी आपल्या क्षेत्रात समाजाला दिशा दिली आहे.

**असे आहेत पुरस्कारांचे मानकरी**

▸सामाजिक- नागनाथ मल्लिकार्जुन उंबरे, बावी (ता. बार्शी), ▸शैक्षणिक - मिरगणे विलास पांडुरंग, मळेगाव (ता. बार्शी), ▸क्रीडा- दिपक दत्तात्रय चिकणे (सोलापूर). ▸महिला भूषण- शुभदा अनिरुद्ध देशपांडे (सोलापूर). ▸सांस्कृतिक- दिपक बजरंग नलवडे, कोरफळे (ता. बार्शी). ▸पत्रकारिता- संजय जगन्नाथ बारबोले (बार्शी). ▸साहित्य - सोमनाथ मधुकर टकले, वडशिवणे (ता. करमाळा). ▸अध्यात्मिक - रामायणाचार्य ह.भ.प. राजन महाराज काशीद पिंपरीकर (ता. बार्शी). युवा ▸उद्योजक- तुषार आणि शुभांगी मोहन भोसले, रुई (ता. बार्शी). ▸समाजसेवा- राहुल आगरचंद धोका (कुर्डूवाडी). ▸कला- प्रदीप गोरख काळे (बार्शी).

# ठेकेदार, प्रकल्प संचालकांच्या चुकीमुळेच उळेगावचा पूल बनला अपघातप्रवण क्षेत्र!

**वाहनधारक, स्थानिक नागरिकांतून संताप**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

गेल्या काही वर्षांपासून अपघाताची मालिका सुरू असलेल्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगावच्या पुलावर मध्यंतरी ट्रकचा बर्निंग थरार झाल्यानंतर या महामार्गाचे नवीन प्रकल्प संचालक राकेश जावडे यांनी मनावर घेवून त्या पुलाची नव्याने उभारणी करण्याचा (मोठे करण्याचा) प्रस्ताव दिल्ली येथील त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. मात्र या पुलावर कसलेही मोठे वळण नसताना, मोठी झाडी नसताना तत्कालिन महामार्ग प्रकल्प संचालकांनी जुना लहान पूल पाडून नवीन पूल येथे बांधला नसल्यानेच या पुलावर गेल्या काही महिन्यांपासून अनेक अपघात झाले आहेत.

तत्कालिन ठेकेदार, अधिकाऱ्यांच्या चुकीमुळेच सध्या बॅरिकेटर्स लावून विनाकारण अपघात प्रवण क्षेत्राचे बोर्ड लावण्याची पाळी नूतन प्रकल्प संचालकांवर आली आहे. सोलापूर-धुळे महामार्गाची निर्मिती करताना उळेगावचा छोटा पुल नवीन असल्याने तेव्हा पाडला गेलाच नव्हता. पुल का पाडला नाही? का त्या पुलाच्या पैशाचा तत्कालिन गुत्तेदार, अधिकाऱ्यांकडून अपहार करण्यात आला का? याबाबतही उळेगावच्या स्थानिक नागरिक आणि काही वाहनधारकांतून उलट-सुलट चर्चा सुरू आहे. हा लहान पुल असल्याने या ठिकाणी २ वाहने अचानक अतीवेगाने आली तर बसत नाहीत. यामुळे एकतर ती वाहने एकमेकांवर आदळतात किंवा एक वाहन या पुलाच्या कठड्याला जोरात धडकते आणि अपघात होतो. येथील पुलावर गेल्या ३ ते ४ वर्षांपासून अशीच अपघाताची मालिका सुरू आहे.

यामुळे स्थानिक नागरिकांनी या पुलाची नव्याने उभारणी करण्यासाठी आंदोलनेही केली होती. ऑक्टोंबर २०२४ मध्ये एक मोठी ट्रक वेगाने येवून कठड्यावर अडकली आणि त्यामुळे गाडीला आग लागून आतील मालाचीही जळून राखरांगोळी झाली होती. त्यानंतर प्लॅस्टिकची बॅरेकेट, सिग्नल लावले आहेत. इतकेच कायतर महामार्गाच्या बाजूला दूरपर्यंत काही वाळूची पोती भरून टाकली आहेत. प्रकल्प संचालक जावडे यांनी अपघात प्रवण पुलावरून सुरळीत वाहतूक करण्यासाठी कायमचा तोडगा काढण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला आहे. त्यांचे आदेश येताच ६ महिन्यात या पुलाची नव्याने उभारणी करणार असल्याचे सांगितले.

**टोलनाक्यावरील वसुली मात्र जोरात**

सोलापूर-धाराशिव या महामार्गावर तामलवाडी येथील टोलनाक्यावर वाहनधारकांकडून टोल वसुली जोरात सुरू आहे. मात्र या पुलाचे कोणालाही अद्यापपर्यंत देणे-घेणे नव्हते. जेव्हा मोठा अपघात झाला तेव्हा महामार्गाची संबंधित यंत्रणा हलली आणि आता कोठे बॅरिकेटर्स लावून तात्पुरती मलम पट्टी करण्यात आली आहे.

**जाहिर प्रसिध्दीकरण**

तमाम लोकांना विशेषतः डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी शहर वैराग, व आसपासचे व त्या भागातील लोकांना या जाहिर नोटीस प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे वैराग येथील सि.स. नं. १५६ पैकी दक्षिण उत्तर कोपऱ्यातील क्षेत्र ४८.६० चौ.मी. याचा नगर पंचायत मिळकत नं. ३०९/१ ही मिळकत ओंकार गुरुनाथ भस्मे यांचे खरेदी कब्जे वहिवाटीची आहे. असे दर्शवून लोकांची फसवणूक करून सदर मिळकत विक्री करण्याचे विचारात आहेत. तसेच सदर मिळकतीबाबत तरुण भारत पेपरला दि. १२/११/२०२४ रोजी ॲड. श्री. मिलींद जयशंकर खुपसे व ऋषिकेश मिलींद खुपसरे, रा. वैराग यांचेमार्फत जाहिर नोटीस दिलेली आहे.

ती नोटीस व त्यामधील मिळकतीमध्ये आमचे पक्षकार श्री. राजेंद्र शिवरुद्र भस्मे यांचा हि न विभागलेला हिस्सा व हक्क एकत्रित कुटुंबामध्ये घेतली असलेने सदर मिळकती व बार्शी कोर्टात दावा चालू आहे. सदर मिळकतीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा गहाणखत, साठेखत, लिज वगैरे हस्तांतरणाचे व्यवहार करू नयेत. सदर मिळकतीबाबत कोणीही हस्तांतराचा व्यवहार केल्यास आमचे पक्षकाराचे न विभागलेल्या हिश्यावर बंधनकारक राहणार नाही कोणाची फसगत होवू नये म्हणून हे जाहिर प्रसिध्दीकरण नोटीस दिली असे.
दि. ०१/०१/२०२५

सही/-
ॲड. माणिकराव एल. मुंढे
जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी जि. सोलापूर
मो.नं. ९९२३९६८६५५
राजेंद्र शिवरुद्र भस्मे रा. वैरागतर्फे ॲड.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि. व सब डि. सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे कुंभारी ग्रामपंचायत हद्दीतील भुमापन गट नं. ५३०/२ पैकी लक्ष्मी नगरमधील प्लॉट नं. १० याचे क्षेत्र ३१५ चौ. मीटर अथवा ३३९० चौ. फुट इतकी आहे.

यासी चतुः सीमा :- पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस : स.नं.२६१/१, दक्षिणेस - रस्ता, उत्तरेस :- प्लॉट नं. ९ येणेप्रमाणे चतुःसीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील तदंगभुत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

ही मिळकत १. श्री. मनोहर मार्कंडेय जडल, २. सौ. गितांजली मनोहर जडल, दोघे रा.३४/२/८५, न्यु पाच्छापेठ, सोलापूर यांचे मालकीची असून त्यांनी ही मिळकत आमचे अशिलास खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती करारनामा लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री दिली आहे, तरीही नमूद प्लॉट जागेच्या संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.
दि. ०१/०१/२०२५

सही/-
अशिल : सौ. रेश्मा योगेश परमशेट्टी यांचे तर्फे
ॲड. राजरतन द. श्रीराम
ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५
मो.नं. ९८८१२४०५१६

**नावात बदल**

माझे जुने नाव **रामक्रीष्ण ताथुरकर** असे होते. ते बदलून नविन नाव **अबोली अमेय वडतकर** असे वाचण्यात यावे.
ऑफि. नं. (83/25)
दि. 01/01/2025



# महापारेषणच्या वार्षिक दिनदर्शिका २०२५ चे थाटात प्रकाशन

**मुंबई, दि. १ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या वार्षिक दिनदर्शिका-२०२५ चे प्रकाशन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या हस्ते थाटात झाले.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) तृप्ती मुधोळकर, संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) मंगेश शिंदे, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) कैलास कणसे, मुख्य अभियंता सुनील सूर्यवंशी, जुईली वाघ, मुख्य अभियंता (अभिकल्प) किशोर गरुड, महाव्यवस्थापक (मानव संसाधन-अतांत्रिक) राजू गायकवाड, उपमनितीन कांबळे, अभय रोही, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, अधीक्षक अभियंता ज्योती चिमटे, राजशिष्टाचार अधिकारी सतिश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी महेश आंबेकर, रेणुका नाटके उपस्थित होते.

**डॉ. मिलिंद आवताडे यांना कौतुकाची थाप**

महापारेषण २०२४ च्या दैनंदिनी व दिनदर्शिकेला पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडियाच्या वतीने सर्वोत्कृष्ट तीन पुरस्कार मिळाले. तसेच पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ॲन्ड पीआर व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांची पाठ थोपटून अभिनंदन केले. भविष्यातही, जनसंपर्क विभाग सर्वोत्कृष्ट काम करून महापारेषणची प्रतिमा जनमानसात उंचावेल, असा विश्वास डॉ. संजीव कुमार यांनी व्यक्त केला.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
**SRM Re-Tender 3rd Call Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No. 7000034537 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender (Re-tender 3rd call): 12/2024-25, Particulars:** Work of supply, laying and commissioning of 33 kV 1C x 400 sqmm XLPE power cable for work of replacement of deteriorated 33 kV 185 sqmm XLPE power cable of 50 MVA 220/33 kV TF-II by 33 kV 400 sqmm XLPE power cable at 220 kV Jejuri substation under EHV O&M Division Baramati, **Estimated cost:** Rs. 30,25,949/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost) : Rs.**30,259/- **Tender cost in Rs.** 500.00+ GST, **Sale period:** 01.01.2025 to 11.01.2025 **Last Date of Submission:** 11.01.2025 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 13.01.2025 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer - 7447440608/Dy. Executive Engineer 7447440605. For further details please visit to https://srmetender.mahatransco.in.

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः शहर बार्शी मधील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की १) डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील घर जागेचा तपशील: अ) सि. स. नं. ३०५४/अ क्षेत्र २३.४ चौ. मी. ब) सि. स. नं. ३०५४/ब क्षेत्र २१.७ चौ. मी, क) सि. स. नं. ३०५४/ क क्षेत्र ८.९ चौ. मी., ड) सि. स. नं. ३०५४/ ड क्षेत्र ३५.१ चौ. मी. येणे प्रमाणे मिळकत एकमेकास लगत या मध्ये बांधकामाच्या खोल्या दोन बाकी पडीक जागा. जागे मधील नळ, विद्युत पुरवठा, संडास, बाथरूम वगैरे तंदगभूत वस्तुसुध्दा.

२) वर कलम १ मध्ये नमुद मिळकत ही अ. १) हबीबाबी युसुफ आतार. २) शफिक युसूफ आतार ३) इम्रान युसूफ आतार. ४) मुमताज युसूफ आतार व लग्नानंतर मुमताज मुनीर आतार ५) रुबीना युसूफ आतार लग्नानंतर रुबीना सलीम तांबोळी. ब. व तसेच शमशोद्दीन अब्दुल आतार यांचे वारस १) मैनुद्दीन शमशोद्दीन आतार. २) मुजीब शमशोद्दीन आतार. ३) आशीफा शमशोद्दीन आतार लग्नानंतर आशीफा दस्तगीर तांबोळी. यांची व आमचे अशिल १) शब्बीर महमंदहानिफ आतार व २) तन्वीर महमंदहानीफ आतार यांची संयुक्त मालकीची व आमच्या अशिलांचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटिची अशी मिळकत आहे. आमचे अशिलास सहधारकाचा समाईक न विभागलेला कायदेशीर हक्क अधिकार मुस्लिम पर्सनल लॉ मधील तरतुदी अन्वये अग्रहक्काने बाजारभावाने खरेदी घेणेचा कायदेशीर हक्क अधिकार आहे. आमचे अशिल संबंधित १) हबीबाबी युसूफ आतार व २) मैनुद्दीन शमशोद्दीन आतार वगैरे आठ (८) लोकांचा हिस्सा सदर तरतुदींन्वये खरेदी घेणेस तयार आहेत. संबंधित लोक भावकी मत्सरातून आमचे अशिलांचा अग्रहक्क खरेदीचा कायदेशीर अधिकार डावलून त्रयस्थास विक्री करण्याचे प्रयत्नात आहे. आमचे अशिलाने तशी ॲड नोटीस १) हबीबाबी व २) मैनुद्दीन वगैरे आठ (८) यांना दिलेली आहे. ३) आमचे अशिलाचे कायदेशीर हक्क डावलण्याचे इराद्याने धारक अ. १) हबीबाबी युसूफ आतार. २) शफिक युसूफ आतार ३) इम्रान युसूफ आतार ४) मुमताज युसूफ आतार लग्नानंतर मुमताज मुनीर आतार ५) रुबीना युसूफ आतार लग्नानंतर रुबीना सलीम तांबोळी. ब. १) मैनुद्दीन शमशोद्दीन आतार. २) मुजीब शमशोद्दीन आतार ३) आशिफा शमशोद्दीन आतार लग्नानंतर आशिफा दस्तगीर तांबोळी. हे त्यांचे पोकळ नोंदीचा गैर आधार घेवून वर नमुद घरजागेचे संबंधाने त्रयस्थ हक्क, हितसंबंध निर्माण होणारे हस्तांतराचे व्यवहार करणेचे प्रयत्नात आहेत.

सबब बार्शी परिसरातील तमाम लोकांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद कलम १ मधील मिळकती संदर्भात कोणीही १) हबीबाबी युसूफ आतार २) मैनुद्दीन शमशोद्दीन आतार वगैरे आठ (८) यांचे सोबत कोणतेही त्रयस्थ हक्क, हितसंबंध निर्मान होणारे हस्तांतराचे कोणतेही व्यवहार करू नयेत. केलेस ते आमचे अशिलाचे अग्रहक्क खरेदीचे अधिकारावर व प्रत्यक्ष कब्जेवर बंधनकारक राहणार नाही. यांची नोंदी घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये. या शुध्द भावनेने ही जाहीर नोटीस दिले असे. ता :- ०१/०१/२०२५

सही/-
ॲड. एस.पी. होनमुटे, बार्शी
शब्बीर महमंदहानीफ आतार तर्फे ॲडव्हकेट.

**बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5
आजादी का अमृत महोत्सव
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुळे सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे सिक्युरिटायझेशन आणि फायनान्शिअल रिकन्ट्रक्शन अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, खाली नमूद केलेल्या मागणी नोटिस जारी केल्या. कर्जदार आणि जामीनदारांनी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस दिली जाते की अधोस्वाक्षरीने खाली दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.अधिनियमाच्या कलम 13 चे कलम (4) सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचले.

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. येथे नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष सुरक्षित मालमत्ता कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- जुळे सोलापूर**<br>**कर्जदार - 1. श्री. सुनील भानुदास कापुरे**<br>प्लॉट क्र. 205, वैष्णवी नगर भाग 1, सैफुल विजापूर रोड सोलापूर-413004<br>**2. सौ. सीमा सुनील कापुरे**<br>प्लॉट क्र. 205, वैष्णवी नगर भाग 1, सैफुल विजापूर रोड सोलापूर 413004 | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**<br>प्लॉट क्र. 205, वैष्णवी नगर भाग I, S. क्र. (343/2A/1), 105/2A/1<br>सैफुल विजापूर रोड सोलापूर 413004<br>92.90 चौ. Mts.<br>**मालकीण: श्री सुनील भानुदास कापुरे**<br>**चतु:सीमा -** पूर्व : खुली जागा, पश्चिम : प्लॉट क्र.204, दक्षिण : प्लॉट क्रमांक 206, उत्तर: रस्ता | **मागणी सूचना:**<br>दि.21/10/2024<br>19,67,264.00/- रु. अधिक लागू न केलेले व्याज w.e.f 21/10/2024 च्या प्राप्तीपर्यंत कर्ज<br>**सांकेतिक ताबा तारीख:**<br>30.12.2024 |
| 2 | **1. सौ. रजनी राजकुमार गोडले**<br>5/7, विनायक नगर अक्कलकोट रोड एमआयडीसी सोलापूर 413006<br>**2. श्री. राजकुमार शिवप्पा गोडले**<br>5/7, विनायक नगर अक्कलकोट रोड एमआयडीसी सोलापूर 413006 | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**<br>इक्विटेबल मॉर्टगेजचे विशेषतः येथे वर्णन केले आहे<br>**खालील फ्लॅटचे तारण खालीलप्रमाणे:-**<br>फ्लॅट क्रमांक 302, तिसरा मजला मनोरमा आर्केड अपार्टमेंट कोणार्क नगर, मजरेवाडी, जुळे सोलापूर 413004<br>**श्रीमती रजनी राजकुमार गोडले यांच्या मालकीचे आहे**<br>**चतु:सीमा -**<br>पूर्व: फ्लॅट क्रमांक 303, पश्चिम: प्लॉटची खुली जागा, दक्षिण: M. V. रोड, उत्तर: पॅसेज, जिना केस | **मागणी सूचना:**<br>दि.05/04/2024<br>रु.35,06,007.00/- अधिक लागू न केलेले व्याज w.e.f 05/04/2024 पर्यंत ची प्राप्ती कर्ज<br>**प्रत्यक्ष ताबा तारीख:**<br>27/12/2024 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - ३१/१२/२०२४

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.

## महत्त्वाचे

### डी. गुकेशसारखे प्रतिभावंत नवीन पिढीसाठी प्रेरणादायी

**नवी दिल्ली :** बुद्धिबळाच्या इतिहासातील आतापर्यंतचा सर्वात



विश्वविजेता गुकेश डोम्माराजू याने आघाडीचे उद्योगपती गौतम अदानी यांची भेट घेतली. अदानी यांनी १८ वर्षीय भारतीय ग्रॅण्डमास्टरची मुक्तकंठाने प्रशंसा केली. अलिकडेच सिंगापूर येथे चेन्नईच्या १८ वर्षीय डी. गुकेशने चीनच्या डिंग लिरेनचा पराभव करून जगज्जेतेपद पटकावले आणि तो विश्वनाथन् आनंद नंतर जागतिक विजेता होणारा दुसरा भारतीय ठरला. अवघ्या १८ व्या वर्षी गुकेशची शांतता व तेज हे भारताच्या न थांबणाऱ्या तरुणाईचा दाखला आहे. गुकेशसारखे प्रतिभावंत नवीन पिढीला जागतिक बुद्धिबळावर वर्चस्व गाजवण्याची प्रेरणा देतात. भारत जागतिक बुद्धिबळावर अनेक दशके वर्चस्व गाजवण्यास सज्ज असलेल्या विजेत्या खेळाडूंची फौज तयार करत आहेत. हा आत्मविश्वास, पुनरुत्थान आणि उदयोन्मुख भारत आहे. जय हिंद! असे गौतम अदानी यांनी द एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

### बुमराहला सर्वाधिक रेटिंग गुण

**दुबई :** जसप्रीत बुमराहने ताज्या



आयसीसी पुरुषांच्या कसोटी गोलंदाजी क्रमवारीत आर. अश्विनच्या पराक्रमाला मागे टाकत सर्वाधिक रेटिंग गुण मिळविले. मेलबर्न क्रिकेट मैदानावरील चौथ्या कसोटी सामन्यात आणखी एक प्रभावी खेळ केल्यानंतर वेगवान गोलंदाज बुमराहने संपूर्ण डावात ९ बळी घेतले. या कामगिरीबरोबरच त्याने ९०७ रँकिंग गुणांची कमाई केली. आर. अश्विनचे ९०४ रेटिंग गुण असून हे गुण त्याने डिसेंबर २०१६ मध्ये प्राप्त केले होते. बॉक्सिंग-डे कसोटीच्या प्रारंभी बुमराहने सध्याच्या जागतिक क्रमवारीत प्रथम क्रमांकावरील कसोटी गोलंदाज अश्विनसोबत ९०४ गुणांसह संयुक्तपणे प्रथम स्थान मिळवत बरोबरी साधली होती. आता ९०७ रँकिंग गुणांमुळे बुमराहला इंग्लंडच्या डेरेक अंडरवुडसह सर्वकालीन यादीत संयुक्तपणे १७ व्या स्थानावर ठेवले आहे. इंग्लंडचा वेगवान गोलंदाज सिडनी बार्न्स ९३२ गुणांसह आघाडीवर आहे. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने मेलबर्न येथे ६ बळी टिपल्यानंतर १५ रेटिंग गुण मिळवून तिसऱ्या स्थानावर झेप घेतली. सलामीवीर यशस्वी जयस्वालच्या बॉक्सिंग-डे कसोटीत पहिल्या डावातील ८२ धावांच्या खेळीमुळे तो ८५४ रेटिंग गुणांसह करिअरमधील सर्वोत्तम चौथ्या स्थानावर पोहोचला.

### मोहन बागान-हैदराबाद आयएसएल लढत आज

**कोलकाता :** विवेकानंद युवा भारती क्रीडांगण येथे गुरुवारी इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२४-२५ मध्ये मोहन बागान सुपर जायण्ट आणि हैदराबाद एफसी यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. मोहन बागानविरुद्ध पाच सामन्यातीलल विजयहीन मालिका संपवण्याचे हैदराबादचे लक्ष्य आहे. मोहन बागान १३ सामन्यांतून २९ गुणांसह आघाडीवर आहे.

### सूरमा क्लब वि. युपी रुद्रास एचआयएल लढत आज

**राऊरकेला :** इंडिया हॉकी लीग (एचआयएचएल) २०२४-२५ मध्ये गुरुवारी बिरसा मुंडा हॉकी स्टेडियम वर सूरमा हॉकी क्लब आणि युपी रुद्रास क्लब यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. सलामीच्या सामन्यातून दोन गुण मिळवण्यात अपयशी ठरल्यानंतर सूरमा क्लब या लढतीतून पूर्ण गुण मिळवण्याच्या आशेने मैदानावर उतरणार आहे. सूरमा क्लबने आपल्या पहिल्या सामन्यात तामिळनाडू ड्रॅगन्सविरुद्ध १-१ अशी बरोबरी साधल्यानंतर शूटआऊटमध्ये मिळवलेल्या बोनस पॉईंटच्या जोरावर आपल्या पुढील सामन्यामध्ये प्रवेश केला. याउलट, युपी रुद्रासने आपल्या पहिल्या सामन्यात कलिंगा लान्सर्सवर ३-१ असा विजय मिळवून तीन गुण मिळवले. सूरमा हॉकी क्लबने पहिल्या सामन्यात चेंडूवर चांगलेच नियंत्रण राखले. आपल्या पहिल्या सामन्याबद्दल विचार करताना मुख्य प्रशिक्षक जेरोन बार्ट म्हणाले, मला वाटते की पूर्वार्ध हा थोडा बुद्धिबळाचा खेळ होता, तर तिसऱ्या सत्रात दोन्ही संघांनी वेग पकडला होता.

# आर. वैशालीने पटकावले कांस्यपदक

### महिलांच्या जागतिक ब्लिट्झमध्ये भारताची उंच भरारी

**न्यू यॉर्क, १ जानेवारी**

येथे आयोजित महिलांच्या जागतिक ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या आर. वैशालीने कांस्यपदक पटकावले. जागतिक जलद बुद्धिबळ स्पर्धेत कोनेरू हम्पीने विजेतेपद पटकावल्यानंतर आर. वैशालीने भारतीय बुद्धिबळसाठी आणखी एक मजबूत व उंच कामगिरी केली.

वैशालीने उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या झु जिनेरचा २.५-१.५ ने पराभव केला, मात्र तिला उपांत्य फेरीत चीनच्या जू वेनजुनने ०.५-२.५ ने पराभूत केले.

चीनचे पूर्ण वर्चस्व असलेल्या या स्पर्धेत जू वेनजुनने आपल्याच देशाच्या लेई टिंगजीचा ३.५-२.५ असा पराभव करत जगज्जेतेपदावर आपले नाव कोरले.



पाच वेळा विश्वविजेता व आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचे (फिडे) उपाध्यक्ष विश्वनाथन् आनंद यांनी वैशालीच्या प्रयत्नांबद्दल तिचे अभिनंदन केले आणि अशा रीतिने स्पर्धेचा शेवट करण्याचा हा एक चांगला मार्ग आहे, असे आनंद म्हणाले.

कांस्यपदक मिळविल्याबद्दल वैशालीचे अभिनंदन. तिची पात्रता खरोखरच पॉवर पॅक्ड कामगिरी होती. तिच्या या कामगिरीबद्दल आमच्या वाका चेस अकादमीला(वेस्टब्रिज आनंद बुद्धिबळ अकादमी) अभिमान वाटला, असे आनंदने 'द एक्स' वर लिहिले.

आम्ही तिला व तिच्या बुद्धिबळाला पाठिंबा देताना खूप आनंदी आहोत. तिने २०२४ वर्षाची सांगता गोड पद्धतीने केली. २०२१ मध्ये आम्हाला अधिक मजबूत बुद्धिबळपटू मिळतील असे वाटले होते, पण इथे तर आम्हाला कोनेरू हम्पीसारखी विश्वविजेती व आर. वैशालीसारखी कांस्यपदक विजेती गवसली आहे, असेही त्यांनी लिहीले आहे.

खुल्या विभागात जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा मॅग्नस कार्लसन व रशियाचा इयान नेपोम्नियाची तीन डाव गमावल्यानंतर विजेतेपद मिळवण्यात अपयशी ठरले. त्यांतर डेडलॉकमुळे कार्लसन व नेपोम्नियाचीला संयुक्तपणे ब्लिट्झ बुद्धिबळ विजेतेपद बहाल करण्यात आले. संयुक्त विजेतेपद देण्याची ही पहिलीच वेळ होती. आम्ही अशा टप्प्यावर पोहोचलो जिथे खूप दिवस झाले होते. आम्ही बरेच खेळ खेळलो, आमच्याकडे तीन ड्रॉ झाले आणि मला वाटले की मी खेळत राहू शकेन. पण जिंकणे सामायिक करणे हा एक चांगला उपाय होता, तो संपवण्याचा हा एक चांगला मार्ग होता, असे कार्लसन म्हणाला. (वृत्तसंस्था)

# कोको, फ्रिट्झच्या खेळीमुळे अमेरिका मिश्र सांघिक उपांत्य फेरीत

### युनायटेड चषक टेनिस

**पर्थ, १ जानेवारी**

कोको गॉफ व टेलर फ्रिट्झने बुधवारी केलेल्या चमकदार कामगिरीच्या बळावर अमेरिका संघाने येथे आयोजित युनायटेड चषक मिश्र सांघिक टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली. अमेरिका संमघाने दोन वर्षांपूर्वी स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते, आता त्यांना पुन्हा एकदा विजेतेपद पटकावण्याची संधी असेल.

पर्थमधील पहिल्या एकेरीच्या सामन्यात कोको गॉफने झांग शुईवर ७-६ (४), ६-२ असा शानदार विजय मिळविला, तर टेलर फ्रिट्झने झांग झिझेनविरुद्धचा चुरशीचा सामना ६-४, ६-४ असा जिंकला.

झांग शुई अप्रतिम टेनिस खेळते. मी जितक्या जोरकसपणे फटका मारते, तीसुद्धा तितक्याच जोरात मारते. त्यामुळे मी तिला दबावाखाली आणू शकली नाही. ती माझ्याविरुद्ध खूप आक्रमकपणे खेळली, परंतु सरतेशेवटी मी विजय मिळविला, असे जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेला गॉफ म्हणाली.

कझाकिस्ताननेही दुखापतग्रस्त जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या ॲलेक्झांडर झ्वेरेव्हशिवाय खेळणाऱ्या जर्मनी संघावर २-१ असा विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. (वृत्तसंस्था)



**पर्थ येथे आयोजित युनायटेड चषक महिला टेनिस स्पर्धेतील सामन्यादरम्यान चीनच्या शुई झांगला परतीचा फटका मारताना अमेरिकेची कोको गॉफ**





# एसपीएस लॉयन्स सोलापूरने पटकाविला सिंहगड व्हॉलिबॉल चषक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

सिंहगड इन्स्टिट्यूटच्या कर्मचाऱ्यांसाठी आयोजित सिंहगड स्टाफ स्पोर्ट्स लीगमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावत एसपीएस लॉयन्स सोलापूरने व्हॉलिबॉल चषक पटकावला.

सिंहगड स्टाफ स्पोर्ट्स लीगचे स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. सिंहगड संस्थेचे संस्थापक प्रा. एम. एन. नवले यांच्या वाढदिवसानिमित्त या स्पर्धेचे आयोजन केले जाते. सिंहगड संस्थेच्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन पुण्यात केले होते. यात क्रिकेट, व्हॉलीबॉल, चेस, बॅडमिंटन, टेबल टेनिस, लॉन टेनिस, अथिलॅटिक, स्विमिंग, स्नूकर अशा दहा क्रीडा प्रकाराचा समावेश होता. स्पर्धेचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले, संस्था सचिव डॉ. सुनंदा नवले, उपाध्यक्षा डॉ. रचना नवले-अष्टेकर यांच्या हस्ते पार पडले. बक्षीस वितरण समारंभ वडगाव बु. या शैक्षणिक संकुलात पार पडला. यशस्वी कर्मचा-यांचे सोलापूर कॅम्पसचे डायरेक्टर संजय नवले, सोलापूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्य निखहत शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, कमलापूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या चैताली मराठे, सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे यांनी अभिनंदन केले.

#### सिंहगड सोलापूर लायन्सची कामगिरी अशी

एसपीएस लॉयन्स सोलापूर संघात सोलापूर, व कमलापूर येथील कर्मचाऱ्याचा समावेश होता. यात व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक, क्रिकेट मध्ये क्वार्टर फायनल पर्यंत यश मिळवून सेमी फायनलपर्यंत धडक मारली. पण उत्कृष्ट गोलंदाज म्हणून सलग दुस-यांदा प्रविण शिंदे यांनी यश मिळविले. शंभर मीटर धावण्यात प्रथम क्रमांक (सुवर्ण) प्रियांका बिराजदार (सिंहगड पब्लिक स्कूल) आणि रिले प्रकारात (सांघिक रौप्य) महेश देडे, माऊली सुर्यवंशी, विकास झोळ, श्रीकांत म्हेत्रे, बापू म्हेत्रे यांनी पटकावला.



# आंतरविद्यापीठ डायव्हिंग स्पर्धेत ऑर्किडच्या मदरीला दोन पदके

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ जानेवारी,**

अखिल भारतीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेतील डायव्हिंग प्रकारात येथील एन. के. ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सागर मदरी याने एक रौप्य व एक ब्राँझ पदक पटकाविले.

एस.आर.एम. सायन्स अँड टेक्नॉलॉजी कट्टानकलथुर, चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय वेस्ट झोन तसेच अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत ऑर्किड महाविद्यालयाचे सागर मदरी, सोहम शेटे, वैजनाथ बगले, श्रीकांत अडकी यांची डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ या संघात निवड झाली होती.

यापैकी सागर मदरी याने वेस्ट झोन ऑल इंडिया हायबोर्ड प्रकारात रौप्य तर सोहम शेटे चौथ्या स्थानी राहिला. या दोघांचीही तेथेच झालेल्या अखिल भारतीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली. याही स्पर्धेत सागर याने हायबोर्ड डायव्हिंग स्पर्धेत ब्राँझ पदक मिळविले तर सोहम पाचव्या स्थानी राहिला. यांनी मिळविलेल्या यशाबद्दल प्राचार्य डॉ बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन यांनी सत्कार केला.

यावेळी प्रा. एस. एम. गायकवाड, प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख प्रा. डॉ जाधव, प्रा. डॉ. मिथुन पाटील, स्पोर्ट्स सेक्रेटरी प्रतीक राय हे उपस्थित होते. या यशस्वी खेळाडूंना प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले.

# स्वराली हातवळणेला अजिंक्यपद



### पांडुरंग पैकेकरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

पांडुरंग पैकेकरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धेत स्वराली हातवळणे हिने तीस वर्षाखालील गटात सहा पैकी सहा गुण मिळवून अजिंक्यपद पटकाविले.१७,१२,९,८,७ गटात अनुक्रमे वरद लिमकर, सानवी गोरे, ओम निरंजन, हिमांशू व्हनगावड, आर्यन गांधी यांनी विजेतेपद पटकावले.

सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने व श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्या वतीने ही स्पर्धा आयोजिली होती. सुंदर मल्टीपर्पज हॉल येथे झालेल्या या स्पर्धेचा पारितोषक वितरण समारंभ तहसीलदार झोपडपट्टी पुनर्वसन विभाग पुणे, सुषमा पैकेकरी तसेच मातोश्री मिराबाई पैकेकरी, अध्यक्ष संतोष पैकेकरी, सुशीलकुमारजी शिंदे भारतीय विकास इंग्लिश मीडियम प्रशालेचे प्राचार्य पूनम सोनटकले, सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन सचिव शरद नाईक, विक्रीकर अधिकारी सांगली गिरीश हातवळणे व लक्ष्मण लिमकर यांचे हस्ते संपन्न झाला.

**गुणानुक्रमे अंतिम निकाल**

**तीस वर्षाखालील गट :** स्वराली हातवळणे, तेजस दौंडे (मंगळवेढा), हदगल स्वप्नील, पवन जल्लीपल्ली, अमित मुदगुंडी, स्वप्नील हुल्ले, प्रज्वल कोरे, स्वप्नील ढेकळे (ठाणे), तुषार धोत्रे, वडशेरला नाविन्या, गानबोटे ईश्वरी, गुडड किरण(पुणे), विभूते रजत, पवार वैभव, शुभम क्षिरसागर.

**१७ वर्षेखालील गट :** लिमकर वरद, रणवीर पवार, श्रीपाद पाटील, हलमल्ली हर्ष, गांधी वेदांग(बारामती), फराह शेख, कान्हेरे शंभुराज(करमाळा), सानिध्य जमादार, तन्मय कदम, श्रावणी देवनपल्ली, अथी चाबुकस्वार, हर्ष देशपांडे, पाटील ओम (तुळजापूर), मुकाणे पृथ्वीराज, जय शाह

**१२ वर्षाखालील गट :** सानवी गोरे(बार्शी), नसले ओंकार (बारामती), देशमुख सिद्धी (करमाळा), कार्तिक भागवत, साईराज घोडके, मुसळे वेदांत, उंबरे सार्थक, गायकवाड रणजीत, मयंक भुसा (नांदेड), अन्वी कुन्हाळे (सांगली), श्रीरंगनाथ जिल्ला, पटवर्धन देवदत्त, जमादार शशांक, हत्तरकी विराज, अनुराग शिरसाट (लातूर).

**९ वर्षाखालील गट :** ओम निरंजन, चौधरी श्लोक, मुसळे सृष्टी, इंगळे श्रेयस, मनस्वी क्षिरसागर, प्रतीक हालमल्ली, विवान दासरी, प्रथमेश पवार, श्रेयस कंदीकटला.

**८ वर्षाखालील गट :** हिमांशू व्हनगावडे, आदित्य जानगवळी, आरव पवार, शिवसमर्थ यमगर, उत्कर्षा लोखंडे (बार्शी), गंगापुरे सुमित(लातूर), गायकवाड संदेश, डोंगरे सार्थक (धाराशिव), अर्णव अभ्यंकर.

**७ वर्षाखालील गट :** आर्यन गांधी, रत्नेश घाणेगावकर(बार्शी), रंगरेज नमन, नयन कंदीकटलास, भांगे पार्थ, स्वरा निरंजन, स्वामी विवेक, हिंगसे ईश्वरी(बारामती), देशमुख राजवर्धन.

**६ वर्षाखालील गट :** पाटील आरव, पटवर्धन ईशा.

**५ वर्षाखालील :** ओजस पवार, जांभळे.

**उत्तेजनार्थ : मुली :** श्रुती क्षीरसागर, इरा मुरूमकर, अशाज कमलीवाले, समृद्धी क्षीरसागर, सुकन्या बिराजदार, यशोदा बिराजदार. **मुले :** देवराज कान्हेरे, अंश राठोड(करमाळा), मूर्तीलाल पुल्लूर, अबुसमी मोमीन, विराज लंकेश्वर, गायकवाड संदेश, कसबे आदित्य, श्रवण शेंडगे, शिवतेज मोटे.

# जिल्हा पुरुष व महिला खो-खो निवड चाचणी उद्या ह.दे.च्या मैदानावर

**सोलापूर, दि. ३१ डिसेंबर -**

धाराशिव येथे रविवार ५ जानेवारी रोजी नॅशनल गेम्सच्या चाचणीसाठी सोलापूर जिल्ह्यातून ३ पुरुष व २ महिला खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा खो-खो निवड चाचणी उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या वतीने शुक्रवारी ३ जानेवारीला हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर होईल. जिल्ह्यातील संलग्न मंडळातील पुरुष व महिला खेळाडूंनी शुक्रवार तीन




जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन सोलापूर ॲम्युचर खोखो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर व सचिव ए. बी. संगवे यांनी कळविले आहे.

# पश्चिम महाराष्ट्र भागवत श्री शरीरसौष्ठव स्पर्धा शनिवारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी**

पश्चिम महाराष्ट्र भागवत श्री २०२५ शरीरसौष्ठव स्पर्धा शनिवारी ४ जानेवारी रोजी सांयकाळी ४ वाजता श्री. छत्रपती रंगभवन येथे आयोजित केली आहे. ही स्पर्धा ६ वजनी गटात घेण्यात येत आहे. प्रत्येक गटात ४ बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. रोख बक्षिस, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र असे बक्षिसाचे स्वरुप असेल. या स्पर्धेसाठी ८० हजार रुपयाची रोख बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. या स्पर्धेत सोलापूर कोल्हापूर, सांगली, सातारा, सिंधूदुर्ग व उस्मानाबाद जिल्हयातील शंभरहून अधिक



स्पर्धक भाग घेणार आहेत. संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे यांनी आवाहन केले आहे की, जास्तीत जास्त खेळाडूंनी स्पर्धेत भाग घेवून स्पर्धा यशस्वी करावी. अधिक माहितीसाठी सचिव प्रमोद काटे (मो. ९४२२३८००३३) अथवा नजीर शेख (९३२५२३८६१८) यांच्याशी संपर्क साधावा.

# जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केद्रामार्फत हॉकीचे प्रशिक्षण केंद्र सुरु

**सोलापूर दि. १ जानेवारी-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रामार्फत हॉकी या खेळाचे प्रशिक्षण केंद्र जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका सोलापूर, इंडियन मॉडेल स्कूल व सहस्त्रार्जून हायस्कूल



सोलापूर येथे सुरु करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी दिली.

प्रशिक्षण केंद्राच्याठिकाणी खेळाडूंना तंत्र शुध्द मार्गदर्शन देण्यासाठी हॉकी या खेळाचे राज्य क्रीडा मार्गदर्शक श्रीमती वैशाली सुळ हे प्रशिक्षण देणार असून ज्या विदयार्थी व खेळाडूंना प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यांनी आपली नावे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर या ठिकाणी कार्यालयीन वेळेत वैशाली सुळ (मो. ७४४७४९१८८८) यांच्याकडे नोंदवावीत. हे प्रशिक्षण केंद्र नियमितपणे सुरु असून, प्रशिक्षणाची वेळ सकाळी ६.३० ते ९.३० वाजता व सायकांळी ४ ते ६.३० वाजता. अशी असून विदयार्थी व खेळाडूंना याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### अक्कलकोटचे चंद्रकांत वेदपाठक यांना सामाजिक बांधिलकी राज्यस्तरीय पुरस्कार

**अक्कलकोट, दि. १ जानेवारी-**

अक्कलकोटचे सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत रामचंद्र वेदपाठक यांना पांचाळ सोनार समाज समिती तथा सोलापूर सोनार समाज संघटना व पांचाळ सोनार सेवा संस्था सोलापूर यांच्या वतीने सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय आणि लक्षवेधी कार्य केल्याबद्दल सामाजिक बांधिलकी राज्यस्तरीय पुरस्कार सोलापूर महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीज पंडित यांचे हस्ते प्रदान करण्यात आले आहे. मानपत्र, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप होते. अध्यक्षस्थानी सोलापूर सुवर्णकार संघटनेचे अध्यक्ष व शिवसेना ठाकरे गटाचे शहर अध्यक्ष महेश धाराशिवकर होते. स्वागत समाजाचे अध्यक्ष वसंतराव पोतदार यांनी केले. चंद्रकांत वेदपाठक यांनी दोनवेळा १०० व १५१ असे २५१ गरजू मुलांचे स्वखर्चाने मोफत सामुदायिक मुंजीचे आयोजन केले. तसेच शेकडो आदर्श व्यक्तींचे सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला. गरीब, निराधार महिलांना धान्य व साडी वाटप यासह विविध उपक्रम त्यांनी राबविले आहे. यावेळी स्वातंत्र्य सैनिक वसंतराव पोतदार, कोल्हापूरचे उद्योजक भारत कारीकर, मिरजचे उद्योजक अजित पोतदार वशिकर, सहाय्यक अभियंता उदय माणकापुरे, समाजाचे अध्यक्ष वसंतराव पोतदार, विजयकुमार पोतदार, दत्तगुरु पोतदार, गिरीश जमखंडिकर, गजानन सोनार, निलेश धाराशिवकर, अमोल महामुनी, विकास काळे, सतीश पोतदार, संजय मैंदर्गीकर, संतोष कळमणकर, मोहन मंद्रूपकर यांनी परिश्रम घेतले.



### खाद्य महोत्सवाचे उद्‌घाटन

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

नीलम नगर भाग ३ व ४ येथील रणजितसिंह मोहिते-पाटील बालक मंदिर, आशा मराठी विद्यालय, श्री धर्मण्णा सादूल प्रशाला व आय.एस.इंगळमी कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने खाद्य महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष नाबिखा हारून पठाण सर हे होते. तसेच प्रमुख पाहुणे विकास पाटील (केंद्र प्रमुख शेळगी उत्तर सोलापूर), शेख महताब प्राथमिकचे मुख्याध्यापिका पठाण तस्लीम्बानो, माध्यमिकचे मुख्याध्यापिका श्रीमती सय्यद आफरीन, संस्थेचे सचिवा मुमताज शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिमेचे पूजन करून खाद्य महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. खाद्य महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांने बनवलेले पाणीपुरी, भेळपुरी, मसाला पाव, पुरी भाजी, मसाला दुध, वडापाव, भाजी, पोहे, शिरा, अशा विविध पदार्थांचे ३० स्टॉल लावण्यात आले होते. व्यापार कुशलता व व्यवहार ज्ञान याची सांगड घालण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी माजी विद्यार्थिनी आरती चाळक जिल्हा सत्र न्यायालय येथे लिपिक पदावर निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने व शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन सपाटे व भांड यांनी केले तर आभार शिवानंद हिरेमठ यांनी मानले.



### माढ्यातील शॉपिंग कॉम्प्लेक्सला निधी द्या

**आ. अभिजीत पाटील यांची ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी**

**माढा, दि. १ जानेवारी-**

माढा विधानसेभेच आ. अभिजीत पाटील यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे याची मुंबई येथे भेट घेऊन विविध मागण्यांचे पत्र दिले. माढा येथे जिल्हा परिषद जागेमध्ये शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी आवश्यक निधी मिळावा याकरिता ग्रामविकास मंत्री ना.श्री. जयकुमार गोरे यांना निवेदन दिले. माढा शहरामधील जिल्हा परिषदेच्या जागेमध्ये दोन मजली शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार झाल्यावर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल व अनेकांना रोजगार उपलब्ध होईल. तसेच जागेतील आतील बाजूस क्लासरूम व शाळेसाठी वॉल कंपाऊंड तयार करणेही गरजेचे आहे. त्यासाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात यावा, अशी मागणी केल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.



### आयुक्त शीतल तेली-उगले यांचा स्थानापन्न पदोन्नती मिळाल्याबद्दल सत्कार

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

महानगरपालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांना भारतीय प्रशासन सेवेत स्थानापन्न पदोन्नती मिळाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी सत्कार केला. पदोन्नतीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पार्टी प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी बुके व शाल देऊन सत्कार केला.पदोन्नतीबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी नगरसेवक गणेश पुजारी, गौतम नागटिळक ,अमर सोनकांबळे नितीन शिरसट,राजाराम लोखंडे, शाहीर कांबळे, प्रकाश सोनवणे, महादेव शिवगदगे, भीमा मस्के आदी मान्यवर उपस्थित होते.

# अन्नछत्रात महाप्रसादाचे उत्तम नियोजन

**स्वामी समर्थ भक्तांमधून समाधान; गैरसोय नाही**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १ जानेवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने नाताळच्या सुट्टीमुळे महाप्रसादाकरिता होणाऱ्या गर्दीचे उत्कृष्ट नियोजन केल्याने भक्तांतून समाधान व्यक्त होत आहे.

दरम्यान न्यासाकडून गेल्या १५ दिवसात गर्दीच्या काळात केलेल्या नियोजनाबाबत प्रशासनाकडून प्रशंसा तर भक्तातून स्वागत व समाधान व्यक्त होत आहे. दुपारी व रात्री उशिरापर्यंत भक्तांच्या सेवेत अन्नछत्र मंडळाकडून महाप्रसादा बरोबरच निवास, वाहनतळ, महाप्रसाद रांग, वयोवृद्ध माता भगिनी, दिव्यांग यांच्यासह ऑनलाईन महाप्रसाद बुकिंग करणाऱ्यांना थेट महाप्रसादगृहात प्रवेश, हिरकणी कक्ष आदी व्यवस्थेबाबत दिलेले



प्राधान्य क्रम, परिसरातील स्वच्छता यासह पदाधिकारी सेवेकरी सुरक्षारक्षक कर्मचारी यांचा गर्दीतील नम्रपणा या एकूणच सर्व नियोजनाबाबत अन्नछत्र मंडळ हे अव्वल ठरले आहे. गत वर्षातील नाताळ सुट्टी, मार्गशीर्ष महिना, नववर्ष आरंभ यामुळे श्री क्षेत्र अक्कलकोटला श्रींच्या दर्शनासाठी गर्दीत वाढ झाली होती गेल्या १५ दिवसात सुमारे १५ लाखाहून अधिक भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

भक्तांनी तीर्थाटनातून पर्यटनाबाबत न्यासाच्या परिसरात दत्त मंदिर, स्वामींचा रथ यासह श्रीमंत कांतामतीराजे भोसले वाचनालय, आश्रयदात्यांचे कक्ष, स्वामी सदन- धान्य कोठार, सभागृह, कार्यालय, सिंहानाधिष्ठ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, स्वामींची भव्य उभी ३० फुटी मूर्ती, दीपमाळा, वारूळातून प्रकटले परब्रह्म, कपिला गाय, शिवस्मारक, श्री गणेश मंदिर इमारत, श्री शमी विघ्नेश गणपती मंदिर, श्री तुळजाभवानी माता मंदिर, हिरकणी कक्ष, दिव्यांग रुग्णांसाठी बग्गी, आऊटडोअर जीम, यात्री भवन, यात्री निवास, अतिथी निवास, रूग्णवाहिका, अग्निशामक वाहन, एटीएम, श्री स्वामी समर्थ वाटिका व बालो उद्योन, जॉगिंग ट्रॅक, वाहन तळ, भक्तांची सोय, याबाबत तीर्थ क्षेत्र नगरीतील विविध मुख्य मार्गावर कटाऊटस् लावून स्वामी भक्तांना सुलभ व्यवस्था होण्या कामी अन्नछत्र मंडळाकडून सोय केली.

> श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाने नाताळच्या सुट्टीमुळे महाप्रसादा करिता होणाऱ्या गर्दीचे उत्कृष्ट नियोजन केल्याने आम्ही भक्त समाधानी आहोत.
>
> **- विशाल जालिंदर चव्हाण,**
> स्वामी भक्त, भिगवण, पुणे

## बार्शी पोलीस ठाण्याची तळीरामांवर कडक कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ जानेवारी-**




नवीन वर्षाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर बार्शी शहर पोलीस ठाणेकडून मागील दोन दिवसांपासून नाकाबंदी व कोबींग ऑपरेशनची मोहीम राबविण्यात आली होती. त्या दरम्यान बार्शी शहरातील लॉज, हॉटेल, ढाबे, पेट्रोल पंप, एटीएम व बँका चेक करण्यात आल्या. बार्शी शहरातून तडीपार केलेले इसम, हिस्ट्रीशिटर, माहितगार गुन्हेगार यांना राहत्या घरी जाऊन चेक करण्यात आले.

२०२४ वर्षाला निरोप देताना किंवा नवीन वर्षाचे स्वागत करताना मद्यपान करुन वाहने चालवू नये म्हणून नाकाबंदी लावण्यात आली होती. नाकाबंदी दरम्यान १४३ लहान मोठया वाहनांची तपासणी करण्यात आली. मद्यपान करुन वाहने चालवताना मिळून आलेल्या तळीरामांवर मोटार वाहन अधि. कलम १८५ प्रमाणे २८ कारवाया करण्यात आल्या आहेत. तसेच मोटार वाहन अधि अन्वये इतर कलमान्वये १४९ कारवाया करुन १,०५,२०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. तसेच ऑपरेशन मुस्कान १३ (२०२४) विशेष मोहीम अंतर्गत हरविलेल्या, बेपत्ता २१ व्यक्तींना शोधून त्यांना सुखरुप त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. तसेच ७ बालकामगार मजुरी करताना मिळून आले. त्यांची बालमजुरीतून सुटका करण्यात आली असून त्यांना त्यांच्या पालकांच्याा ताब्यात देण्यात आले.

## आदिवासी कोळी समाजाचा वधू-वर मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

बटगेरी सामाजिक प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने आदिवासी कोळी समाजाचा १३ राज्यस्तरीय वधू-वर, पालक परिचय मेळावा मुळे सभागृह, हरिभाई देवकरण प्रशाला येथे झाला. प्रारंभी प्रा.डॉ.शरण खानापूरे, दिपा पाठक, उज्वला साळुंखे, सर्वश्री सिध्दार्थ कोळी, रवि यलगुलवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आद्यकवी महर्षि वाल्मिकी प्रतिमेचे पूजन करुन सुरुवात करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष शंकर बटगेरी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दिपा पाठक म्हणून योग्य जोडीदार पारखून निवड करणे व तडजोडीने आपल्या भावी जोडीदाराची निवड करण्याबाबत उपस्थित वधू-वर व पालकांना मार्गदर्शन केले. अखिल भारतीय कोळी समाज, नई दिल्लीचे महाराष्ट्र राज कार्याध्यक्ष सिध्दार्थ कोळी यांनी सध्या समाजात होणाऱ्या अन्यायाबद्दल उहापोह करुन उपस्थित वधू-वरांना त्यांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.

## भिक मागणाऱ्या आठ अल्पवयीन मुलांची ऑपरेशन मुस्कान अंतर्गत सुटका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी -**



सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या ऑपरेशन मुस्कान १३ मोहिमेअंतर्गत भिक मागणाऱ्या आठ अल्पवयीन मुलांची सुटका करण्यात आली तसेच १५५ बालकामगार बालकांची सुटका करून त्यांना कामाला ठेवणाऱ्या मालकांवर कारवाई करण्यात आली

विशेष पोलीस महानिरीक्षक महिला व बालकल्याण अपराध प्रतिबंध विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी राज्यात हरवलेल्या बालकांच्या व महिलांच्या संदर्भात ऑपरेशन मुस्कान १३ ही विशेष शोध मोहीम एक डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत राबविली सोलापूर शहर पोलीस आयुक्तालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष तसेच पोलीस ठाणे निहाय पथके तयार करून शहरातील सात पोलीस स्टेशनमध्ये मुस्कान पथक तयार करून हे ऑपरेशन राबविण्यात आली. या ऑपरेशन मुस्कान १३ मध्ये ७६ बेपत्ता महिला पाच अल्पवयीन लहान मुली सहा मुले यांचा शोध लावण्यात आला असून आठ अल्पवयीन भीक मागणाऱ्या मुलांची सुटका करण्यात आली तसेच १५५ बालकामगार यांना बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले एकूण आठ आस्थापनांच्या मालकांनी विरुद्ध बालकांची काळजी व संरक्षण अधिनियम प्रमाणे कारवाई करण्यात आली ही मोहीम पोलीस आयुक्त एम राजकुमार उपायुक्त डॉक्टर दिपाली काळे सहाय्य पोलीस आयुक्त राजन माने पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे मुस्कान पथक तसेच सातही पोलीस ठाण्याचे मुस्कान पथक यांनी केली.



## संभाजी आरमारची दिनदर्शिका म्हणजे मातृशक्तीला मानवंदना : आ. पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

मागील १७ वर्षांपासून संभाजी आरमार समाज प्रबोधनपर दिनदर्शिका प्रकाशित करत आहे. ज्या-ज्या घरात ही दिनदर्शिका असेल त्या घरात नकारात्मकता कधीच येणार नाही, असे मत व्यक्त करत ही खरी मातृशक्तीला मानवंदना असल्याचे प्रतिपादन औसाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते संभाजी आरमार कार्यालयात सन २०२५ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी अन्य दिनदर्शिकेतून तारीख, वार, दिनविशेष समजतील मात्र संभाजी आरमारच्या दिनदर्शिकेतून लढाऊ बाणा आणि राष्ट्रनिर्माणासाठी लढण्याची जिद्द प्रत्येकाच्या मनात निर्माण होईल, अशा विश्वास व्यक्त केला. आजतागायत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, हिंदवी स्वराज्यातील गडकोट, स्वराज्याचे निष्ठावंत मावळे, सोलापूरच्या स्वातंत्र्याचा आणि चार हुतात्म्यांचा जाज्वल्य इतिहास, ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांचा इतिहास अशा विविधांगी विषयावर संभाजी आरमारने हजारोंच्या प्रतीत दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. याप्रसंगी महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अध्यक्ष सतीश कदम, उद्योजक मनीष सुरवसे, धाराशिव नगरपालिकेचे माजी नगरसेवक पिराजी मंजुळे, इंदापूर येथील उद्योजक सचिन शिरसट, संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, सरचिटणीस गजानन जमदाडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमित कदम, शहर संघटक राज दवेवाले, तुकाराम जाधव, अजिंक्य पाटील, गुरुनाथ निंबाळे, मोहन येडलेलू उपस्थित होते.

## आडेगावातील तरुणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

मोहोळ तालुक्यातील आडेगावातील तरुणाने अज्ञात कारणातून किटकनाशक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार ३१ डिसेंबरच्या रात्री आठच्या सुमारास उघडकीस आला. विक्रम आप्पा ठोकडे (वय २५, रा. आडेगाव ता. मोहोळ) असे तरुणाचे नाव आहे.

विक्रम याने रात्री आठच्या सुमारास राहते घरात अज्ञात कारणातून पिकावर फवारणी करण्याचे औषध प्राशन केले. त्यानंतर त्यास त्रास सुरू झाल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आले. तेथील उपचारानंतर भाऊ चेतन याने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. रुग्ण शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## पत्र्यावरील दगड डोक्यात पडून महिला जखमी

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

घरासमोरील अंगणात बसलेली महिला पत्र्यावरील दगड पडून महिला जखमी झाली. हा प्रकार ३१ डिसेंबरच्या सायंकाळी पाचच्या सुमारास घडला. जनाबाई अशोक गायकवाड (वय ८३, रा. बुधवार पेठ, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी पाचच्या सुमारास जनाबाई बुधवार पेठेतील त्यांच्या घरासमोरील अंगणात बसल्या होत्या. त्यावेळी अचानक घराच्या पत्र्यावरील दगड घरंगळून जनाबाई यांच्या डोक्यात पडून जखम झाल्याने मुलगा चंद्रकांत यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## बचत गटाचा हप्ता न भरल्याने मारहाण

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

बचत गटाचा हप्ता न भरल्याने नई जिंदगी परिसरातील विजय नगरात महिलेला बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार बुधवार १ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता घडला. अकिला जहागिर कुरेशी (वय ४५) असे मारहाणीत जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. फातिमा शेख, अशपाक शेख व इसाक शेख अशी मारहाण करणा-यांची नावे आहेत. यातील जखमी आणि मारहाण करणारे यांच्यात बचत गटाच्या पैशातून बुधवारी सकाळी अकराच्या सुमारास वाद झाला. यातूनच अकिला यांना तिघांनी पैसे भरले नसल्याच्या रागातून लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. यात सर्वांगास मुक्कामार लागल्याने मुलगा अजिम याने रुग्णालयात दाखल केल्याची नोंद चौकीत झाली आहे.

# बनावट सोने खरे असल्याचे भासवून महिलेला फसविणाऱ्या परप्रांतीय आरोपींना अटक

**शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केली कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

बनावट सोने खरे असल्याचे भासवून महिलेची ५० हजार रुपयाची फसवणूक करणाऱ्या चार परप्रांतीय आरोपींना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली

अण्णा राम बाबूजी सोलंकी वय २३ करण शेलाराम परमार वय १९ दर्गाराम प्रागाराम व ३९ लाखाराम सुनाजी दाबी वय ५५ सर्व राहणार जिल्हा जालोर राजस्थान अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहे

३१ डिसेंबर रोजी वरील चौघांनी एका महिलेस त्यांच्याकडील नकली सोन्यासारखा दिसणारा एक किलो ७०० ग्रॅम वजनाचा हार खरा असल्याचे सांगून महिलेकडील ५० हजार रुपये जबरदस्तीने काढून घेण्याचा प्रयत्न केला होता याबाबत एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा



दाखल करण्यात आल्यानंतर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपास करून वरील चौघांना अटक केली त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेला मोबाईल एक दुचाकी सोन्यासारखा दिसणारा हार असा एक लाख चार हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे या चौघांना एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे

तसेच शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जगन्नाथ मल्लिनाथ कोळी राहणार होडगी, हनुमंत राजू चौगुले राहणार मंडी वस्ती शितल किसन सिंग शिवसिंग वाले राहणार मोदी गल्ली विवेक गोविंद राज बीट राहणार एमआयडीसी प्रसाद नारायण देवगन राहणार मंगळवार पेठ यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून फौजदार चावडी जेलरोड एमआयडीसी पोलीस ठाण्यातील गुन्हे उघडकीस आणले या पाच आरोपींकडून पोलिसांनी चार गुन्हे उघडकीस आणून त्यांच्याकडून दोन लाख सहा हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम राजकुमार उपायुक्त डॉक्टर दिपाली काळे सहाय्यक आयुक्त राजन माने पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय पाटील पोलीस अंमलदार राहुल तोगे आबाजी सावळे अजिंक्य माने धीरज सातपुते विठ्ठल वलमार सतीश काटे काळे मच्छिंद्र राठोड प्रकाश गायकवाड यांनी केली.

## कुरूलमध्ये वृध्दास बेदम मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

मोहोळ तालुक्यातील कुरूल येथे पूर्ववैमनस्यातून वृध्दास तिघांनी बेंदम मारहाण करून जखमी केले. हा प्रकार बुधवार सकाळी दहा वाजता कुरूल परिसरात घडला. सुरेश लिंबाजी पाटकर (६५, रा.कुरूल ता. मोहोळ) असे मारहाण झालेल्या वृध्दाचे नाव आहे.

भालचंद्र पाटकर व इतर दोघे आणि यातील जखमी सुरेश यांच्यात बुधवारच्या घटनेपूर्वी तक्रार झाली होती. यातूनच भालचंद्र आणि इतर दोघे सुरेश यांच्यावर चिडून होते. दरम्यान बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास सुरेश हे शेतात काम करताना, भालचंद्र व इतर दोघे तेथे आले. त्यांनी संगनमत करून सुरेश यांना लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार करून बहिण ताई यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



सोलापूर : विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथील विजय चव्हाण, सुरेश राठोड व कायदेशीर सल्लागार प्रकाश जाधव यांनी दैनिक 'तरुण भारत'चे संचालक ॲड. चैतन्य पेठे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार केला.

# पोलीस ठाण्यात नागरिकांच्या तक्रारी जागेवरच सोडविल्या जाणार

**दर शनिवारी प्रत्येक पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिन**

**पोलीस ठाणे पीपल फ्रेंडली करण्याचा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचा संकल्प**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे अत्याधुनिक यंत्रसामुग्रीसह अपग्रेड करून दर शनिवारी पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिन म्हणून साजरा करण्यात येणार असल्यास ते सांगून पोलीस ठाणे पीपल फ्रेंडली करण्याचा संकल्प केला असल्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले

पोलीस अधीक्षक कुलकर्णी हे सोलापुरात रुजू झाल्यानंतर नुकत्याच विधानसभा निवडणुका पार पडल्या यावेळी कोणताही अनुचित प्रकार जिल्ह्यात घडलेला नाही अधीक्षक कुलकर्णी यांनी केंलेल्या त्यांच्या योग्य नियोजनामुळे मतदान प्रक्रिया व मतमोजणी वेळी कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही

सोलापूर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे अपग्रेड करण्यासाठी आपण प्रयत्न




करत असून जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्याच्या इमारती कमकुवत झालेल्या दिसून आल्या त्यामुळे या पोलीस ठाण्याच्या इमारती बांधकामाचे प्रस्ताव सध्या मंजूर करून त्यावर काम करण्याचे सुरू आहे सोलापूर जिल्ह्यातील पाच पोलीस ठाण्यांचे बांधकाम पूर्ण झालेले असून पंढरपूर येथील पोलीस संकुलाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार आहे पोलीस ठाणे हे पीपल फ्रेंडली करण्यासाठी पोलीस ठाण्यांमधील अंमलदारांना नागरिकांना कशा पद्धतीने वागणूक दिली पाहिजे याबाबतचे प्रशिक्षण देऊन पोलीस ठाणे पीपल फ्रेंडली करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे तसेच पोलीस ठाण्यामध्ये दर शनिवारी तक्रार निवारण दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागरिकांनी त्यांच्या तक्रारी घेऊन पोलीस ठाण्यात यावे दर शनिवारी त्यांच्या तक्रारींचे निराकरण त्यांच्या समोरच करण्यात येईल ज्या तक्रारींमध्ये निराकरण होणार नाही त्या माध्यमातून कायदेशीर कारवाईचा मार्ग अवलंबिला जाणार आहे तसेच महिला सुरक्षा बाबत पोलिसांना प्रशिक्षित करण्यात येऊन महिला सुरक्षा बाबत काम करण्यात येणार आहे जिल्ह्यामध्ये शेतीच्या बांधावरून होणारी वाद मोठ्या प्रमाणात असल्यामुळे महसूल आणि पोलीस विभाग मिळून हे वाद सोडविण्यासाठी चालू वर्षांमध्ये मोहीम राबविण्यात येणार आहे



गुन्हेगारांना गुन्हेगारी कृत्या पासून रोखण्यासाठी सुरू करण्यात आलेला पहाट या उपक्रमांतर्गत लवकरच रोजगार मेळावा घेण्यात येणारा आहे सध्या या उपक्रमात सहभागी झालेल्या तरुणांचे कागदपत्रे जमिनीचे काम सुरू आहे

ग्रामीण पोलीस दलातील प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याला पोलिसांच्या रेकॉर्डवरील किंवा दोन पेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारांना त्यांच्या गुन्हेगारी कृत्यापासून परावृत्त करण्यासाठी गुन्हेगार दत्तक योजना सुरू करण्यात येणार आहे जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याला दोन ते पाच गुन्हेगार दत्तक देण्यात येणार आहे हे अधिकारी या गुन्हेगारांवर सतत लक्ष ठेवून असणार आहेत त्याचप्रमाणे ग्राम सुरक्षा दल पोलीस पाटील यांना देखील गावांमध्ये तंटे होऊ नयेत म्हणून तसेच चोऱ्या होऊ नये म्हणून ॲक्टिव्हेट करण्यात येणार आहे जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या आस्थापनांनी जास्तीत जास्त सीसीटीव्ही लावण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी केले जेणेकरून चोरांवर मोठ्या प्रमाणात अंकुश ठेवण्यात यश येईल

जिल्ह्यातील हातभट्टीच्या निर्मूलनासाठी सुरू करण्यात आलेले ऑपरेशन परिवर्तन हे चालू असून या ऑपरेशन अंतर्गत मुळेगाव तांडा येथे आणखी एक प्रकल्प उभारण्यात आला आहे या प्रकल्पातून हातभट्टी व्यवसायात असणाऱ्या लोकांना रोजगार निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत असे अधीक्षक कुलकर्णी यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### जि. प. कर्मचारी पतसंस्था क्रमांक एकच्या तज्ज्ञ संचालकपदी देशमुख

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक १ या संस्थेची संचालकाची बैठक चेअरमन डॉ. एस. पी. माने अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यामध्ये चतुर्थ श्रेणी संघटनेचे जिल्हा प्रमुख माजी संचालक व चेअरमन यांची एकमताने तज्ञ संचालक म्हणून निवड करण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शक पंडित भोसले, जेष्ठ संचालक विवेक लिंगराज, पॅनल प्रमुख दयानंद परिचारक, श्रीशैल देशमुख, भरतकुमार कदम आदी उपस्थित होते. याप्रसंगी संचालक व्हाईस चेअरमन सुरेश कुंभार, विष्णू पाटील, शहाजहान तांबोळी, श्रीधर कलशेट्टी, विशाल घोगरे, तजमुल मुतवली, गजानन मारडकर, शिवानंद म्हमाने, किरण लालबोंद्रे, विकास शिंदे, चेतन वाघमारे, शिवाजी राठोड, विजयसिंह घेरडे, मृणालिनी शिंदे, श्वेतांबरी राऊत आदी उपस्थित होते. बैठक यशस्वीतेसाठी सचिव दत्तात्रय देशपांडे, अशोक पवार, सुभाष काळे, विनोद कदम आदींनी परिश्रम घेतले.



### दिनदर्शिकेचे महत्त्व आजही कायम : प्रा. करजगीकर

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

आधुनिक काळात आधुनिक पद्धतीने प्रसिद्ध होणारे दिनदर्शिकेचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. कॅलेंडर आज प्रत्येक घराची गरज बनली आहे, असे मत कासिद दिनदर्शिकेच्या प्रकाशन प्रसंगी प्रा. बी.एच. करजगीकर यांनी व्यक्त केले. ज्येष्ठ साहित्यिक अय्यूब नल्लामंदू यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून कॅलेंडरचे महत्व विषद केले याप्रसंगी प्राचार्य इ. जा. तांबोळी, हसीब नदाफ, ग्रंथपाल जाफर बांगी, अन्सार नल्लामंदू, मजहर अल्लोळी, सय्यद इक्बाल उपस्थित होते. सूत्रसंचालन मजहरनी केले तर आभार अबरार यांनी मानले.



### सेवासदन महाविद्यालयाचे निबंध, प्रश्नमंजुषा स्पर्धेत घवघवीत यश

**सोलापूर दि. १ जानेवारी-**

येथील श्री. हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर आयोजित स्व.श्रीराम पुजारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत सोलापूरच्या सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयातील वैष्णवी थोरात हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले तर मानसी गायकवाड हिला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. मोबाईल व संगणक नसते तर, आणि लोकशाही व निवडणूक या विषयावर ही निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. त्यात थोरात आणि गायकवाड या विद्यार्थिनींनी निबंध सादर केला होता. तसेच वालचंद कला आणि शास्त्र महाविद्यालयाने आयोजित केलेल्या अहिंसा प्रश्नमंजुषा स्पर्धेत महाविद्यालयातीलच संस्कृती माने, समिक्षा भानवसे, रत्नप्रभा अवताडे आणि सुधाराणी नागलगाव या विद्यार्थिनींना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींना प्रा. योगिनी गायकवाड आणि प्रा. गीता मोहोळकर यांचे मार्गदर्शन लाभले. यासाठी पुणे सेवासदन संस्था सोलापूर शाखेच्या अध्यक्षा श्रीमती शीला मिस्त्री, उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, सचिव वीणा पतकी कार्यकारिणी सदस्य डॉ. श्रीकांत येळगावकर, श्रीमती विद्या लिमये, पद्माकर कुलकर्णी, सेवासदन कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कुलकर्णी यांनी पारितोषिक प्राप्त सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

# मसरे कुटुंबियांच्यावतीने नंदीध्वजाची मनोभावे पूजा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

ग्रामदैवत सिद्धरामेश्वर यात्रेतील योगदंडाचे प्रतीक असलेले नंदीध्वज पूजनाचा शहरात घरोघरी सुरु असून 'बोला ...बोला एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र, श्री सिद्धारामेश्वर महाराज की जय' अशा घोषणा देत भक्तिमय, आनंददायी आणि मंगलमयी वातावरणात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत नंदीध्वजांचे पूजन सम्राट चौक येथील मसरे टाऊनशिप येथे मोठ्या भक्तिभावाने करण्यात आले.

ग्रामदैवत सिद्धरामेश्वर यात्रेतील नंदीध्वजाचे पूजन श्रद्धा व प्रतिक मसरे दाम्पत्य यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. नंदीध्वजाला आकर्षक पद्धतीने सजविण्यात आले होते. यावेळी नंदीध्वजांचे विधिवत पूजन करून महाआरती करण्यात आली. राजशेखर स्वामी यांनी मंत्रोच्चाराचे पठण केले.

यात्रेच्या अगोदर आपल्या घरी नंदीध्वज पूजनासाठी यावेत अशी अनेक भक्तांची इच्छा



असते. सोलापूर शहर परिसरात हे नंदीध्वज पूजनासाठी घेऊन जातानाचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. यावेळी आ. विजयकुमार देशमुख, श्री सिद्धेश्वर पंचकमिटीचे विश्वस्त मल्लिनाथ मसरे, सोलापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले, सुनिल मसरे, अनिल मसरे, मानकरी राजशेखर हिरेहब्बू, सोमनाथ भोगडे, सुधीर थोबडे, मनोज हिरेहब्बू, जगदीश हिरेहब्बू, संदेश भोगडे, सोमनाथ मेंगाणे, मनीष मसरे, सारंग मसरे यांच्यासह नंदीध्वजधारक व भक्तगण उपस्थित होते.

# नवचेतना, आधारशिला बालशिक्षण अभ्यासक्रम प्रकल्प राबविणार

**बाल विकास प्रकल्पाधिकारी ढेपे यांचा मानस**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

शासनाचे आदेशानुसार अंगणवाडी सेविका व मदतनीस रिक्त पदांची भरती पूर्ण करण्याचा मानस आहे. पोषण पंधरवडा व पोषण महा मध्ये पोषण विषयक जनजागृतीचे अनेक उपक्रम राबवण्याचा मानस आहे. पोषण भी पढाई भी अंतर्गत ''नवचेतना'' व ''आधारशीला'' बालशिक्षण अभ्यासक्रमाबाबत प्रकल्पातील सर्व सेविकांना प्रशिक्षित करण्याचा मानस आहे. अंगणवाडी केंद्रामध्ये पोषण विषयक विविध उपक्रम घेऊन त्याची नोंद पोषण ट्रकर ॲप मध्ये करून सेविकांना यांना शंभर टक्के मिळेल योग्य ते प्रयत्न करेन. असा विश्वास बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक ढेपे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान,



सोलापूर शहरी आणि ग्रामीण भागामध्ये अंगणवाडीच्या माध्यमातून विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचवणे, आरोग्याबद्दल जनजागृती उपोषण कमी करणे यांसह विविध योजना आणि त्याच्या मलबजावणी प्रभावीपणे करण्याचा संकल्प या नववर्षाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

# खमितकर विद्यामंदिरचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

सन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री. ल. अं.खमितकर बालक मंदिर व विद्यामंदिरचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

मंडळाचे अध्यक्ष सुर्यकांत शहा, संस्थेचे सचिव अजितनाथजी उपाध्ये यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. यावेळी आडत व्यापारी राहुल भारत आळंद, प्रसिद्ध व्यवसायिक कमलेश दिगंबर घोरपडे, संस्थचे विश्वस्त सुशीला उपाध्ये, देवेंद्रजी शटगार, बाहुबली उपाध्ये, भारत उपाध्ये तसेच ला. ब. शास्त्री प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका दर्शना उपाध्ये, न. फु. शहा कोठारी हायस्कूलचे मुख्याध्यापक रमेश यादवाड हे उपस्थित होते.



मुख्याध्यापिका प्रतिभा शटगार यांनी प्रास्ताविकेत शाळेतील विवध उपक्रम व प्रगती बाबत सांगितली. मान्यवरांच्या शुभहस्ते नटरंग म ूर्ती, रंगमंच पूजन करून फीत कापून उद्घघाटन करण्यात आले. विद्यामंदिरच्या प्रत्येक वर्गातील एका विद्यार्थ्यांस ''आदर्श विद्यार्थी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. स्नेहसंमेलनात विद्यार्थी गोंधळ गीत, गणेश वंदना, नमोकार मंत्र, रिमिक्स गीत, मंगळागौर गीत, राजस्थानी गीते सादरीकरण करून पालक प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.सुपाते, गाण्यांचे सूत्रसंचालन आरती उपाध्ये केले. उपस्थितांचे आभार श्री. अजेटराव यांनी मानले.

# सौदी अरेबियाच्या शास्त्रज्ञांनी दिली जिल्हा परिषद शाळा शिंगडगावला भेट

**विद्यार्थ्यांच्या प्रश्नाने गेले भारावून**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

सौदी अरेबियामध्ये १२० देशांच्या प्रतिनिधींबरोबर पर्यावरणाचे संशोधन करणारे डॉ. नागनाथ पाटील यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगडगावला सदिच्छा भेट दिली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंगडगावचे ते माजी विद्यार्थी आहेत. या शाळेचे अनेक विद्यार्थी देश-विदेशात विविध खात्यामध्ये उत्कृष्ट कार्य करीत आहेत. यांपैकी डॉ. पाटील हे आहेत. शालेय परिसर, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, सभाधीटपणा पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. सुरुवातीला शाळेच्या विद्यार्थ्यांनी




फुल आणि बनवलेले बुके देऊन त्यांचे स्वागत केले. डॉ. पाटील यांनी आपल्या शिक्षणाचा प्रवास सांगितला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून त्यांची मुलाखत घेतली. डॉ पाटील यांनी त्यांना समर्पक उत्तरे देऊन मार्गदर्शन केले. सौदी अरेबिया येथील शिक्षण, शेती, पर्यावरण, पाणी, प्राणी अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांशी डॉ. पाटील यांनी संवाद साधला. विद्यार्थी मनोगतात म्हणाले, सौदी अरेबिया विषयी आम्ही फक्त ऐकून आणि वाचून होतो. प्रत्यक्ष तेथील शास्त्रज्ञांकडून आम्हाला माहिती मिळाली. याप्रसंगी सिकंदर शेख, संजय साखरे, डॉ. अनिल सर्जे, विजय व्हनकडे हे शिक्षक उपस्थित होते.

# कौशल्य व रोजगाराभिमुख शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी प्रगती साधावी

**प्र-कुलगुरू प्रा. दामा यांचे आवाहन**

**स्कूल कनेक्ट अभियानाचा दयानंद महाविद्यालयातून प्रारंभ**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जानेवारी-**

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात आपल्या आवडी व छंदाप्रमाणे शिक्षण घेण्याची संधी असून कौशल्य व रोजगाराभिमुख शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी प्रगती साधावी, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी केले. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मुळे उच्च शिक्षण व्यवस्थेचे संपूर्ण नूतनीकरण आणि व्यापक बदल होत असल्याने त्याची कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन




विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होणाच्या उद्देशाने राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० स्कूल कनेक्ट संपर्क अभियान शहर व जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर आणि उच्च शिक्षण विभागाच्या संचालिका डॉ. नलिनी टेंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली याचा शुभारंभ मंगळवारी दयानंद शिक्षण संस्था येथून प्र-कुलगुरू प्रा. दामा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे यांच्यासह दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक प्राचार्य डॉ. विजय उबाळे, प्राचार्य डॉ. बी. एस. दामजी, प्राचार्य डॉ. शिवाजी शिंदे, प्राचार्य डॉ. क्षीरसागर, प्राचार्य डॉ. गायकवाड, दयानंद असावा प्रशालेचे मुख्याध्यापक प्रा. पवार आदी उपस्थित होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. दामा यांनी नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा आढावा घेत शिक्षण क्षेत्रातील बदलाची माहिती दिली. विद्यार्थ्यांची क्रेडिट बँक, कौशल्य विकास कोर्सेस आणि दरवर्षी मि ळणारे विविध प्रमाणपत्र आणि आव्हाने पेलण्यासाठी या नव्या शिक्षण धोरणात चांगले बदल करण्यात आले आहेत. निश्चितच याचा प्रगतीसाठी फायदा होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. डॉ. गौतम कांबळे यांनी जगातील शिक्षण व्यवस्थेची माहिती देत नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची वैशिष्ट्ये सांगितले.

# मिठातील आयोडिनच्या गुणांमुळे उंचावते जीवनमान

**सोलापूर, दि. १ जानेवारी -**

भारताने लोहाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांना तोंड देण्यात लक्षणीय प्रगती केली आहे.आयोडिन हे एक महत्त्वाचे मायक्रोन्युट्रियंट असून थायरॉइडच्या कामात महत्वाची भूमिका बजावते.१९८३ पासून टाटा सॉल्ट भारतातील आयोडिन कमतरतेच्या समस्येला तोंड देण्यात आघाडीवर आहे. व्हॅक्यूम- इव्हॅपोरेटेड आयोडिनयुक्त मीठ उपलब्ध करणारा पहिला ब्रँड या नात्याने टाटा सॉल्ट लाखो भारतीयांच्या घराघरात पोहोचले आहे.टाटा कन्झ्युमर प्रॉडक्ट्सच्या पॅकेज्ड फुड्स विभागाच्या अध्यक्ष दीपिका भान म्हणाल्या,टाटा सॉल्ट गेल्या कित्येक वर्षांपासून आयोडिन कमतरतेच्या समस्येचे निवारण करण्यासाठी आयोडिनचे योग्य प्रमाण असलेले मीठ पुरवण्यासाठी बांधील आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून आमचा ब्रँड लाखो भारतीयांचे स्वास्थ्य जपण्यासाठी दर्जेदार उत्पादने पुरवत आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### तरूणाच्या खुनाचा प्रयत्न; ८ जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

जुन्या भांडणाचा राग मनात धरून तरूणाच्या खूनाचा प्रयत्न करणाऱ्या आठ जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुरज रामु धोत्रे (वय २९, रा. अविनाश नगर, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन सागर शैलेश बेळमकर, बालाजी रमेश वडेपल्ली, राहुल वासुदेव कोंडी, मन्या अलकुंटे, अक्षय पवार, सागर शिंदे, बाबू धोत्रे, लल्या यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३१ डिसेंबर रोजी सुरज धोत्रे व त्याचे मित्र मल्लिकार्जुन आळगुडने हे कोंडा नगरकडून जाणाऱ्या रोडवर आल्यानंतर सागर बेळमकर व त्याच्या साथीदारांनी सुरज धोत्रे याच्याशी असलेल्या जुन्या भांडणाच्या रागातून धोत्रे व आळगुडने याला मारहाण केली. तसेच त्यांच्यकडील तलवार, कुऱ्हाड, लोखंडी कडा व लोखंडी साखळी या हत्यारांनी सुरज धोत्रे यास ठार मारण्याच्या उद्देशाने मारहाण करून जखमी केले. तर आरोपींनी लोकांच्या दिशेने हत्यारे दाखवून दहशत निर्माण केली. सहायक पोलिस निरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

### मुलगा हवा म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १ जानेवारी -**

मुलगा हवा म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आस्मा जुबेर काझी (वय ३२, रा. लोकमान्य नगर, मजरेवाडी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती जुबेर काझी, सासरे हिदयतमुल्ला, सासू माशम्मा, दीर जुनदे (सर्व रा. अकलूज पंचवटी, जकप्पा वस्ती, सोयमव्हर मंगल कार्यालयसमोर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ जून २००९ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत आस्मा या पती जुबेर याच्यासोबत सासरी नांदत होत्या. त्यावेळी आस्मा यांनी वेळोवेळी एक लाख रुपये हुंडा घेऊन ये म्हणून पती जुबेर व इतरांनी तगादा लावला. लग्नात मानपान केला नाही, चांगले सामान दिले नाही असे म्हणून शिवीगाळ करून तुला तीन मुलीच झाल्या, आम्हाला मुलगा हवा आहे, असे म्हणून आस्मा यांना मारहाण करून शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मणुरे पुढील तपास मणुरे पुढील तपास करीत आहेत.

### सोलापुरात दोन दिवसीय संगीत समारोहाचे आयोजन

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

कै. गुरुवर्य दिगंबरबुवा कुलकर्णी व कै. गुरुवर्य दत्तात्रय दिगंबर कुलकर्णी प्रित्यर्थ सोलापुरात दि. ४ व ५ जानेवारी २०२५ रोजी सरस्वती मंदिर प्रशालेत संगीत समारोह आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संयोजक संदीप कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. दि. ४ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता मुंबई येथील सुनीता टिकारे यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. सुनीता टिकारे यांचे शिक्षण स्व. विदुषी पद्मावती गोखले व गानसरस्वती स्व. किशोरी आमोणकर यांच्याकडे झाले आहे. संतोष कुलकर्णी हे हार्मोनियम साथ व स्वराज कुलकर्णी तबला साथ करणार आहेत. दि. ५ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता पुणे येथील डॉ. रेवा नातू यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. डॉ. नातू यांचे संगीताचे शिक्षण वडील पंडित विनायक फाटक यांच्याकडे झाले आहे. संतोष कुलकर्णी हार्मोनियम आणि तबला साथ गणेश तानवडे करणार आहेत. कार्यक्रम सर्वासाठी खुला आहे. या पत्रकार परिषदेस उमाकांत कुलकर्णी, स्मिता दुलंगे आदी उपस्थित होते.

### शौर्यदिनी रिपाइं डेमोक्रॅटिकच्या वतीने अभिवादन

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) माजी आमदार टी.एम. कांबळे गटाच्यावतीने शिवगंगा नगर येथे १ जानेवारी भिमा कोरेगांव २०७ व्या शौर्यदिनानिमित्त विजयस्तंभाच्या प्रतिकृतीस तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस शहराध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून शौर्यदिन साजरा करण्यात आला. यावेळी महिला जिल्हाध्यक्ष पार्वती खरबडे, जिल्हा कार्याध्यक्ष सिद्राम ढोबळे, शहर उपाध्यक्ष कुंदन गायकवाड, हद्दवाढ भाग अध्यक्ष सचिन चौगुले, इक्बाल पेरमपल्ली, किशोर चौधरी, किशोर गायकवाड, बाळू कांबळे, विजय दांडुरे, नरेश चव्हाण, सागर सरवदे, तानाजी लवटे, दशरथ कजाकवाले, व्यंकटेश म्हेत्रे, प्रतिक सरवदे उपस्थित होते.

# अन्नछत्र मंडळ वाहनतळ-मैंदर्गी-सोलापूर बाह्यवळण रस्ता जोडा


## मंदिर परिसरातील वाहने थेट बाह्यवळण रस्त्याने सोलापूर-गाणगापूर-तुळजापूरकडे सुलभपणे मार्गस्थ होतील

### मैंदर्गी रस्त्यावरील रहिवाशांना पर्यायी रस्ता द्या

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. १ जानेवारी-**

अक्कलकोट तीर्थक्षेत्री स्वामी दर्शन व पर्यटनार्थ मोठ्या प्रमाणात यात्री पर्यटक भाविकाची संख्या वाहनांची वर्दळ प्रचंड वाढत आहे. भविष्यातही हे प्रमाण तीव्र झपाट्याने वाढणार आहे. भाविकांची वाहने सुलभ मंदिर परिसरातील अन्नछत्र मंडळाच्या एसटी वाहनतळ ते मैंदर्गी रस्ता ते सोलापूर बाह्यवळण रस्त्याला जोडणारा अंत्यत जवळचा सुलभ, कमी खर्चामधला पूर्वापार वहिवाटीचा पांदीतील रस्ता विकसित करा अशी मागणी स्वामी भक्तांमधून तसेच मैंदर्गी रस्त्याकडे राहणाऱ्या रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

मैंदर्गी रस्त्याकडे राहणाऱ्या रहिवाशाना शहरात येण्यासाठी भाविकांच्या गर्दीमुळे मंदिर परिसरातून जाणारा मार्ग बंद झाला आहे. गुरुवार, शनिवार, रविवार पौर्णिमा उत्सव यामुळे शहरात जाण्या-येण्यासाठी मैंदर्गी रोडकडे राहणाऱ्या रहिवाशांना अंत्यत अडचणीचे व मंदिर परिसरातील वाहनांच्या गर्दीमुळे धोकादायक झाले आहे. मैंदर्गी रस्ता स्वामी विश्वनगर, समर्थ पार्क, समर्थ विहार, शिवपार्वती नगर, मैंदर्गी रस्ता, हद्दवाढ भागातील नागरिक अक्कलकोट शहरात प्रवेश करताना रोज अनेक समस्यांना जावे लागत आहे. तातडीने नागरिकांना औषध घेण्यासाठी वैद्यकीय उपचारासाठी जावे लागते. भाविकांची रांग रस्त्यावर येत असल्याने परिसरातून मोटारसायकल जाण्यासही पोलिसांकडून बॅरेगेटस् लावली आहेत. पोलिसांनी प्रवेश बंद केला आहे. हे आता नित्याचेच झाले आहे. यामुळे या परिसरातील नागरिकांना जाण्या-येण्यासाठी पर्यायी रस्ता पूर्वापार वहिवाटीची पांदीचा रस्ता रस्ता विकसित करुन द्यावा. या रस्त्यामुळे भाविकांना वाहनतळ ते सोलापूर चारपदरी रस्त्याला व तुळजापूर-गाणगापूर रस्त्याला सुलभपणे जाता येईल. या रस्त्यामुळे अक्कलकोट शहर मंदिर परिसरातील वाहनांची वर्दळ कमी होईल. भाविकांची वाहतेही थेट बाह्यवळण रस्त्याला मार्गी लागतील.





#### मुक्कामासाठी अक्कलकोटला पसंती

तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरी दत्त अवतार श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या लीला, कार्य, महात्म्यामुळे सुपरिचित आहे. याबरोबर येथील यज्ञनगरीचे पर्यावरण शुद्धीचे अग्निहोत्र प्रसार-प्रचार व ऐतिहासिक नवीन राजवाडा, शस्त्र संग्रहालयामुळे पर्यटन वाढले आहे. गाणगापूर, तुळजापूरच्या मध्यवर्ती अक्कलकोटच्या भौगोलिक रचनेमुळे भाविकांच्या मुक्कामाची मोठी पसंती तीर्थक्षेत्र अक्कलकोटलाच आहे. यामुळे अक्कलकोटी भाविकांची संख्य प्रचंड वाढत आहे.

#### रस्ता विकसित करावा

बाह्यवळण मार्गाने मंदिराकडे थेट जाणाऱ्या भाविकांना नवीन पर्यायी मार्ग मिळून अक्कलकोट शहरातील वाहतुकीची कोंडी वाहन पार्किंगची समस्या मार्गी लागेल. अन्नछत्र मंडळ एसटी वाहनतळ ते पांदीतून पूर्वापार वहिवाटीचा रस्ता आहे. तो तातडीने विकसित करणे गरजेचे बनले आहे.

# लिंगायत माळी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा वीरशैव लिंगायत माळी समाज सेवा मंडळाच्या वतीने अखिल भारतीय लिंगायत माळी समाजाचा वधू-वर परिचय मेळावा रविवार दि. ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता मांगल्य मंगल कार्यालय, भारती विद्यापीठ शेजारी आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती सचिव शशिकांत काळी यांनी पत्रकार परिषदेत दिली. श्री.श्री.श्री. १००८ जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी भगवत्पादा (काशीपिठ) यांच्या दिव्य सान्निध्यात, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या अध्यक्षतेखाली आणि मोटार वाहन निरिक्षक, सुरेश माळी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मेळाव्यासाठी वधू-वरांची नोंदणी व्हाटस्ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने सुरू असून त्यांच्या पालकांनी नोंदणी उपाध्यक्ष सुजीत कोरे (९६७३५३९६९३) व संचालक काशिनाथ जोडमोटे (९४२२५३२५०२) यांच्याकडे करावी. तसेच मेळाव्याच्या दिवशीही कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रत्यक्ष येऊन नोंदणी करावी, असे आवाहन काळी (९८५०१६५८७२) यांनी केले आहे. यावेळी उपाध्यक्ष सिध्दाराम कोरे, शिवशंकर अंजनाळकर, सतिश ईसापुरे, शिवानंद म्हेत्री, धनाजी माळी, संचालक मारूती तोडकर, काशिनाथ जोडमोटे, महादेव अंजनाळकर उपस्थित होते.

# महिलेस मारहाण करून तरूणाच्या खुनाचा प्रयत्न

### माजी उपमहापौर प्रमोद गायकवाडसह सहा जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जानेवारी -**

पूर्व वैमनस्यातून महिलेस मारहाण करून तरूणाच्या खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी माजी उपमहापौर प्रमोद गायकवाड यांच्यासह सहाजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सीमा विलास गायकवाड (वय ३५, रा. ब्लॉक नं. २५, सिध्दार्थ हौसींग सोसायटी, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन प्रमोद रामचंद्र गायकवाड, प्रसेनजित उर्फ लकी प्रमोद गायकवाड, हर्षजीत उर्फ विकी प्रमोद गायकवाड, पुतण्या सोन्या उर्फ संजय देवेंद्र गायकवाड, मनोज राजू अंकुश, सनी निकंबे (सर्व रा. सिध्दार्थ हौसींग सोसायटी, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१ जानेवारी रोजी पहाटे एकच्या सुमारास सिध्दार्थ हौसींग सोसायटी येथे सीमा गायकवाड व त्यांच्या शेजारी राहणारे शिरसे आणि शिवशरण यांच्याशी जुने भांडण झाल्याचा राग मनात धरून प्रमोद गायकवाड व इतरांनी दारू पिऊन सीमा गायकवाड यांच्या अंगावर येऊन आदित्य दावणे यास पट्टयाने मारहाण केली. यावेळी सीमा गायकवाड व त्यांची मुले सुमित व रितेश गायकवाड यांना तसेच भांडण सोडवायला आलेल्या निलेश शिरसे, वैभव वाघे यास लोखंडी रॉडने, लाकडी दांडुक्याने ठार मारण्याच्या उद्देशाने मारहाण करून वैभव वाघे यास गंभीर जखमी केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.



# सोलापूर बाजार समिती निवडणूक प्रक्रियेला पुन्हा स्थगिती

### नव्याने प्रारुप मतदार यादी करण्याचे आदेश

### दैनिक 'तरुण भारत'ने प्रसिद्ध केलेले वृत्त ठरले खरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ जानेवारी-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक प्रक्रियेला दुसऱ्यांदा स्थगित करण्यात आली आहे. यापूर्वी सुद्धा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सुरू झालेली बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. आता पुन्हा नव्याने प्रारुप मतदार यादी केल्यानंतरच निवडणूक प्रक्रिया राबिण्याचे आदेश पणन विभगाने दिले आहेत. दरम्यान, याबाबत दैनिक तरुण भारतने यापूर्वीच दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी वृत्त प्रसिद्ध केले होते. नवीन प्रारूप मतदार यादी जाहीर केल्यानंतरच बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू होईल असे संकेत त्याचवेळी दिले होते. अखेर हे वृत्त खरे ठरले आहे.

सोलापूरच्या सहकार क्षेत्राचे लक्ष लागलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली असून, नव्याने प्रारूप मतदार यादी तयार करण्याच्या सूचना सहकार पणन विभागाचे उपसचिव संतोष देशमुख यांनी केल्या आहेत. बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरू होती अर्ज विक्री व स्वीकृतीचा पहिल्या दिवसानंतर ही प्रक्रिया करण्यात आली होती. ३१ डिसेंबर २०२४ रोजी राज्याच्या सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाने नवा अध्यादेश काढून या सूचना केल्या आहेत. दरम्यान, त्यामध्ये सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक कार्यक्रमासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिलेली अंतिम मतदार यादी दि.१ जून २०२४ अखेरच्या दिनांकास धरुन केलेली असल्याने मतदार यादीस दि. २ डिसेंबर २०२४ रोजी ६ महिने पूर्ण झाले आहेत. त्यामुळे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा दि.१ जानेवारी २०२५ पासून आहे त्या टप्प्यावर सुरु होणारा निवडणूक कार्यक्रम स्थगित करुन नव्याने प्रारुप मतदार यादी तयार करुन सुधारीत निवडणूक कार्यक्रम राबविण्यात यावा, असे सूचित करण्यात आले आहे.



> कायद्याच्या तरतुदीनुसार कोणत्याही निवडणुकीसाठी सहा महिन्यांच्या कालावधीनंतर नवीन मतदार यादी केली जाते. जुन्या मतदार यादीतील मतदारांची नावे तपासली जातात. त्यानंतर सदरची नवीन प्रारूप मतदार यादी तयार केली जाते. कायद्याच्या नियमानुसार प्रारूप मतदार यादीस सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला असल्याने, मतदार यादी बनवण्याचे कामकाज सुरू करण्याचे आदेश पणन विभागाने दिले आहेत.
>
> **- मोहन निंबाळकर, पणन उपसंचालक तथा प्रशासक कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर.**

# आमदार सुभाषबापू ॲक्शन मोडवर; भेट दौऱ्यांचा धडाका

## तिसऱ्यांदा भरघोस मताधिक्यांनी विजयी; आमदार-मतदारांमध्ये जीव जडला, ध्यास विकासाचा

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

जनसामान्यांच्या हक्काच्या बापूंना दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी हक्कानेच भरघोस मताधिक्यांनी तिसऱ्यांदा विधानसभेत पाठवले. पहिल्या टर्मपासूनच जनसामान्यांशी प्रेमाची नाळ जोडणारे आ. सुभाषबापू देशमुख यांचे तिसऱ्या टर्ममध्ये मतदारांवरील प्रेम तिप्पट वाढल्याचे चित्र असून मतदार देखील बापूंवर तितक्याच विश्वासाने प्रेम करीत असल्याने बापू आणि मतदारांमधील ऋणानुंबध अगदी घट्ट होताना दिसत आहेत. तिसऱ्या विजयानंतर बापू नव्या जोमाने मतदारांच्या सेवेला लागले असून मतदारसंघाचाा विकास हा एकच ध्यास घेवून बापूंनी मतदारसंघाचे दौरे आणि भेटीगाठींवर सातत्याने भर दिला आहे.

भाजपाचे आ. सुभाष देशमुख आणि सोलापूरकर याचा जुना ऋणानुंबध आहे. पंचवीस वर्षांपूर्वी सुभाषबापू विधानपरिषदेवर आमदार म्हणून गेले ते देखील विक्रम करूनच होय. सोलापूरचे खासदार झाले ते देखील अनेकांना आश्चर्याचा धक्का देतच. माढा लोकसभा मतदारसंघातून पराभूत झाले ते देखील दिग्गज नेते शरद पवारांसमोर सन्मानाची मते मिळवूनच. दक्षिण सोलापूर मतदारसंघातून पहिल्यांदा आमदार झाले आणि राज्याचे सहकारमंत्री देखील झाले. सहकारमंत्री म्हणून काम करताना सोलापूरचे नाव महाराष्ट्रात गाजवले. दक्षिण सोलापूर मतदारसंघातूनच नुकतेच तिसऱ्यांना आमदार म्हणून विजयी झालेले बापू आणि मतदार यांच्यातील नाते आता या वळणावर खूपच घट्ट होताना जाणवत आहे. विजयानंतर बापूंनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, यंदा निवडणूक लढविण्याची इच्छा नव्हती पण पक्षश्रेष्ठींचा आदेश मानून निवडणूक लढविली आणि मतदारांच्या विश्वासाला तिसऱ्यांदा पात्र ठरलो आहे. मतदारांचा हा विश्वास आता इतका दृढ झालेला आहे की, मतदारसंघाचा विकास आणि सामान्यांना न्याय हा एकच आपल्या जीवनाचा ध्यास आहे.



संवाद आपुलकीचा...विश्वासाचा हे घोष वाक्य घेवून आमदार सुभाषबापूंनी लोकसंवादाचा जीव्हाळ्याचा कार्यक्रम जैसे थे मोठ्या जोमात राबविण्यास सुरुवात केलेली आहे. मतदारसंघातीलच नव्हे तर इतरही अनेक लोक बापूंच्या लोकसंवाद कार्यक्रमात गाऱ्हाणी घेवून येतात आणि चेहऱ्यावर समाधान घेवून बाहेर पडतात. आ. सुभाष देशमुख यांनी गावभेटींचा दौरा नियमितपणे सुरु ठेवून मतदारांचे ऋण व्यक्त करण्यास प्रारंभ केला आहे.

लोकमंगल फाऊंडेशनच्या माध्यमातून आ. सुभाष देशमुख यांनी सोलापूर शहर-जिल्ह्यातील शेकडो मुला-मुलींचे विवाह लावलेले असून सामुहिक विवाह सोहळ्याच्या माध्यमातून अनेक वर्षे हे त्यांचे सामाजिक कार्य जोमात सुरु आहे. लोकमंगल फाऊंडेशनच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांना दोन वेळचे भोजन नित्यनियमाने पोहचवले जाते. लोकमंगल बँकेच्या माध्यमातून कै. आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून हजारो युवकांना उद्योजक बनिवण्याचेही कार्य मोठ्या जोमाने सुरु असल्याचे दिसून येते. लोकमंगल साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना संपन्न करण्याचे कार्य देखील अविरतपणे सुरु आहे. दक्षिण सोलापूर मतदारसंघात लोकमान्यतेनेच एमआयडीसी उभारण्याचे स्वप्न देखील आ. सुभाषबापू पूर्ण करण्याच्या प्रयत्नात आहेत. तालुक्याची तहान भागविण्यासाठी शेवटच्या शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळण्यासाठी देखील त्यांची धडपड असल्याचे दिसून येते. आ. सुभाषबापू आणि मतदार यांच्यातील आपुलकीचा धागा मजबूत होत असल्याने मतदारसंघाचा पर्यायाने तालुक्याचा विकास गतीने होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. सुभाष देशमुख यांच्याकडून दक्षिण तालुक्यासह शहरी भागाचा विकास गतीने व्हावा आणि पुढील टप्प्यात सुभाषबापूंना मंत्रिमंडळात स्थान मिळावे, अशी मागणी मतदारसंघातील मतदार करताना दिसतात. बापू आणि मतदार यांचे हे ऋणानुंबधांचे नाते असेच घट्ट होत राहिल्यास बापू दक्षिणचे पर्मनंट आमदार होणार हे मात्र नक्की होय. पण यासाठी आ. सुभाषबापू आणि परिवाराला मतदारांशी एकनिष्ठ राहून मतदारसंघाच्या विकासासाठी कटिबद्ध राहत विकासाचे पर्व उभे करणे काळाची गरज आहे.

#### दक्षिणच्या विकासासाठी गरजेचे

दक्षिण तालुक्याच्या विकासासाठी मंद्रुप येथे एमआयडीसी, वडापूर बॅरेजेस, सीना-भीमा जोड कालवा, टाकळी-वडकबाळ ब्रीज कम बंधारा, मंद्रुप बस स्थानक, बाजार उपसमिती, पुणे-विजयपूर १३ मैल ते मोहोळ राज्य महामार्ग घोषित करणे, मंद्रुपला तालुकास्तरावर इतर प्रशासकीय कार्यालय मंजूर करणे, तालुक्यात शेती पिकांसाठी संशोधन केंद्र गरजेचे, शहरी मतदारसंघात डी-मार्ट ते आतारनगर रस्ता दुभाजकासह करणे, आसरा रेल्वे पूलाचे रुंदीकरण लवकर करणे, छत्रपती संभाजी तलाव सुशोभिकरण, प्राणीसंग्रहालय सुरु करणे, स्मृती उद्यान, वनविहार पर्यटनासाठी प्रयत्न करणे, जुळे सोलापूर एसटी स्थानक, उद्यान सुशोभिकरण, नाना-नानी पार्क आदी कामे मतदारसंघात होणे अत्यावश्यक आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### मंत्री दत्तात्रय भरणे, आनंद चंदनशिवे यांनी केले विजयस्तंभास अभिवादन

**पुणे, दि. १ जानेवारी-**

कोरेगाव भीमा येथे ऐतिहासिक विजय स्तंभास क्रीडा व अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे, माजी क्रीडा राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. विजयस्तंभ परिसर विकास, सर्व सोयीसुविधा व उत्तम नियोजन केल्याबद्दल मान्यवरांचे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, निळी टोपी शाल व पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी माजी नगरसेवक गणेश पुजारी, अंगराज भालशंकर, अविनाश भडकुंबे, चंद्रकांत सोनावणे, अजय इंगळे, युवा मस्के उपस्थित होते.



### जिजामाता प्राथमिक शाळेत विज्ञान, शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदास नगर कोंडी येथे विज्ञान आणि शैक्षणिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन उद्योजक ऋषिकेश भोसले यांच्या हस्ते करण्यात आले तर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर होते.प्रमुख अतिथी म्हणून कोंडी ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया भोसले व श्रीराम भोसले उपस्थित होते. या प्रदर्शनात तीसहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पवन चक्की, ज्वालामुखी, सौर ऊर्जेवर चालणारे यंत्र, आधुनिक शेती, एटीएम आदी प्रयोग व साहित्य विद्यार्थ्यांनी तयार केलेले होते. सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थापिका निर्मलाताई ठोकळ, अध्यक्ष सचिन ठोकळ सचिवा शिल्पा ठोकळ यांनी अभिनंदन केले.

### जय भारत शाळेत आदि जांबमुनी महाराजांना अभिवादन

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

मोची समाजाचे कुलदैवत श्री आदि जांबमुनी महाराज जयंतीनिमित्त जय भारत प्राथमिक शाळेत प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सिद्राम फुले, सचिव दिपक फुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी, श्यामसुंदर हुल्लेनवरु, भाऊसाहेब गवळी, लक्ष्मण गोंड, नीता फुले, राजश्री आंबेकर, रेश्मा म्हेत्रे उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २ जानेवारी २०२५ | कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पुण्यदिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वितीया - (०२.२४) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - श्रवण (२३.१०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - हर्षण (१४.५७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (१३.४८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. समाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ :** विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन :** काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क :** स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह :** लाभ व मान-सन्मान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या :** चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या कामावर खुशी राहील.

**तुळ :** मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक :** राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु :** आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर :** जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ :** आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन:** योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता.

# नकली हार देऊन ५० हजार घेण्याचा प्रयत्न; चौघांना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी -**

सोन्यासारखा दिसणारा नकली हार देऊन तरूणीकडील ५० हजार रुपये घेण्याचा प्रयत्न करणऱ्या राजस्थानमधील चौघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दिपा आनंद टुमणे (वय ३६, रा. सागर चौक, विडी घरकुल, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन आण्णाराम बाबुजी सोलंकी, करण सेलाराम परमार, दरगाराम प्रागाराम, लखाराम सुनाजी दाबी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिपा टुमणे या २७ डिसेंबर रोजी सकाळी पावणे आकाराच्या सुमारास सागर चौक येथील अन्नूपूर्णा स्विटच्या बोळातून जात असताना आण्णाराम सोलंकी व त्याचे साथीदार हे आले. त्यांनी दीपा टुमणे यांना त्यांच्याकडील सोन्यासारखा दिसणारा नकली हात दिपा यांना देऊन त्यांच्याकडील ५० हजार रुपये जबरदस्तीने घेऊन दिपा यांची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिवे पुढील तपास करीत आहेत.

### रूईच्या म्हसोबा यात्रेत गावठी पिस्टलसह गुन्हेगाराचा वावर

**सोलापूर :** रूई (ता. माढा) येथील म्हसोबा यात्रेत सराईत गुन्हेगाराचा वावर असल्याचे उघड झाले असून एका तरूणास मारहाण करून पळून जाताना या गुन्हेगाराकडील गावठी पिस्टलमधील जिवंत राऊंड (गोळी) जमिनीवर पडलेली मिळून आली. याबाबत टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जावेद बाळू काझी (वय ३८, रा. रूई, ता. माढा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरमान अल्लाउद्दीन शेख (रा. रूई) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रूई येथील म्हसोबा देवस्थानची यात्रा सुरु आहे. ३१ डिसेंबर रोजी सकाळी पावणे आकराच्या सुमारास म्हसोबा देवस्थानजवळी भीमा नदीच्या कडेला बशीर मौला मुलानी यास जुन्या भजीच्या हॉटेलच्या वादाच्या कारणावरून आरमान शेख व त्याच्या साथीदारांनी काठीने मारहाण करून जखमी केले. यावेळी बशीर मुलाणी, जावेद काझी यांनी आरमान शेख यास पकडण्याचा प्रयत्न केला असता त्यास पकडताना झालेल्या झटापटीत आरमानच्या कमरेला असलेल्या गावठी पिस्टलमधून एक जिवंत राऊंड खाली जमिनीवर पडली. यावेळी आरमान शेख व त्याचा साथीदार पळून गेला. ती जिवंत राऊंड जावेद काझी यांनी टेंभुर्णी पोलिसांच्या ताब्यात दिली असून याबाबत टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे पुढील तपास करीत आहेत.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक (२)साक्षात्कार

आपली पूण्य भूमी भारत माता. या पुण्यभूमीचे राष्ट्रजीवन हे हिंदू राष्ट्रजीवनच आहे. या त्रिकालाबाधित सत्याचा साक्षात्कार परमपूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांना बाल्यावस्थेतच झाला. हिंदुराष्ट्र हे वादातीत सत्य आहे आणि म्हणूनच राष्ट्र सेवेचे व्रत हाती घेऊन त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना उभी केली. डॉ. स्वतः वृत्तीने कर्मठ व स्वतंत्र बाण्याचे होते. ते सत्यप्रिय राष्ट्रभक्त होते. त्यांनी संघाच्या माध्यमातून हिंदूमध्ये चेतना जागृत केली. हे जागृत चैतन्यच आपल्या राष्ट्राच्या उज्वल भविष्याची हमी देऊ शकतो.

### अलक (३) कृपा

डॉक्टर हेडगेवार यांचा जन्म इ.स. १८८९च्या १ एप्रिलला झाला तो दिवस होता चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडव्याचा. त्याचे नाव केशव ठेवले. त्याच्या वडिलांचे नाव बळीरामपंत हेडगेवार व आईचे नाव पार्वतीबाई होते. त्यांना यमुनाबाईही म्हणत असत. भारताचा गौरवशाली इतिहास; भारतीय अस्मिता; भारताची सांस्कृतिक परंपरा; भारतीय वीरांचा व त्यांच्या यशस्वी पाऊलखुणांचे स्मरण करून देणारा हा दिवस होता. या दिवशीच डॉक्टरांचा जन्म होणे ही त्या जगन्नियंताची कृपाच. त्या काळात पारंपरिक पद्धतीने घरामध्ये भगवा ध्वज उभारला जात होता. रा. स्व. संघ पण भगव्या ध्वजाला गुरु मानतो. **(क्रमशः)**



# नववर्षाच्या स्वागतासाठी भरतनाट्यम् नृत्यप्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

भारतीय चौकातील श्री भवानी मंदिरात नववर्ष स्वागत सोहळ्याच्या निमित्ताने श्रिनीअंबा नृत्यालयाच्या वतीने भव्य भरतनाट्यम नृत्यप्रदर्शन सादर करण्यात आले.

या प्रसंगी संस्थापक श्रीनिवास काटवे यांच्या नेतृत्वाखाली २० हून अधिक नृत्यकलाकारांनी त्यांच्या अद्वितीय सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. नृत्याच्या प्रत्येक मुद्रा, हावभाव, आणि तालींमधून भारतीय संस्कृतीचे सौंदर्य आणि परंपरा साकारण्यात आल्या. या नृत्यप्रस्तुतीने उपस्थितांसाठी एक अद्वितीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अनुभव निर्माण केला. श्रिनीअंबा नृत्यालयाच्या उपक्रमाचे प्रेक्षकांनी मनःपूर्वक कौतुक केले.

कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध होते, आणि वर्षाच्या शेवटच्या दिवशी असा भव्य नृत्यप्रयोग पाहून प्रेक्षक भारावून गेले. या माध्यमातून भारतीय नृत्यशैलीचा प्रसार आणि नववर्षाच्या स्वागताचा सुंदर मिलाफ करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी मंदिराचे सचिव सुरेश फलमरी यांनी श्रीनिवास काटवे यांचा सत्कार केला. याप्रसंगी मंदिर समितीचे प्रा.अंबादास फलमारी, गणेश मिठ्ठा, महेंद्र मुट्किरी तसेच परिसरातील भाविक उपस्थित होते.

# ५ जानेवारीला राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

श्री. भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान व वालचंद शिक्षण समूह आयोजित श्रीमान भाऊसाहेब गांधी महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे स्पर्धेचे आयोजन ५ जानेवारी रोजी केले आहे.

ही स्पर्धा प्राथमिक व अंतिम फेरी अशा दोन फेरीत होईल. स्पर्धेचे विषय नवे शैक्षणिक धोरण-आव्हाने आणि कालानुरूपता, सरकारी 'मोफत' योजना आर्थिक विकासास तारक की मारक, महिला सुरक्षा-चिंता व चिंतन, संत साहित -आदर्श जीवनाचा दीपस्तंभ, कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफीशियल इंटेलिजन्स) आणि चॅट जीपीटी अभ्यास पद्धतीस कुठे नेणार, समाजातले दीपस्तंभ नामशेष होत आहेत का?असे आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक रुपये सात हजार, द्वितीय चार हजार, तृतीय तीन हजार व उत्तेजनार्थ रुपये एक हजारची अशी तीन पारितोषिके देण्यात येणार आहेत.



या स्पर्धेचे उद्घाटन व स्पर्धा वालचंद शिक्षण समूहातील कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५० रुपये शुल्क आहे. या स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयातून दोन व वरिष्ठ महाविद्यालयातून दोन स्पर्धक पाठविता येतील. या स्पर्धेबद्दल अधिक माहितीसाठी स्पर्धा प्रमुख डॉ. दत्ता वाघमारे (९८६०१८६०३७) व प्रा. चेतन तुपकर (९८८१६०९२०३) या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.



# राज्यस्तरीय पद्मशाली वधू-वर मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

जनदर्पण न्यूज चॅनल संचलित श्री व्यंकटेश्वर पद्मावती मॅरेज ब्युरोच्यावतीने रविवारी अक्षय ग्रॅन्ड येथे आयोजित राज्यस्तरीय पद्मशाली वधू वर मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या राज्यस्तरीय पद्मशाली वधू-वर मेळाव्याचे उद्घाटन पूर्वा मेडिकल एजन्सीचे संचालक श्रीधर वडनाल यांच्या हस्ते श्री मार्कंडेय महामुनी आणि बालाजी, पद्मावती प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी जवळपास तीनशे इच्छुक वधू-वरांनी उपस्थिती दर्शविली. या इच्छुक वधू-वर मेळाव्यात सहभागी वधू-वरांत सोयरिक जुळणाऱ्या जोडप्याला पूर्वा मेडिकल एजन्सीकडून मणी, मंगळसूत्र देण्याची घोषणा पूर्वा परिवाराचे श्रीधर वडनाल यांनी केली.

यावेळी कोठेज् ग्रॅस्टोक्लिनिकचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश कोठे, माकम ग्रॅस्टो क्लिनिकचे संचालक डॉ.श्रीकांत माकम, माजी नगरसेविका कुमद अंकारम यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी शिक्षण मंडळाचे माजी सभापती वासुदेव इप्पलपल्ली, जगदीश बोमडयाल, किरण पामू, लक्ष्मीकांत मोने, सन डेव्हलपर्सचे संचालक भुमेश यनगंदुल, श्रीनिवास यनगंटी, जिओ केबल नेटवर्कचे समन्वयक रामदास येलदी, गोपीकृष्ण वड्डेपल्ली, अंबादास बोगा, प्रभाकर स्टिलचे राजय्या गज्जम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार व्यंकटेश दोंता, दिगंबर इप्पलपल्ली, योगीनाथ स्वामी, डॉ. विश्वनाथ आडम, दयानंद अल्लोळी, मॅरेज ब्युरोचे रमेश अन्नलदास, श्रीनिवास सामल, जयश्री सामल, मुरली धारा, दिपीका इप्पलपल्ली यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात हास्य कलाकार अंबादास कनकट्टी यांनी आपली सादरीकरण करुन उपस्थितांची मने जिंकली. सूत्रसंचालन दयानंद अल्लोळी, लावण्या रविंद्र कोटा, योगीनाथ स्वामी, रक्षंदा स्वामी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी भास्कर अल्ली, सागर इप्पलपल्ली, सागर वल्लाल, रविंद्र जाधव, आनंद कोमारी, आशिष भूदत, श्रीनिवास गाजूल, लता गाजूल, उमा दोंता, नयन दोंता, धनंजय वड्डेपल्ली, तेजस मामडयाल, गोपाळ दोंता, श्रीनिवास नल्ला, हणमंतू श्रीराम यांनी परिश्रम घेतले. यावेळी पौरोहित्य म्हणून मल्लेश श्रीराम आणि राचर्ला पंतुलू यांनी वधू-वरांनी पसंद पडलेल्या मुला-मुलींच्या पत्रिका पाहून माहिती दिली.

# एमआयटी सांस्कृतिक संध्या संगीत महोत्सवाचा पं. उपेन्द्र भट यांच्या सुमधुर गायनाने समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १ जानेवारी-**

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारततर्फे लोणी काळभोर येथील विश्वराज बंधारा, विश्वशांती गुरूकुल, राजबाग येथे आयोजित केलेल्या दोन दिवसीय 'एमआयटी सांस्कृतिक संध्या' संगीत महोत्सावाचा समारोप पं. उपेंद्र भट यांच्या सुमधुर गायनाने झाला.

यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, सौ. उषा विश्वनाथ कराड, प्रा.स्वाती कराड चाटे, डॉ. सुचित्रा कराड नागरे, प्रा. सुनीता कराड, डॉ. संजय उपाध्ये, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन.पठाण, दूरदर्शनचे माजी संचालक डॉ. मुकेश शर्मा उपस्थित होते.



'एमआयटी सांस्कृतिक संध्या' च्या समारोप प्रसंगी मध्यरात्री १२ वा. त्याग व समर्पणाचे प्रतीक असलेल्या यज्ञकुंडामध्ये काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर, विकार, विकृती व विकल्प सारख्या दुर्गुणांची आहुती देण्यात आली. पुढील २०२५ वर्ष अत्यंत सुखाने, समाधानाने व शांततेने पार पडावे यासाठी प्रार्थना करण्यात आली. विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,'' नववर्षाच्या पूर्वसंध्येला आपल्यातील अवगुणांची आहुती देऊन उद्यापासून शांतीमय जीवन प्रत्येकाने जगावे. भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात श्रेष्ठ संस्कृती आहे. याचे अनुकरण करून आपल्या आयुष्याची वाटचाल करावी. तरुणांनी स्वधर्म, स्वाभिमान आणि स्वत्व जागवून खऱ्या अर्थाने भारतीय अस्मिता जागविण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न करीत आहोत.''

या संगीत महोत्सावात विश्वशांती संगीत कला अकादमीच्या नृत्यशिक्षिका आदिती रिसवाडकर यांनी कथ्थक नृत्य सादर केले. त्यानंतर एमआयटी एडीटीयूच्या विद्यार्थ्यांनी संथाल लोकनृत्य सादर केले. विश्वशांती संगीत कला अकादमीचे विद्यार्थी व प्रा. अंकित गुप्ता यांचा भक्ती संगीत व हिंदी चित्रपटांचे सुवर्णकाळ त्यावर आधारित संगीतमय कार्यक्रम झाला. प्रा. शशांक दिवेकर यांचे सुगम संगीत गायन, वारकरी संप्रदायातील सुप्रसिद्ध गायिका गोदावरीताई मुंडे यांचे गायन झाले. पं. उपेन्द्र भट यांच्या सुमधूर गायनाने या कार्यक्रमाचा समारोप झाला.



# 'दारू नाही दूध प्या' या उपक्रमाने नववर्षाचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

पश्चिमात्य देशाचे अनुकरण करून सरत्या वर्षाला निरोप देताना रात्री पार्ट्या करून तरुणाई दारू पिऊन झिंगाट वाहने चालवताना आढळते यापासून रोखण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने मध्यरात्री बारा वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात दारू नाही दूध प्या या उपक्रमांतर्गत दुधाचे वाटप करण्यात आले.

तसेच बंदोबस्तावर असणाऱ्या पोलिसांना गुलाबपुष्प देऊन नववर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या संभाजी ब्रिगेड च्या वतीने गेल्या दहा वर्षापासून युवकांना दारू नाही दूध प्या हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष अरविंद शेळके, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, सिताराम बाबर, सुलेमान पिरजादे, फिरोज सय्यद, शेखर स्वामी, रमेश चव्हाण, रमेश तरंगे, संजय भोसले, सतीश वावरे, मल्लिकार्जुन शेवगार, दिनेश वरपे, शेखर कंटीकर, बबन ढिंगणे, वैभव धुमाळ, दिनेश आवटे, गौतम चौधरी, सोहेल शेख, विकास सावंत, आनंदी धुमाळ, राजनंदिनी धुमाळ, विजयालक्ष्मी धुमाळ, ओवी डिंगने आदी उपस्थित होते.

### रोटरी, रुद्र बिल्डर्सतर्फे शनिवारी संगीत संध्या कार्यक्रम

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

रुद्र बिल्डर्स आणि डेव्हलपर्स आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ४ जानेवारी रोजी हृदयात वाजे समथिंग या संगीत संध्याचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षा जान्हवी माखिजा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही संगीत संध्या शनिवार दि. ४ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० ते ९:३० या वेळेत हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे होणार आहे. यामध्ये सुप्रसिद्ध गायक अभिषेक सराफ आणि गायिका तन्वी दाते यांचे गायन होणार आहे. रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थची स्थापना ११ एप्रिल १९७४ रोजी झाली आहे. रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे रोटरी नॉर्थ भैरुरतन दमाणी निवासी अंध शाळा तसेच रोटरी नॉर्थ राधाकिसन फोमरा मूक बधिर शाळा असे दोन सामाजिक प्रकल्प कार्यरत आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामीण भागातील शाळांतील मुलींसाठी स्वच्छतागृह बांधकामासाठी करण्यासाठी केले आहे. सोलापूरकरांनी या संगीताच्या पर्वणीचा आनंद घ्यावा. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य आहे, मात्र पास घेणे आवश्यक आहे, असे जान्हवी माखिजा व प्रमुख संयोजक आसावरी सराफ यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला वंदना गोपकर, आसावरी सराफ, सुजाता शिंदे आदी उपस्थित होते.



# जीएम संस्थेतर्फे भीमा कोरेगावच्या प्रतिकात्मक विजयस्तंभास अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

२०७ व्या भीमा कोरेगाव शौर्य दिनाच्या निमित्ताने जी.एम मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने बुधवार पेठ मिलिंद नगर जीएम चौक येथे भीमा कोरेगाव विजयस्तंभच्या प्रतीकात्मक स्तंभास अभिवादन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.

यावेळी जी.एम. संस्थेचे उत्सव अध्यक्ष हर्षवर्धन बाबरे, जी.एम संस्थेचे विश्वस्त शशिकांत गायकवाड, आप्पासाहेब बागले, दत्ता शिंदे, मुकेश सोनवणे, संतोष कदम, निहाल क्षीरसागर, सोहेल शिरसे, अनिकेत तळभंडारे, आदित्य वाघमारे, संतोष जगताप, गौरव पात्रे, रवी कांबळे, यशपाल कांबळे, निशांत वाघमारे बबलू रणशृंगारे विकी कांबळे अजय कोळेकर अभिनंदन गायकवाड कैलास चंदनशिवे बलभीम शिंदे एम एस जमादार तेजस कांबळे आदी पदाधिकारी व मित्रपरिवार उपस्थित होता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### दारू नको, दूध प्या; मोडनिंबमध्ये जनजागृती

**मोडनिंब, दि. १ जानेवारी-**

युवा पिढीला व्यसनापासून परावृत्त करण्याची गरज आहे. सरत्या वर्षाला निरोप देऊन तरुणांना दारू नको, दूध प्या असे आवाहन सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उदय माने यांनी केले. सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सोलापूरपुणे महामार्गालगत माढा तालुक्यातील मोडनिंब येथे दुग्धपान उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमास तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. या दुग्धपान उपक्रमास तरुणांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित तरुणांनी व्यसनापासून दूर राहणार, असा संकल्प करीत नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले. नववर्षाच्या पूर्व संध्येला मोफत दुधाचे वाटप करून तरुणांना व्यसनमुक्त राहण्याचा संदेश देण्यात आला.




### शाह कन्या प्रशालेत आनंद बाजार मेळावा

**बार्शी, दि. १ जानेवारी-**

विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर व्यवहाराचे ज्ञान मिळाले तर भविष्यात विद्यार्थी उत्तम व्यावसायिक बनतील, त्यामुळे आनंद बाजारसारखे उपक्रम शाळेत आयोजित करावेत, असे विचार प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे यांनी उद्घाटनप्रसंगी केले. यावेळी विद्यार्थिनींनी खाद्यपदार्थ, भाजीपाला, ज्वेलरी, कपडे यांची दुकाने लावली होती. या बाजारात २८ ते ३० हजार रुपयांची उलाढाल झाली. विद्यार्थीनी व पालक खरेदी करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका शुभदा जोशी, संदेश घाडगे, महेश काळे, वैष्णवी हातोळकर, आयुब शेख, ज्योती अगरवाल, रवी पोरे व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### हरंगुळ-पुणे रेल्वे गाडीला मिळाली मुदतवाढ : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**बार्शी, दि. १ जानेवारी-**

हरंगुळ -पुणे (गाडी क्र. ०१४८७) व पुणे -हरंगुळ (गाडी. क्र. ०१४८८) या गाड्या लातूरसह धाराशिव व बार्शी येथील प्रवाशांची पुण्याला जाणारी महत्त्वाची गाडी असून सदर रेल्वे गाडीस मुदत ३० डिसेंबर २०२४ रोजी संपत होती. लातूर-धाराशिव-बार्शी येथून मोठ्या प्रमाणात नागरिक पुण्याकडे ये-जा करत आहेत. ही गाडी रेल्वे प्रवाशांच्या सोयीची असल्याकारणाने पुणे-लातूर ये-जा करणे सोईचे झाले होते. परंतु रेल्वे निर्णयानुसार मुदत संपत आल्याने खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सदर गाडीस मुदतवाढ देण्याबाबत महाप्रबंधक मध्य रेल्वे मुंबई यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार सदर रेल्वे गाडीस मुदतवाढ दिली असल्याचे रेल्वे मुख्यालय मुंबई यांच्याकडून कळविण्यात आले आहे.





### सचिन वायकुळे, जळगावच्या तृतीयपंथी शमिभा पाटील यांचा गौरव

**बार्शी, दि. १ जानेवारी-**

वंचित आणि दुर्बल घटकांसाठी समर्पित भावनेने काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्यासाठी दिपगंगा भागीरथी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि शारदा वृद्धसेवाश्रम (सांगली आणि कोल्हापूर) यांच्यावतीने राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा संस्थेचे प्रमुख दीपक लोंढे यांनी केली. या पुरस्कारांचे वितरण श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते कोल्हापुरात होणार आहे. बार्शीचे लेखक आणि पत्रकार सचिन वायकुळे तसेच जळगावच्या विधानसभेच्या तृतीयपंथी उमेदवार शमिभा पाटील यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी या पुरस्काराने सन्मानित केले जात आहे. सचिन वायकुळे यांनी मागील १५ वर्षांपासून देहविक्रय करणाऱ्या महिलांसाठी आणि ८ वर्षांपासून तृतीयपंथीयांच्या हक्कांसाठी लढा दिला आहे. आपल्या लेखणीच्या माध्यमातून त्यांनी व्यवस्थेचे लक्ष या वंचित गटांच्या समस्यांकडे वेधले. शमिभा पाटील, तृतीयपंथी हक्क व संरक्षण समितीच्या महाराष्ट्र समन्वयक, या साहित्य आणि सामाजिक कार्यक्षेत्रात चमकणारे नाव आहेत. विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात उमेदवारी करणाऱ्या पहिल्या तृतीयपंथी उमेदवार म्हणून त्यांनी नवा इतिहास घडवला. हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा सन्मान नाही तर वंचित समाजासाठी दिल्या जाणाऱ्या योगदानाचा आणि त्यांच्या हक्कांच्या लढ्याचा गौरव आहे.

### दारू नको, दूध प्या; नववर्षाच्या पूर्वसंध्येला वाणीचिंचाळे येथील युवकांचा उपक्रम

**सांगोला, दि. १ जानेवारी-**

'द दारूचा नाही, द दुधाचा' असा संदेश देत वाणीचिंचाळे ता.सांगोला या गावातील तरुणांनी नववर्षाचे स्वागत दारू पिऊन नको अश्या माध्यमातून साजरा केला. गावातील रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्यांना दूध वाटप करून गावातील ग्रामस्वच्छता करून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले. तसेच युवकांमध्ये वाढती व्यसनाधीनता कमी करण्यासाठी सकारात्मक बदल म्हणून हा उपक्रम राबवण्यात आला असल्याचे येथील युवकांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन रामलींग पाटील यांनी केले. यावेळी जितेंद्र गडहिरे, संतोष पवार, महेश गडहिरे, सचिन गायकवाड, दिलीप सवणे, आप्पया स्वामी, संभाजी गवळी, दगडु पाटील, आण्णा गवळी यांच्यासह गावातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृक्ष संवर्धन समितीच्या अखंड श्रमदानास दोन हजार दिवस पूर्ण

**● पाच वर्षात २५ हजार वृक्ष लागवड अन् संगोपन**




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ जानेवारी-**

वृक्ष संवर्धन बार्शीच्या दररोज चालणाऱ्या अखंडीत श्रमदानास आज दोन हजार दिवस पूर्ण झाले. साडेपाच वर्षांपासून वृक्ष संवर्धन समितीचे श्रमदान दररोज सकाळी सहा ते आठ या दरम्यान चालते. ५ जून २०१९ पासून सुरु झालेले हे कार्य आजपर्यंत अखंडित सुरु आहे. या पाच वर्षांत वृक्ष संवर्धन समितीमार्फत बार्शी शहर व परिसरात जवळजवळ पंचवीस हजार वृक्ष लागवड करुन ती संवर्धित करण्यात आली आहेत.

उन्हाळा असो, पावसाळा असो किंवा हिवाळा एकही दिवस खंड न पडता वृक्ष संवर्धन समितीचे कार्य सुरु आहे. करोनासारख्या महामारीत देखील हे कार्य सर्व नियम पाळून अखंडीत सुरु होते. दररोजच्या या श्रमदानात वृक्ष लागवड करणे, लावलेल्या झाडांना आळी करणे, पाणी देणे, काळी माती टाकणे, खत टाकणे, वाकलेल्या झाडांना सरळ करणे, त्याची योग्य कटाई करणे, शपरिसर स्वच्छता करणे आदी कार्य केले जाते. या पाच वर्षांत वृक्ष संवर्धन समितीने शहरातील अनेक मोठे रस्ते, अंतर्गत रस्ते,ओपन स्पेस, शासकीय कार्यालय, विविध शाळा, स्मशानभूमी, मंदिर परिसर आदी ठिकाणी वृक्ष लागवड करुन वृक्षांचे संवर्धन केले आहे. वृक्ष संवर्धन समितीची दुर्मिळ वृक्षांची नर्सरी देखील आहे.

यामध्ये दुर्मिळ वृक्षांच्या बिया गोळा करुन त्याची रोपे बनवली जातात व नंतर ती योग्य ठिकाणी लावली जातात. अखंडित आणि अविरत श्रमदानाचा २००० वा दिवस आज शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते केक कापून साजरा करण्यात आला. यावेळी कॅन्सर तज्ञ डॉ. राहुल मांजरे, प्रा. शशिकांत धोत्रे, हेल्थ क्लबचे भगवान लोकरे, पवनकुमार देशमुख, मदन देगावकर, संतोष घावटे हे उपस्थित होते. यावेळी वृक्ष संवर्धन समितीचे सदस्य तसेच हेल्थ क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**देशी, दुर्मिळ झाडांचा समावेश**

वृक्ष संवर्धन समितीमार्फत शहरात दोन ठिकाणी दुर्मिळ वृक्षांचे उद्यान देखील उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये विविध जातीची देशी आणि दुर्मिळ होत असलेली झाडे लावून ती संवर्धित केली जात आहेत, अशी माहिती वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष उमेश काळे यांनी दिली.

## ब्राह्मण महासंघाचे कार्य कौतुकास्पद : मिलिंद देशपांडे

**ज्येष्ठ व्यक्तींसह मान्यवरांचा सत्कार**




**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ जानेवारी-**

ब्राह्मण समाजाच्या विकासासाठी कार्य करणारी ब्राह्मण महासंघ ही संस्था असून या संस्थेच्या माध्यमातून समाजातील गरजू,गरीब लोकांना एक मदतीचा हात दिला जात आहे. ब्राह्मण महासंघाच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षात अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविले गेले आहेत. त्यामुळे बार्शीच्या ब्राह्मण महासंघाचे कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोदगार मिलिंद देशपांडे यांनी व्यक्त केले.

ब्राह्मण महासंघाने आयोजित केलेल्या समाजातील ज्येष्ठ व्यक्ती व डिसेंबर महिन्यातील ज्या ज्ञाती बांधवांचे वाढदिवस होते त्यांच्या सत्कारप्रसंगी अध्यक्षपदावरुन ते बोलत होते. या कार्यक्रमाचे प्रायोजक श्री. अशोक कुलकर्णी, माजी मुख्याध्यापक यांचा व त्यांच्या सौभाग्यवती मीनाक्षी कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. याच कार्यक्रमात बार्शीतील नामवंत गायक श्री. माणिक कुलकर्णी, निलेश घाटे, अंकिता घाटे यांचा गाण्याचा बहारदार कार्यक्रम झाला. त्यामध्ये ओंकार प्रधान रुप गणेशाचे, कानडा राजा पंढरीचा, कौसल्याचा राम, आने से उसके आये बहार, ने मजसी ने परत मातृभूमीला अशी एकाहून एक सुंदर गीते सादर झाली. त्याला ज्ञाती बांधवांनी भरभरुन प्रतिसाद दिला. याप्रसंगी गायक कलाकारांचाही सत्कार करण्यात आला. समाजातील जेष्ठ व्यक्ती प्रभाकर कुलकर्णी (सेवानिवृत्त शिक्षक), सौ. अर्चना कुलकर्णी (माजी गटशिक्षणाधिकारी) यांच्याबरोबरच नुकत्याच फिजिओथेरपिस्ट झालेल्या कु.समृद्धी अनिल देशपांडे, कु. सिद्धी सुहास शामराज यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच समाजातील ६० ज्ञाती बांधवांचा वाढदिवसाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व्यंकटेश कुलकर्णी यांनी तर सूत्रसंचालन व आभार अनिल काळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेश कुलकर्णी, सुधीर टांगसाळे, भर्तरी कुलकर्णी, जगदीश कुलकर्णी, मुकुंदशेठ कुलकर्णी, विजय कुलकर्णी, एम.डी. कुलकर्णी, लक्ष्मीकांत कुलकर्णी, सुवर्णा कुलकर्णी, गौरी पाटील, स्वप्ना केसकर, प्रेरणा कुलकर्णी, सुरेखा कुलकर्णी, पूजा शिरशीकर यांनी परिश्रम घेतले.

## जि. प. शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यास विलंब का?

**पालक वर्गातून सवाल**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यास विलंब का होत आहे असा प्रश्न पालकांमधून विचारला जात आहे. तर शासनाने आदेश देऊनही अद्यापही विद्यार्थ्यांचा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवरच आहे.

महाराष्ट्र शासनाने २९ ऑगस्ट रोजी शासन निर्णयाद्वारे सर्व शाळांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा आदेश दिला आहे. मात्र प्रशासनाने या आदेशाचे अद्यापही पालन केलेच नाही. शासनाच्या आदेशाला जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रशासनाने केराची टोपली दाखविला आहे. अनुदानित, विनाअनुदानित, माध्यमिक, जिल्हा परिषदेच्या तसेच इंग्लिश मीडिअमच्या अनेक शाळा आहेत. बदलापूर येथील दोन नामांकित शाळेत मुलीवर अत्याचाराच्या घटना घडल्यानंतर शासनाने सर्व शाळेत मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा आदेश दिला होता. मात्र प्रशासनाच्या आदेशाला जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रशासनाने केराची टोपली दाखविली आहे. याचे कारण मात्र अद्यापही समजले नाही. मग शाळेत अत्याचाराच्या घटना पुन्हा घडल्यावर प्रशासन जागे होणार का असा प्रश्न पालकांमधून विचारला जात आहे. गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार करडे यांच्याकडून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.



## स्काऊट-गाईड जिल्हा मेळावामध्ये महाराष्ट्र विद्यालयाचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा कब बुलबुल, स्काऊट गाईड जिल्हा मेळावा श्रीपूर, ता. माळशिरस येथील चंद्रशेखर विद्यालय या ठिकाणी दि. २६ ते २९ डिसेंबर या कालावधीमध्ये संपन्न झाला.या जिल्हा मेळावामध्ये महाराष्ट्र विद्यालयातील स्काऊट आणि गाईड या पथकाने दैदीत्यामान कामगिरी करत वैयक्तिक प्रकारात तीन व सांघिक प्रकारात तीन असे सहा पारितोषिक पटकावले.

यामध्ये पोस्टर स्पर्धामध्ये संस्कार योगेश उपळकर, वेशभूषा स्पर्धात समर्थ हनुमंत सातनाक व मृदुला गणेश गुरव यांनी यश संपादन केले तर सांघिक स्पर्धेमध्ये संचलन स्पर्धा,तंबू सजावट, शेकोटी कार्यक्रम यामध्ये यश संपादन केले. यामध्ये जिल्ह्यातील २५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सर्वांमधून महाराष्ट्र विद्यालयातील स्काऊट गाईड यांनी उत्कृष्ट कामगिरी करत पारितोषिक पटकावले. सदर पारितोषिक प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, स्वाती हवेली उपशिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग, स्काऊट जिल्हा संघटक श्रीधर मोरे व गाईड जिल्हा संघटक अनुसया शिरसाठ तसेच जिल्हास्तरातील मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या मेळावांतर्गत विद्यार्थ्यांनी शेकोटी कार्यक्रम, शोभायात्रा सेल्फी पॉईंट, बिनभांडेचा स्वयंपाक, प्रश्नमंजुषा, धावणे स्पर्धा, चित्रकला अशा विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन प्रत्येक विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र मिळवले आहे. या स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना स्काऊट मास्टर योगेश उपळकर व अतुल नलगे तर गाईड कॅप्टन जी.आर. लोमटे व व्ही.पी. चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल सर्व स्काऊट, गाईड व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय.यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी.पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. मिराताई यादव, एस.बी. शेळवणे, सर्व कार्यकारिणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, विद्यालयाच्या प्राचार्या के. डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी. सपताळे, पर्यवेक्षक एस. सी. महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे यांनी अभिनंदन केले.

## आपटे उपलप प्रशालेचे पर्यवेक्षक अनिल अभंगराव सेवानिवृत्त




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ जानेवारी-**

येथील आपटे उपलप प्रशालेचे पर्यवेक्षक अनिल अभंगराव यांनी ३१ वर्षे सेवाकाळात प्रशालेत अनेक विद्यार्थ्यांना चांगले, सुसंस्कारीत घडविण्याचे आदर्श काम केल्याचे गौरव उदगार माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी काढले.

आपटे उपलप प्रशालेचे पर्यवेक्षक अनिल अभंगराव यांच्या सेवापूर्तीचा गौरव समारंभ कार्यक्रम माजी आमदार व पांडुरंग परिवाराचे प्रमुख प्रशांत परिचारक यांचे हस्ते व प्रशालेचे माजी मुख्याध्यापक हरिभाऊ डांगे यांचे अध्यक्षतेखाली योगभवन,पंढरपूर येथे सपंन्न झाला. त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी सेवानिवृत्त पर्यवेक्षक अनिल अभंगराव व त्यांच्या पत्नी रेखा अनिल अभंगराव यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या शिक्षक कार्यकाळात आपटे उपलप प्रशालेतील सामन्य कुटूंबातील विद्यार्थांना त्यांनी उत्तम ज्ञानदान करून त्यांनी अनेक होतकरू विद्यार्थी घडविले आहेत. अभंगराव परिवार एक आदर्श संस्कारी परिवार आहे. त्यांचे व परिचारक परिवाराचे तीन पिढ्यांचे जिव्हाळ्याचे, स्नेहाचे सबंध आहेत. अभंगराव सरांनी त्यांचे आजोबा (कै.) गणपतराव अभंगराव, (कै.) माजी आमदार सुधाकरपंत परिचारक, (कै.) भाऊसो अभंगराव यांच्या प्रेरणेतून माझ्याबरोबर अनेक वर्षापासून सामाजिक, राजकीय क्षेत्रात परिचारक घराण्याशी एकनिष्ठ राहुन सहकारी म्हणून मोलाचे कार्य करीत आहेत परंतु हे कार्य त्यांनी आपला शिक्षकीपेशेचे प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडीत पूर्ण केले आहे. त्यामुळेच त्यांना संघटनेत, नगरपालीकेत व बँकेत कार्य करण्याची संधी मिळाली. या पुढील काळात त्यांना उत्तम, आनंदी, निरोगी आरोग्य लाभो व पुढील काळात देखील त्यांच्याकडून अशीच लोकसेवा घडो अशा शुभेच्छा यावेळी परिचारक यांनी दिल्या. कार्यक्रमात अर्बन बँकेचे संचालक हरिष ताठे, नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी सुनिल वाळूजकर,आपटे उपलप प्रशालेचे शिक्षक सागर थिटे, माजी मुख्याधापक वि.दा.सवाई, जयंत हरिदास, कोळी समाजाचे ज्येष्ठ प्रकाशबुवा अभंगराव, सुरेश शिंदे आदीनी विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट, अर्बन बँकेचे चेअरमन सतिश मुळे, आपटे उपलप संस्थेचे पदाधिकारी विलास भातलवंडे, गर्गे, रामचंद्र गंगाखेडकर, रोहिणी कोर्टीकर तसेच पंढरपूर नगर परिषदेचे नगरसेवक इब्राहीम बोहरी, गुरुदास अभ्यंकर, अमोल डोके, माजी उपनगराध्यक्षा श्वेता डोंबे, सुप्रिया डांगे,संजय निंबाळकर, विशाल मलपे, निलेश डोंबे,निलेश आंबरे, धर्मराज घोडके आदींसह अर्बन बँकेचे मुख्यव्यवस्थापक उमेश विरधे,सर्व संचालक व आपटे उपलप प्रशालेचे सर्व शिक्षक विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार व सुसंचालन माजी नगरसेवक धनंजय मिसाळ यांनी केले.

# करकंबमधील शिवकालीन तलाव दुरुस्तीसाठी सामुहिक प्रयत्नांची गरज

**● परिसरातील गावांसह शेतकऱ्यांची पाणी टंचाई होणार दूर**

**तभा वृत्तसेवा । राजेंद्र करपे**
**करकंब, दि. १ जानेवारी-**

करकंब (ता. पंढरपूर) येथे शिवकालीन ४५ एकराचा पाझरतलाव आहे.काळाच्या ओघात त्याकडे दुर्लक्ष झाल्याने त्या तलावामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ व झाडांची वाढ झाल्याने पाणी साठवण्याची क्षमता कमी झाली. या तलावाची दुरुस्ती करून त्यामध्ये पाणी साठवण्यास सुरुवात केली तर करकंब गावाच्या पूर्व भागातील जाधववाडी, बार्डी, बैरागवाडी, टेंभी परिसर, भंडारेवस्ती या भागातील शेतकरी वर्गास या तळ्यातील पाण्याच्या साठवणीमुळे फायदाच होणार आहे. या तळ्यामध्ये पाणी साठवल्यास परिसरातील विहिरी व बोअरवेल यांच्या पाणी पातळीमध्ये वाढ होण्यास मदत होणार आहे.




तत्कालीन खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर,भाजपा जिल्हा अध्यक्ष श्रीकांत देशमुख यांनी सदर शिवकालीन पाझर तलावास भेट देऊन पाहणी केली होती.यावेळी तात्कालीन खा.रणजीतसिंह नाईक निंबाळकर यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी लवकरच या संदर्भात बैठक आयोजित करून पाझर तलावातील पाणी साठवण करण्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी केंद्राच्या माध्यमातून दुरुस्ती व राज्य शासनाची एनओसी यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले होते. महाराष्ट्राचे तात्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असताना त्यांची करकंब येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भेट घेतली.या शिवकालीन तलावामध्ये पाणी सोडण्याबाबत सविस्तर चर्चा केली.या संदर्भात माजी कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांची त्यांनी भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी तलवात पाणी आणण्यासंदर्भात सर्वे करण्यास सांगितले.लोकवर्गणीतून खाजगी सर्वेक्षण करून घेतले.त्यामुळे करकंब येथील शिवकालीन तलावात पाणी येईल अशी अशा सर्व गावकऱ्यांना लागली. एल सेक्शन सर्वे करून लागलीच शासन दरबारी सर्व ठिकाणी त्याचे अहवाल सादर केले.तलावामध्ये पाणी येण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता होती त्या पूर्ण करण्यात आल्या.केलेला सर्वे तात्कालीन जलसंपदामंत्री जयंत पाटील हे करकंब येथे दौऱ्यावर आले असताना त्यांना सादर केला होता. **(क्रमशः)**

**अनेक वर्षांपासून प्रयत्न**

गेल्या कित्येक वर्षांपासून या शिवकालीन तलावाची दुरुस्ती व पाणी साठवण्यासाठी शेतकरी, विविध राजकीय, पक्ष, संघटना, पदाधिकारी, नागरीक, कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सांगोल्यात सुवर्णपदक विजेती सोमती कोडगचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ जानेवारी-**

आलेगाव (ता. सांगोला) येथील रहिवाशी व सध्या नोकरीनिमित्त पुण्यात स्थायिक असलेले राम चंद्र कोडग यांची कन्या सोमती कोडग हिने ६८ व्या नॅशनल स्कूल गेम २०२४ मध्ये (१७ वर्षाखालील) स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले.

लखनऊ (उत्तर प्रदेश) येथे या स्पर्धा पार पडल्या. त्यामध्ये सोमती कोडग आणि महाराष्ट्र टीम ने ४-४०० मीटर रिले रनिंगमध्ये सुवर्णपदक जिंकले. त्याबद्दल सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानकडून सत्कार करण्यात आला. यावेळी सोमतीचे वडील रामचंद्र कोडग, आई विद्या कोडग, आपुलकीचे अध्यक्ष राजेंद्र यादव, अजयकुमार बाबर, प्रा. डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, अरविंद डोंबे, अरविंद केदार, राहुल टकले, दीपक शिनगारे, चंद्रशेखर कवडे, दादा खडतरे, सोमनाथ माळी, महादेव दिवटे, सोमनाथ सपाटे, संतोष भोसले, अच्युत फुले, रविंद्र कदम, नीलकंठ लिंगे, अतुल वाघमोडे उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### करमाळ्यात देशमुख हत्येच्या निषेधार्थ धरणे आंदोलन

**करमाळा, दि.१ जानेवारी-**

मस्साजोग जिल्हा बीड येथील लोकनियुक्त सरपंच संतोष देशमुख यांची दिवसाढवळ्या निर्घुण हत्या, तसेच परभणी येथील आंबेडकरी आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा न्यायालयीन कोठडीत संशयास्पद मृत्यू, या आपल्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये झालेल्या घटनांबद्दल निषेध म्हणून करमाळा तहसील कार्यालयासमोर प्रा. रामदास झोळ व दशरथ कांबळे यांच्या नेतृत्वाखाली भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. पीडितांच्या कुटुंबीयांना लवकरात लवकर न्याय मिळावा. ही त्यांची प्रमुख मागणी होती. नायब तहसीलदार लोकरे यांच्या आश्वासनांनंतर धरणे आंदोलन संपुष्टात करण्यात आले. त्यावेळी हरिभाऊ मंगवडे, गणेश मंगवडे, संजय जगताप, ज्ञानेश्वर शिंदे, दीपक शिंदे, अमोल घुमरे, हनुमंत मांढरे-पाटील, रमेश अण्णा कांबळे, औदुंबर भोसले-पाटील, दीपक शिंदे, अमोल घुमरे, सुदर्शन शेळके, तात्यासाहेब सरडे, भीमराव ननवरे, सुहास काळे, औदुंबरराजे राजे भोसले, प्रवीण सुरवसे, भाऊसाहेब शिंदे, कांतीलाल शिंदे, श्रीराम भोरे, ऋषिकेश कांबळे, भाऊसाहेब पवार उपस्थित होते.



### हालहळ्ळीच्या उपसरपंचपदी रेखा बिराजदार बिनविरोध

**सोलापूर, दि. १ जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील हालहळ्ळी (अ) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी रेखा गजानन बिराजदार यांची बिनविरोध निवड झाली. उपसरपंच शंकर जमादार यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदावर त्यांची निवड करण्यात आली. पिठासन अधिकारी आय. एम. पठाण आणि ग्रामविकास अधिकारी अभय नेलुरे होते. यावेळी सरपंच प्रकाश बिराजदार, सदस्य निलप्पा बिराजदार, माजी उपसरपंच शंकर जमादार, विजयालक्ष्मी सुतार, प्रगतशील शेतकरी गंगाधर वळदड्डे, हणमंत पाटील, हणमंत बिराजदार, यशवंत बिराजदार, मल्लय्या स्वामी, चंद्रकांत बिराजदार, राजकुमार धनशेट्टी, गजाननबाबा बिराजदार, मडोळप्पा बिराजदार, बसवराज गोविंदे, हणमंत कळमंडे, महादेव बिराजदार, अशोक कोळी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### रंजना देवकर यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

**माळीनगर, दि. १ जानेवारी-**



माळीनगर येथील दि.सासवड माळी एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळा क्रमांक १ मधील शिक्षिका रंजना राजीव देवकर यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित आले. मुंबई येथील अष्टपैलू संस्कृती कला अकादमी संस्थेकडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सौ. देवकर यांना देण्यात आला.
रंजना राजीव देवकर या सहशिक्षिका म्हणून प्राथमिक शाळेत २९ वर्ष नोकरी करीत असून या काळात राष्ट्र उभारणीचे कार्य करत असताना अनेक गरजू विद्यार्थ्यांना मदत केली. स्पर्धा परीक्षा घेणे, समूह गीत गायन स्पर्धा, मुलांचे वाढदिवस साजरी करणे, तसेच अवांतर वाचन व परिसर भेट, सहली, नृत्य, भाषण स्पर्धा, कथाकथन, नाट्य, कविता असे अनेक उपक्रम शाळेत राबवल्याची दखल घेत त्यांना अष्टपैलू संस्कृती कला अकादमीने पुरस्कार देऊन गौरविले आहे.देवकर यांनी मासिक न्यायप्रभाच्या राज्यस्तरीय काव्य लेखन स्पर्धेत सर्वोत्कृष्ट काव्याचा विशेष पुरस्कार पटकावत प्रथम क्रमांक मिळवून साहित्य क्षेत्रातही आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला आहे. पुरस्कार मिळाले बद्दल सासवड माळी एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र गिरमे, सेक्रेटरी अजय गिरमे, उपाध्यक्ष नितीन इनामके, खजिनदार ज्योती लांडगे, संचालक पृथ्वीराज भोंगळे आदींनी देवकर यांचे अभिनंदन केले.

### बचेरीतील वाचनालयात वाचन संकल्प उपक्रम सुरू

**पिलीव, दि. १ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेला वाचन संकल्प महाराष्ट्र शासनाचा हा उपक्रम बचेरी येथील मच्छींद्र मामा खुर्द वाचनालय येथे सुरु करण्यात आला आहे. २९ डिसेंबर ते १६ जानेवारी या कालावधीत हा उपक्रम राबविणयात येणार आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने २९ डिसेंबरपासून वाचनालय परिसर, ग्रंथालय, पुस्तके, कपाट यांची स्वच्छता करणयात आली. याठिकाणी ३० व ३१ डिसेंबर रोजी ग्रंथ प्रर्दशन भरविले होते.याचा लाभ वाचकांनी तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.याचबरोबर वाचन कौशल्य, कार्यशाळा, लेखक,विद्यार्थी वाचन संवाद, पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या विदयार्थीना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. हा उपक्रम यशस्वी करणयासाठी प्रा सदाशिव शिंदे, अस्मिता शिंदे, सागर शिंदे इतर पदाधिकारी, कर्मचारी, वाचक सदरची मोहीम यशस्वी करणयासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर फळा-फुलांनी सजले

### नवीन वर्षाचे स्वागत; ३०० किलो फुले, ५ हजार नग संत्र्यांचा वापर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ जानेवारी-**

नववर्षानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विविध फुलांची व संत्रा फळाची आकर्षक सजावट केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

श्री विठ्ठल गाभारा, श्री रुक्मिणी गाभारा व श्री संत नामदेव पायरी येथे झेंडू, शेवंती, तोरण, कामिनी इत्यादी ३०० किलो फुलांचा व ५ हजार नग संत्रा फळांचा वापर करून मनमोहक व आकर्षक सजावट करण्यात आली आहे. सदरची सजावट विठ्ठल भक्त प्रदीपसिंह ठाकुर पुणे यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली असून, सजावटीचे काम श्री साई डेकोरेटर्स शिंदे ब्रदर्स पंढरपूर यांनी केले आहे. त्यासाठी सुमारे २० कामगारांनी परिश्रम घेतले. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सेवा करण्याबाबत आळंदी (जि.पुणे) येथील प्रदिपसिंह ठाकुर परिवाराने मंदिर समितीकडे सन २०२१ मध्ये इच्छा व्यक्त केली होती. तेव्हापासून म्हणजे मागील पाच वर्षापासून नववर्षी निमित्त मंदिरात सेवाभावी तत्त्वावर मोफत फुलांची आरास करून देत आहे.

नववर्षा निमित्त भाविकांची दर्शन रांगेत व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. मंदिर समिती मार्फत पुरेशा प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असून, भाविकांची गर्दी विचारात घेऊन भाविकांचे भराभर दर्शन होण्याच्या दृष्टीने ऑनलाइन दर्शन पास बुकिंग व्यवस्था बंद ठेवण्यात आली आहे. तसेच व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, पुजेची संख्या कमी करणे व इतर अनुषंगिक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.





#### पहाटेपासूनच गर्दी

पहाटेपासूनच भाविकांनी दर्शन रांगेत गर्दी केली असून, विठ्ठल रुक्मिणीमातेच्या नाम गजराने परिसर दुमदुमून गेला आहे. या सजावटीमुळे विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मुर्तीसह गाभारा पाहून देखील भाविक अधिक समाधानी होत आहे.

#### विठ्ठलाचे सावळे रुप खुलले

महत्त्वाचे सण उत्सव, खास दिवस या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात फुलांची आरास, सजावट केली जाते. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सजले असून, मंदिरात आकर्षक फळा-फुलांची आकर्षक सजावट करण्यात आल्याने, विठुरायाचे सावळे रूप अधिकच खुलून दिसत आहे. नवीन वर्षाची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनाने व्हावी यासाठी हजारो भाविक श्री क्षेत्र पंढरपूरात दाखल झालेले आहेत.

## अक्कलकोट नगरी स्वामी नामस्मरणाने दुमदुमली

### नवीन वर्षारंभी स्वामीचरणी भाविक दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ जानेवारी-**

सरते वर्षाला निरोप व नवीन वर्षारंभी स्वामी चरणी नतमस्तक होऊन स्वामी नामाचा महिमा गाण्यासाठी अक्कलकोट श्री तीर्थक्षेत्री मोठ्या प्रमाणात भाविक मंगळवारी एकवटले. मंगळवार सकाळी चालू झालेला स्वामी नामस्मरण सोहळा बुधवारी पहाटे पाचपर्यंत चालू होता.

राज्यातील मुंबई उपनगरे, दादर, ठाणे, कोल्हापूर, पुणे, बोरीवली, नाशिक, अहमदनगर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आदीसह महाराष्ट्रातील सर्वच भागातून आलेल्या स्वामी भक्तांनी दिवस-रात्र नॉनस्टॉप गटागटाने स्वामी चरणी भजन, नामस्मरण, भारूड, गौळण, विविध धार्मिक पात्र वेषभूषेसह सादर केले. स्वामी नामाचा महिमा गात तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरी भक्ती रसात न्हाहली. उठा उठा हो गावकऱ्यानो चमत्कार झाला! स्वामी समर्थ आला हो अक्कलकोट वाला। वासुदेव आलाने साऱ्या भाविकांची मने जिंकली. अक्कलकोट स्वामीची पालखी निघाली! स्वामी समर्थ नामाचा घोष करा स्वामी नेतील ही नाव पैलतिरी! स्वामी समर्थ। स्वामी समर्थ अशी अनेक भक्ती गीते सादर केली.



#### पोलिसांचा बंदोबस्त

वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी आलेल्या भाविकांना सेवा सादर करण्यास संधी दिली. भाविकांची निवास, भोजनाची सोय केली. पोनि राजेंद्र टाकणे व सहकारी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## हिंदूंच्या परिपूर्ण रक्षणासाठी ओम काली हिंदवी स्वराज्य सेनेची स्थापना



### कालीचरण महाराजांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ जानेवारी-**

हिंदूंच्या परिपूर्णरक्षणासाठी ओम काली हिंदवी स्वराज्य सेना या नावाची संस्था स्थापना करण्यात आली असून धर्म रक्षणासाठी, हिंदुत्वासाठी श्री जगदंबेची जास्तीत जास्त सेवा करा. तसेच कुलदेवीची आराधना करण्यामुळे तुम्ही ज्ञानी, बलवान व्हाल असे प्रतिपादन कालीचरण महाराज यांनी सांगोल्यात केले. ते सांगोला येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी सांगोला येथील उद्योगपती बाळासाहेब एरंडे माजी नगराध्यक्ष मारुतीआबा बनकर उपस्थित होते.

पुढे बोलताना कालीचरण महाराज म्हणाले, सदर संस्थेच्या भारताच्या उपाध्यक्षपदी बाळासाहेब एरंडे यांची निवड करण्यात आली असून बाळासाहेब एरंडे यांनी सदर संस्थेला कालिका मातेचे मंदिर उभा करण्यासाठी सहा एकर जमीन दान केली आहे.

या ठिकाणी नऊ फूट कालिका परमेश्वराची मूर्ती, गणपती बाप्पा, कार्तिक स्वामी, भगवान शंकर, ब्रह्मा- विष्णू, महालक्ष्मी, महासरस्वती, आयाप्पा स्वामी, काळभैरव, हनुमान, नवग्रह यांची स्थापना करण्यात येत असून दिव्य असे शक्तिपीठ निर्माण होत आहे.

#### हिंदू धर्मध्वजाखाली एकत्र या

ज्याप्रमाणे सांगोल्यात बाळासाहेब एरंडे यांनी सुरुवात केली, त्याप्रमाणे सर्व क्षेत्रातील हिंदूंनी सर्व प्रकारचा जातीवाद, वर्णवाद, भाषावाद, प्रांतवाद तोडून छत्रपती शिवाजी महाराज, गुरु गोविंदसिंह महाराज, राणा प्रताप महाराज, पुण्यश्लोक माता अहिल्यादेवी यांच्या हिंदू धर्म ध्वजाखाली एकत्र व्हा, अखंड हिंदू राष्ट्राच्या स्थापनेसाठी व धर्म संस्कृतीच्या संरक्षणासाठी कार्य करा असे आवाहन कालीचरण महाराज यांनी यावेळी केले.

## पवार कुटुंब एकत्र येऊ दे, सर्ववाद संपू दे

### आशाताई पवार यांचे विठ्ठलाला साकडे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ जानेवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी नववर्षानिमित्त विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. यानंतर त्यांनी विठ्ठलास पवार कुटुंब एकत्र येऊ दे, आपसातील सर्ववाद संपू दे असे साकडे विठ्ठलाला घातले असल्याची माहिती पत्रकारांशी बोलताना दिली.

नवीन वर्षानिमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपुरात हजारो भाविक दाखल झाले आहेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी देखील पंढरपुरात येऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले. यानंतर पत्रकारांशी बोलताना त्या म्हणाल्या पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. यामुळे विठ्ठलाच्या दर्शनाने नवीन वर्षाची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आज विठ्ठलाचे दर्शन घेतले असून पवार कुटुंबातील सर्व वाद संपू दे पवार कुटुंब एकत्र येऊ दे असे साकडे विठ्ठलाच घातले असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान नवीन वर्षानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिरास आकर्षक फळ व फुलांची सजावट करण्यात आली आहे.



दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपुरात दाखल झाले असल्यामुळे हरिनामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली आहे. नववर्षाच्या सुरुवातीस पंढरपुरात मोठी आर्थिक उलाढाल झाली आहे. यामुळे व्यापाऱ्यातून समाधान व्यक्त होत आहे.

## ग्राहकांनी एसटी प्रवासालाच प्राधान्य द्यावे : नागेश जोशी

### सांगोला आगारात ग्राहक दिन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ जानेवारी-**

आजच्या काळात ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी एसटी महामंडळ प्रामुख्याने ग्राहकांना दैवत मानून त्यांना चांगली सेवा देत असल्याने ग्राहकांनी अन्य वाहनांनी प्रवास न करता प्राधान्याने लाल परीच्या एसटी प्रवासाला प्रथम प्राधान्य द्यावे असे आवाहन ग्राहक पंचायतीचे मार्गदर्शक सामाजिक कार्यकर्ते नागेश जोशी यांनी केले.

सांगोला एसटी आगाराच्यावतीने आयोजित केलेल्या ग्राहक दिन कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले. अध्यक्षस्थानी सांगोला आगारप्रमुख विकास पोफळे होते. नागेश जोशी यांनी ग्राहक पंधरवडानिमित्त ग्राहकांसाठी सांगोला एसटी आगार यांच्या वतीने आयोजित केलेल्या ग्राहक मेळाव्याचे महत्त्व सांगून शासनाने ग्राहकांसाठी ग्राहक हक्क संरक्षण कायदा केल्याने त्याची अंमलबजावणी देखील होत असल्याने ग्राहकांना आपल्या हक्काची जाणीव होऊ लागली आहे. ग्राहकांवर होणाऱ्या अन्यायास न्याय मिळवून देण्यासाठी ग्राहक पंचायतीची चळवळ सुरू आहे. या चळवळीचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे विचार मांडताना सांगोला आगाराने देखील प्रवासी ग्राहकांचा कल एसटीच्या प्रवासाकडे वाढल्याने व ग्राहकांसाठी एसटी महामंडळाकडून अनेक सवलती विशेषतः महिला, विद्यार्थी, अपंग, पत्रकार, जेष्ठ नागरिक यांच्यासाठी सवलतीच्या दरात प्रवास ठेवल्याने त्याचाही फायदा मोठ्या प्रमाणात ग्राहकांना होत आहे. सांगोला एसटी आगारातील गाड्या पूर्वीपेक्षा सध्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने ग्राहकांची गैरसोय होत आहे. याकडे लक्ष देऊन शासनाने सांगोला डेपोसाठी किमान दहा ते पंधरा नवीन गाड्या द्याव्यात, पंढरपूर व सोलापूर येथे आरक्षण केंद्र सुरू आहे, त्याप्रमाणे सांगोल्यासह सर्व आगारांच्या ठिकाणी ग्राहकांसाठी आरक्षण केंद्र सुरू करावे अशी मागणी नागेश जोशी यांनी करून ग्राहकांना चांगल्या प्रकारे सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न सांगोला आगाराकडून होत आहे त्याबद्दल अधिकाऱ्यांना धन्यवाद देऊन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. आभार स्थानक प्रमुख पंकज तोंडे यांनी केले. कार्यक्रमास ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष श्रीकांत देशपांडे, सचिव सचिन कुंभार, एसटी कार्यशाळा प्रमुख पृथ्वीराज पारसे, आशिष सूर्यवंशी, सर्फराज तांबोळी उपस्थित होते.



#### बसगाड्यांची संख्या कमी

सांगोला आगारात बसची संख्या कमी होत असल्याने ग्राहकांची अडचण होत आहे. पुढील काळात बसची संख्या वाढविण्यासाठी मागणी करणार आहे. तसेच ग्राहकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करू. तसेच आरक्षण केंद्र सुरू करणेकामी वरिष्ठांकडे पाठपुरावा केला जाईल असे अध्यक्षीय भाषणात आगार प्रमुख विकास पोफळे यांनी सांगून ग्राहक पंचायतीच्या कार्याचे कौतुक केले.


CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ,दि.१ जानेवारी -**
आस्था भावार्थ रामायण आयोजित श्री. क्षेत्र पंढरपूर येथे पुत्रदा एकादशीचे औचित्य साधून लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्याचे आयोजन शुक्रवार दि.१० जानेवारी रोजी करण्यात आलेले असुन सर्व रामभक्त वाचक व सुचकानी उपस्थित राहून निरपेक्ष भावनेने सेवा करावी असे आवाहन आस्था भावार्थ रामायण ग्रुपच्या वतीने प्रसिध्दी पत्रकान्वये करण्यात आलेले आहे.



कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे शुक्रवार दि.१० जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता प्रभू रामचंद्र यांच्या प्रतिमेचे पूजन करून ग्रंथ वाचन व निरुपनास प्रारंभ होईल श्री संत एकनाथ महाराज लिखित भावार्थ रामायणातील युद्धकांडातील अध्याय ४३ ते ४९ असे एकूण ७ अध्याय ११३५ ओव्याचे वाचन व निरूपण रात्रभर होईल. शनिवार दि.११ जानेवारी रोजी पहाटे ५ वाजता श्री लक्ष्मण सावध झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता करून महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

तरी आस्था भावार्थ रामायण ग्रुप मधील व सर्व श्रीराम प्रेमींनी शुक्रवार दि.१० जानेवारी रोजी पंढरपूर येथील वै. महंत रामदास बाबा शेगाव (दु) रोड पाण्याच्या टाकी जवळ, हरे राम हरे कृष्ण (इस्कॉन) पूर्व दिशेला या ठिकाणी उपस्थित राहून राम कथेचा लाभ घ्यावा असे आवाहन आस्था भावार्थ रामायण ग्रुप च्या वतीने करण्यात येत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### डॉ. आयुब शेख यांचा सत्कार

**तेर, दि.१ जानेवारी -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथील ग्रामीण रूग्णालयातील नेत्र चिकित्सा अधिकारी डॉ. आयुब शेख २९ वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. यानिमित्ताने मंगळवारी सत्कार करण्यात आला. यावेळी तेर ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. गुरूबस शेटे, डॉ. विजय विश्वकर्मा, डॉ. आदित्य हरकर, कार्यालयीन अधिक्षक अमोल आग्रे, सुभाष कुलकर्णी, अब्दुल बाशीद काझी, राजाभाऊ आंधळे, सहाय्यक अधिक्षक दत्तात्रय वाघे, अधिपरिचारिका संगिता चव्हाण, निता काळोंखे, सविता गुळवे, संतोष सरवदे, शरद कांबळे आदीची उपस्थित होते.



### डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली

**परंडा, दि.१ जानेवारी -**
परंडा येथील संत मीरा पब्लिक स्कूल, डॉ. वेदप्रकाश विद्यामंदिर, सावित्रीबाई फुले औद्योगिक प्रशिक्षण संस्था, एस.पी. ज्युनिअर कॉलेज व कृषी तंत्र विद्यालय डोंजा या सर्व शाळांच्या, कॉलेजच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान व जगप्रसिद्ध अर्थतज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सर्व शाळांचे प्राचार्य संतोष भांडवलकर, दिनेश मेटकरी, प्रसाद दनाने, अशोक राठोड व बालाजी गोरे तसेच सर्व शाळांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य संतोष भांडवलकर यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्याचा आढावा थोडक्यात सांगितला.

### धाराशिव तालुका चिटणीसपदी पेठे

**तेर, दि.१ जानेवारी -**
भारतीय जनता पार्टीचे धाराशिव तालुका चिटणीस पदी तेर येथील रजनीकांत साहेबराव पेठे यांची निवड करण्यात आली आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील माजी आ. सुजितसिंह ठाकूर व जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष बांधणी व संघटना विस्तार करण्यासाठी निवड करण्यात आली असून त्याच्या निवडीचे पत्र भाजपचे धाराशिव तालुकाध्यक्ष राजाभाऊ पाटील यांनी दिली आहे.





### 'रूपामाता'च्या दिनदर्शिकाचे प्रकाशन

**जळकोट, दि.१ जानेवारी -**
रूपामाता उद्योग समूहाच्या जळकोट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रूपामाता अर्बन को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी शाखेत सन २०२५ च्या दिनदर्शिकाचे प्रकाशन करण्यात आले. रूपमाता अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात सन २०२४ या नवीन वर्षाच्या दिनदर्शिकाचे प्रकाशन करून वितरण करण्यात आले. यावेळी मेघराज किलजे, नितिन माळी, प्रकाश कदम, इरन्ना स्वन्ने, तात्याराव मोरडे, अशोक बारदाने, पाटील, जळकोट शाखा व्यवस्थापक गौतम वाघमारे, शितल गिरमाजी, लिपिक महेश कटोरे, अभिजीत कोळगे आदि कर्मचारी, ठेवीदार, खातेदार, ग्रामस्थ उपस्थित होते.



### शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**जळकोट, दि.१ जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील माजी सैनिक स्व. संभाजी भीमराव लोखंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त भीम नगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. जळकोट येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुला-मुलींना वह्या, पेन आणि खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे शिक्षक माळी, विशाल लोखंडे, सूरज लोखंडे, परमेश्वर लोखंडे, मल्लिनाथ माने, अशितोष भालेराव, अक्षय लोखंडे, ज्योती संभाजी लोखंडे, रुक्मिणी भिमराव लोखंडे व भीमनगरमधील बांधव उपस्थित होते.

### टाकाऊ वस्तुपासून टिकाऊ वस्तू उपक्रम

**कळंब, दि.१ जानेवारी -**
शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात इयत्ता पाचवी (ब) विद्यार्थ्यांनी कार्यानुभव विषयांतर्गत टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू बनवणे या उपक्रमांतर्गत मार्गदर्शक शिक्षक ज्ञानेश्वर तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन वर्षाचे भेटकार्ड तयार केले आहे. या भेटकार्डावर पर्यावरण जनजागृती, लोकसंख्या, आपत्ती व्यवस्थापन, मतदान जनजागृती, अशा प्रकारचे संदेश देण्यात आले आहेत.

# न.प. चप्पल स्टॅन्डच्या बाजूस अनधिकृतपणे थाटले ओटीचे दुकाने

**तुळजाभवानी मंदिरासमोरील अतिक्रमणाकडे मंदिर संस्थान, न.प., पोलीस प्रशासनाचे जाणिवपुर्वक दुर्लक्ष...**



- तुळजाभवानी मंदिर महाद्वार समोर मोठ्या प्रमाणात अतिक्रम!
- शासकीय जागेवर खाजगी लोकांकडून भाडे वसुली !
- शासनाला लाखो रुपयांचा गंडा!
- संपूर्ण अतिक्रमण काढून पूर्ण भाग कायम मोकळा ठेवावा!
- आत्मदहनाचा पुजाऱ्यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ जानेवारी -**
प्रशासनास अनेक वेळा कित्येक निवेदने व उपोषण करून देखील श्री तुळजाभवानी मंदिर राजे शहाजी महाद्वार समोरील अतिक्रमण हटवले नाही म्हणून आत्मदहनाचा इशारा देणार म्हणून जिल्हाधिकारी यांना मंदिर व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने यांच्या हस्ते पुजारी बांधवांनी निवेदन दिले.

निवेदनात असे म्हटले आहे की, श्री तुळजाभवानी मंदिरासमोर काही लोकांनी अनधिकृतपणे भाविकांना येण्या जाण्याच्या रस्त्यावरच नगरपरिषद चप्पल स्टॅन्डच्या बाजूस अनधिकृतपणे ओटीचे दुकाने थाटले आहेत. या दुकानांमुळे महाद्वार परिसरात अनेक छोटे-मोठे अनाधिकृत फेरीवाले यांचा वावर वाढला आहे. गर्दी पडत आहे.

यामुळे गर्दी होऊन दुर्घटना घडू शकते व हे लोक दररोज भाविकांसोबत हुज्जत घालत, दमदाटी करीत असून मंदिर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करत आहेत.

यामुळेच श्री क्षेत्र तुळजापूरची बदनामी होत आहे. याआधी देखील मी आपल्या मार्फत प्रशासनास वारंवार नागरिकांच्या स्वाक्षऱ्या सहित तक्रारी, निवेदने दिले होते व लाक्षणिक उपोषण देखील केले होते.

परंतु तुळजापूर नगर परिषद मुख्याधिकारी यांनी कुठल्याही प्रकारची कारवाई या अनधिकृत दुकाने थाटलेल्या लोकांवर केलेली नाही. तुळजाभवानी मंदिर हे नुसते मंदिर नसून आपल्या अध्यक्षतेखालील अँटी चेंबर आहे, अशा ठिकाणी जर असे अनाधिकृत प्रकार घडत असतील तर संपूर्ण महाराष्ट्रभर याची बदनामी होऊ शकते. तरी श्री तुळजाभवानी मंदिर राजे शहाजी महाद्वार समोरील संपूर्ण अतिक्रमण काढून पूर्ण भाग कायम मोकळा ठेवावा व त्या ठिकाणी पोलीस व नगरपरिषद कर्मचाऱ्यांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यात यावी होणारी बदनामी व दुर्घटना टाळावी, अन्यथा येणाऱ्या काळात आत्मदहनाचा इशारा सदरील निवेदनातून दिला आहे.

सदरील निवेदन देताना पुजारी विजय भोसले, अजय इंगळे, नंदू गंगणे, राहुल भांजी वैभव घोडके, अक्षय करडे यांच्यासह पुजारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## परंडा-करमाळा रस्त्याचे काम संथ गतीने; वाहतुकीची कोंडी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ जानेवारी -**
गाव खेड्यांचा विकास झाला तर शहरांचा विकास होतो ही आपल्याकडे एक म्हण आहे विकासासाठी रस्त्याची कामेही दर्जेदार होणे गरजेचे आहे. मात्र शहरांना जोडणारे रस्ते व्यवस्थित नसले तरी याचा सर्व परिणाम शहरातील दळणवळणावर व विकासावर होत असतो. रस्ते व्यवस्थित दर्जेदार नसले की बाजारपेठेत आपला माल विक्रीसाठी वेळेवर नेण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागते.

ग्रामीण भागातून शहरी भागात शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्याच्या शिक्षणावर ही खराब रस्त्यामुळे शाळेत लवकर पोहोचू शकत नसल्याने शिक्षणावर ही मोठा परिणाम होतो. परंडा शहरातील करमाळा परंडा हा रस्ता पालखी मार्ग आहे सध्या राज्यात अनेक नवनवीन रस्ते तयार करून केंद्र सरकारने व राज्य सरकारने कोट्यावधी रुपयांचा खर्च करून रस्त्यांचे मोठे जाळे विणली आहेत. सध्या परंडा शहरात करमाळा मार्गावरून बार्शीकडे जाणाऱ्या राज्य मार्गावर रस्त्याची कॉंक्रिटीकरणाचे काम सध्या सुरू असून ते काम खूपच संथ गतीने सुरू आहे.. बांधकाम विभाग व ठेकेदार यांच्या संगनमताने अत्यंत संत गतीने हे काम होत आहे ते पण इस्टिमेट प्रमाणे न होता निकृष्ट दर्जाचे होत आहे. या मार्गावर उसाचे ट्रॅक्टर जड वाहनाची वाहतूक शाळेला जाणाऱ्य मुलांची वर्दळ तसेच सोनारीकडे भैरवनाथाच्या दर्शनाला जाणाऱ्या भाविकांच्या वाहनाची मोठ्या प्रमाणात गर्दी असते.

त्यामुळे रस्त्यावर अपघात होऊ शकतो असा प्रकार घडल्यास याला कोण जबाबदार राहणार ठेकेदार की बांधकाम विभाग याचे त्यांनी नागरिकांना उत्तर द्यावे अशी चर्चा सध्या होत आहे.

## एनव्हीपी शुगरच्या प्रथम गळीत हंगामातील चौथ्या पंधरवाड्याचे ऊसबिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

**चेअरमन नानासाहेब पाटील यांची माहिती...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ जानेवारी -**
एन.व्हि.पी. शुगर प्रा.लि. जागजी कारखान्याचे प्रथम गळीत हंगाम २०२४-२५ मधील चौथा पंधरवाडा १६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीतील गाळपास आलेल्या ऊसाचे बिल जमा करण्यात आले आहे.

एन.व्हि.पी. शुगर कारखान्याच्या वतीने शेतकऱ्यांचे हित समोर ठेवून ऊसाचे बिल पंधरवाडा संपल्यावर संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर बील जमा करणारा धाराशिव जिल्ह्यातील पहिला कारखाना आहे. तसेच यापुढेही शेतकऱ्यांचे ऊस बिल प्रत्येक पंधरवडा संपल्यावर जमा करण्यात येणार आहे.

तरी ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे. अशा शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आपले आपले बिल घ्यावे. तसेच ज्यांनी खाते दिले नाही अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. धाराशिव बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे, असे आवाहन चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.

## युवकांनी स्व-उद्योग उभारून आत्मनिर्भर व्हावे : मेघ पाटील

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग,दि.१ जानेवारी -**
युवकांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्वताःचा उद्योग, व्यवसाय सुरु करून आत्मनिर्भर व्हावे, असे आवाहन तेरणा युथ फाऊंडेशनचे मेघ पाटील यांनी नळदुर्ग येथे तेरणा युथ फाऊंडेशनच्या वतीने आयोजित केलेल्या युवक मेळाव्यात बोलतांना केले.



नळदुर्ग येथील अंबाबाई मंदिर सभागृहात तेरणा युथ फाऊंडेशनच्या वतीने युवकांसाठी युवक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रारंभी मेघ पाटील यांच्या हस्ते अंबाबाईची पुजा व महाआरती करण्यात आली. यानंतर युवक मेळाव्याचे उदघाटन मेघ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलतांना मेघ पाटील यांनी म्हटले की, आ. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तेरणा युथ फाऊंडेशन युवकांना आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. युवकांना विविध योजनेअंतर्गत रोजगार मिळवुन देण्यासाठी तेरणा युथ फाऊंडेशन काम करीत आहे. तुळजापुर तालुक्यातील युवकांच्या समस्या सोडविण्याबरोबरच युवकांनी उद्योग, व्यवसाय क्षेत्राकडे वळावे यासाठी तेरणा युथ फाऊंडेशन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असल्याचेही पाटील यांनी म्हटले आहे. जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करणार आहेत. त्या विद्यार्थ्यांना सर्व सामुग्री पुरविण्याचे काम तेरणा युथ फाऊंडेशन करणार असल्याचेही मेघ पाटील यांनी म्हटले आहे.

## श्री तुळजाभवानी मंदिर पहाटे एक वाजता उघडणार

**मंदिर संस्थानचा निर्णय...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ जानेवारी -**
सध्या नाताळ सुट्ट्यामुळे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी वाढत असल्यामुळे श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानने भक्तांच्या दृष्टीने जो वर्षभरासाठी मंगळवार, शुक्रवार, रविवार आणि पौर्णिमे दिवशी मंदिर पहाटे १ रात्रीला भाविकांच्या दर्शनासाठी उघडण्यात येणार आहे, तसे परिपत्रक मंदिर संस्थांनी जाहीर केले आहे.



म्हणजेच परिपत्रक नुसार जो निर्णय घेतला आहे.

त्याबद्दल पुजारी मंडळ मार्फत मंदिर संस्थानचे आभार पुजारी मंडळाचे उपाध्यक्ष विपिन शिंदे यांनी मानले आहेत.

अनेक वेळा पुजारी बांधव यांच्याकडून मागणी होत आहे. होती.

त्याची मागणी पूर्ण झाली आहे, भक्तांना दर्शन सुलभ होण्यासाठी घेतलेला निर्णय बाबत पुजारी भाविकांमध्ये आनंद होत आहे.

यामुळे भाविकांच्या गर्दीवर नियंत्रण मिळविता येणार असून भाविकांना सुलभ दर्शन घेणे सोईचे होणार

## भाजीपाला घेऊन जाणारा पिकअप पलटी

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१ जानेवारी -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा गावाजवळ दि.१ जानेवारी रोजी दुपारी ३ च्या सुमारास सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गावर भाजीपाला वाहतूक करणाऱ्या पिकपचा अपघात झाला.



भूमकडून धाराशिवच्या दिशेने भाजीपाला घेऊन जात असताना तेरखेडा गावा नजदीक हा अपघात झाला. अचानक चालकाचे नियंत्रण सुटल्याने पिकप रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाले. या अपघातात चालक किरकोळ जखमी झाला आहे. स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत अपघातात अडकलेल्या चालकाला बाहेर काढले.

अपघात शेतकऱ्याच्या भाजीपाल्याचे मोठे नुकसान झाले आहे.

# येणेगुरच्या दोघा तरुणावर नळवाडीच्या टोळीकडून चाकू हल्ला

**गुन्हेगाराना पोलिस अभय देत असल्याने येणेगुर ग्रामस्थांचा मुरुम ठाण्यात ठिय्या... सीसीटीव्ही कॅमेरात घटनेचा थरार कैद... पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्हे...**



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१ जानेवारी -**
उमरगा तालुक्यातील नळवाडी येथील चार तरुणांच्या टोळीने येणेगुर येथील दोन युवकांना छुल्लक कारणावरू चाकू, हंटर तसेच काठ्याने मारहाण केल्याची घटना मंगळवारी ३१ रोजी रात्री ९ च्या सुमारास घडली आहे. या मारहाणीत एकाचे कान फाटले असून एकजण गंभीर जखमी आहे सदरील घटनेचा थरार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात देकगील कैद झाला आहे.

याबाबत माहिती अशी की, येणेगूर येथील चंद्रशेखर कल्याणी माळी (वय ४६) तसेच विकास मधुकर गाडेकर हे दोघेजण येणेगुर येथील रस्त्याच्या कडेला दुचाकी घेऊन थांबले होते.

यादरम्यान नळवाडी येथील दोघेजण अतिवेगाने दुचाकी चालवत असल्याचे दिसून आल्याने त्यामुळे चंद्रशेखर माळी यांनी त्यांना हटकले व गाडी सावकाश चालवण्यास सांगितले असे म्हणल्यावरून दुचाकीवरील दोघेजण गाडी थांबवून चंद्रशेखर माळी व गाडेकर यांना बुक्याने मारहाण करून चाकूने वार केले.

यावेळी नळवाडी येथील अन्य दोघेजण दुचाकीवरून येऊन माळी तसेच विकास गाडेकर यांना हंटर, चाकू अश्या हत्याराने वार करत राहिले या मारहाणीत विकास गाडेकर यांच्या डोक्याला चाकू लागल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांच्या डोक्यावर ३२ टाके पडले आहेत तर चंद्रशेखर माळी यांचे कान कापले गेले आहे.

ही घटना येणेगूर ग्रामपंचायत कार्यालयाने रस्त्यावर लावलेल्या सिसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे गंभीर जखमी असलेल्या गाडेकर यांच्यावर उमरगा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे.

रात्री उशिरा या घटनेची मुरूम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाली असून याप्रकरणी शंकर विलास कवठे, सुहास विलास कवठे, विठ्ठल महादेव दासमे, अंकुश फुलचंद जमादार (चौघे रा. नळवाडी ता. उमरगा) यांना मारहाणीत वापरलेल्या हत्यारासह वरील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेण्यात आले आहे.

### गुन्हेगारांना पोलिस विभागाकडून अभय?

दरम्यान आरोपीना वाचवण्यासाठी मुरूमचे पोलिस अधिकारी प्रयत्न करत असल्याने संतापलेल्या येणेगुरच्या ग्रामस्थांनी बुधवारी सकाळी मुरूम ठाण्यात येऊन रोष व्यक्त केले. सदरील घटनेत आरोपीविरुद्ध पोलिसांकडून योग्य कलम लावण्यात आल्या नाहीत. गुन्हेगारांना पोलीस अधिकारी पाठीशी घालत आहेत. नळवाडी येथील गुन्हेगारांची टोळी येणेगुर गावात नेहमी दहशत माजवत आहेत. याबद्दल तक्रारी असतानाही मुरूम पोलीस अधिकारी संदीप दहिफळे दुर्लक्ष करून गुन्हेगाराना एकप्रकारे अभय देत आहेत, असा आरोप ग्रामस्थांनी केले. दरम्यान आरोपीविरुद्ध कडक कारवाई व्हावी यासाठी येणेगुर बाजारपेठ बंद करण्याचा इशारा देखील ग्रामस्थांकडुन देण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



यंदा रब्बी पिके जोमात असून गव्हाचे क्षेत्र चांगलेच वाढले आहे. पिकांना वाढीसाठी गेवराई तालुक्यातील सिरसदेवी शिवारात कोळपणी करतांना शेतकरी (छाया–कृष्णा शिंदे)

## पोलीस अधीक्षकांची मध्यस्थीतीने महिलांचे जलसमाधी आंदोलन मागे



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मोठी खळबळ निर्माण झाली. बीडमध्ये सर्वपक्षीय आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करण्यात आली. आता मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक होताना दिसत आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार तीन आरोपींना तात्काळ अटक करा. हेच नाहीतर संतोष देशमुख हत्याप्रकरणी वाल्मिक कराडला हत्येप्रकरणात आरोपी का नाही केले, असा प्रश्न पोलीस अधीक्षकांना ग्रामस्थांनी विचारला.

गावकऱ्यांनी परिसरातील पाझर तलावात जलसमाधी आंदोलन सुरू केले. यानंतर तीन महिलांनी तब्येत खराब झाली. जल आंदोलन ठिकाणी पोलिस अधीक्षक पोहोचले. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली आणि पोलिस अक्षीक्षकांच्या मध्यस्थीनंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले. या आंदोलनामध्ये पुरुषांसह महिलाही मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. हे आंदोलन दोन तास सुरू होते. तरूण आणि महिला देखील या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.दोन तास सुरू असलेल्या आंदोलनाला पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी भेट दिल्यानंतर गावकऱ्यांनी हे आंदोलन मागे घेतले. यावेळी कॉवत यांना महिलांनी जाब विचारत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती. गंभीर आरोप वाल्मिक कराडवर गेले जात आहेत. आज सीआयडीकडून वाल्मिक कराडची चौकशी केली जाणार आहे. या चौकशीचा काल पहिला दिवस होता. काल रात्री उशीरा केज न्यायालयात वाल्मिक कराडला हजर करण्या आले. १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. आता याप्रकरणी काही मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील अजून तीन आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध पोलिसांकडून घेतला जातोय. याप्रकरणी मोठे खुलासे पुढील काही दिवसांमध्ये होऊ शकतात.

# रेल्वे,राष्ट्रीय महामार्गाबाबत खा.सोनवणेंनी घेतली चार तास बैठक

### रेल्वे भुसंपादनाचे विषय तातडीने मार्गी लावा, राष्ट्रीय महामार्गाच्या कामांचा दर्जा राखा; खा.सोनवणेंचे अधिकाऱ्यांना आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

३० डिसेंबर रोजी विघनवाडी– नवगण राजुरीपर्यंत जलदगती रेल्वेची चाचणी घेतल्यानंतर दि.३१ डिसेंबर रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी सलग चार तास रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्गाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात मॅरेथॉन बैठक घेतली. यावेळी रेल्वे भुसंपादणाचे विषय तातडीने मार्गी लावा, राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा दर्जा राखा असे आदेशही अधिकाऱ्यांना दिले. दरम्यान, २६ जानेवारीपर्यंत बीडला रेल्वे येईल, यासाठी प्रयत्न करा, अशा सुचनाही खा.सोनवणे यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १०.३० वाजता रेल्वे विभागाच्या बैठकीला सुरूवात झाली. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, रेल्वे विभागाचे अधिकारी लोळगे, उपजिल्हाधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी घाटनांदुर ता.अंबाजोगाई या ठिकाणी मंत्रीमहोदयांच्या आदेशानुसार अतिजलदगती गाड्यांना थांबा देण्यासाठी कार्यवाही करा, दि.२६ जानेवारी २०२५ पासून बीड–अहमदनगर रेल्वे नियमित सुरु करणे बाबत प्रयत्न करा, अहमदनगर–बीड–परळी रेल्वे मार्गाकरिता रायमोह व धनगरवाडी येथील संपादीत झालेल्या जमिनीचा मावेजा मिळणे करीता मा. उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांना सुचित करा, काकडहिरा या गावातील रेल्वेच्या कामामुळे शेतात जाण्याचा रस्ता बंद झाला आहे, तो रस्ता दुरुस्त करण्यात यावा. काकडवाडी (पिंपळा) ता.आष्टी येथील पुलाचे काम तातडीने करावे असे आदेश देण्यात आले, पिठ्ठी–धामनगांव–टाकळीकाजी या रस्त्यास राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यासाठी प्रस्ताव पाठवा, राक्षसभुवन फाटा–उमापुर–शेषगाव या रस्त्यास महामार्गाचा दर्जा देणे बाबत प्रस्ताव पाठवा,

कळंब पुलाजवळचे काम तात्काळ सुरु करावे, महामार्ग क्र. ५४८ या रस्त्यावर नेकनुर या ठिकाणी स्पिड ब्रेकर बसविण्याकरिता संबंधितास आदेशित करण्यात यावे,अंबाजोगाई–केज–नेकनुर–पाटोदा या गावांना बायपास रस्ता मंजुर करण्याकरिता प्रस्ताव सादर करा , पैठण–पंढरपुर महामार्गावरील डोंगरकिन्ही ते अनपटवाडी ता.पाटोदा रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. सदरील रस्ता दुरुस्त करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यासह गुत्तेदारास समज द्यावी अशा सुचनाही खा.बजरंग सोनवणे यांनी यावेळी दिल्या.

### खा.सोनवणे म्हणाले, चर्चा नको, काम दाखवा

जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग विभागातील आढावा घेत असताना, अर्धवट कामे, कामाचा ढासळलेला दर्जा, या बाबत खा.बजरंग सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरून सर्वसामान्य लोकांच्या जीवाशी खेळू नका, असे म्हणत रखडलेले कामे तात्काळ सुरू करण्या संदर्भात सूचना केल्या. रेल्वे विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभागाचा संदर्भात आलेल्या सर्व तक्रारी मार्गी लावा, असेही ते म्हणाले.

### रखडलेली कामे सुरू करा

जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाची बहूतेक कामे रखडली आहेत. यात पैठण–पंढरपूर, खरवंडी–नवगण राजूरी, अहमदपूर–चुंबळी, परतूर–बार्शी, लातूर–पाथरी, अहमदनगर– बीड–परळी, गंगाखेड, खरवंडी कासार– पाडळसिंगी या रस्त्यांचा समावेश आहे. सदरील कामे येत्या काळात तत्काळ पुर्ण करा, जिल्ह्यातील नागरिकांच्या जिवीताशी खेळू नका, अशा सुचनाही खा.सोनवणे यांनी दिल्या. केज शहरातुन जाणाऱ्या दोन्ही राष्ट्रीय महामार्गाच्या थांबलेल्या कामांची गती वाढवून ते कामे गतीने कामे पुर्ण करणार आणि धारुर घाटातील रुंदीकरणाचे तसेच उर्वरित काम वेगाने पूर्ण करुन घेणार, असेही ते म्हणाले.

## महिला शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

खामगाव ता गेवराई येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र येथे शुक्रवारी दिनांक ०३ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, कृषि विज्ञान केंद्र खामगाव, कृषी विभाग, आत्मा बीड, महिला आर्थिक विकास महामंडळ , उमेद, इफको व धान फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय भव्य महिला शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनामकृवी परभणीचे मा. कुलगुरू प्रा (डॉ) इन्द्र मणि हे असणार आहेत, तर सदर मेळाव्याचे उद्घाटन अविनाश पाठक (भा.प्र.से) जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आदित्य जीवने (भाप्रसे) मुख्य कार्यकारी अधिकारी जि प बीड , डॉ. आदिती सारडा कार्यकारी परिषद सदस्य, वनामकृवी परभणी, डॉ. गिरधारी वाघमारे, संचालक विस्तार शिक्षण वनामकृवी, परभणी आणि डॉ. तुकाराम मोटे विभागीय कृषि सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर हे असणार आहेत तर संगीतादेवी पाटील, प्रकल्प संचालक, डॉ.जया बंगाळे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य व श सयप्पा गरंडे कृषि विकास अधिकारी बीड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सौ सिताबाई मोहिते जिजामाता कृषि भूषण पुरस्कार प्राप्त, रामनगर, जालना व डॉ नीता गायकवाड, केंद्र समन्वयक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ, अ.भा. स. सं.प्र कृषीरत महिला , वनामकृवी परभणीचे मार्गदर्शन होणार आहे. तरी या मेळाव्याचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन विस्तार शिक्षण संचालनालय,कृषि विभाग, आत्मा, महिला आर्थीक विकास महामंडळ, उमेद, धान फौंडेशन, इफको, बीड व केव्हीके खामगाव यांनी केले आहे.

## असामान्य कर्तृत्वाची धनी, होती अहिल्या नावाची राणी–डॉ. अशोकराव बांगर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलात अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रि शताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते तथा शिवशंभो अध्ययन गटप्रमुख डॉ. अशोकराव बांगर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना सांगितले की, ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. न्यायप्रिय, मंदिर जीर्णोद्धारक, उत्तम शासक असलेल्या अहिल्यादेवींचे जीवन आपल्यासाठी आदर्शभुत आहे. त्यांच्या शासन काळाचा जाज्वल्य इतिहास सर्वांसमोर आलाच पाहिजे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनपटाचा अभ्यास आवर्जून करण्याचे आवाहन डॉ. बांगर यांनी केले. असामान्य कर्तृत्वाची धनी, होती अहिल्या नावाची राणी. असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे स्मरण करण्यासाठी त्यांच्यावरील साहित्यांचा अभ्यास करावा असे प्रतिपादन केले.

यावेळी संकुलातर्फे अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट उलगडणारी चित्र प्रदर्शनी



भरविण्यात आली होती.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी डॉ. पुरुषोत्तम कुलकर्णी, व्याख्याते डॉ. अशोकराव बांगर, शालेय समिती अध्यक्ष द्वय मा. प्रमोदराव कुलकर्णी, मा. सतीशराव कुलकर्णी मुख्याध्यापक द्वय श्री विठ्ठल काळे, सौ. बालिकाताई देशमुख, उपमुख्याध्यापक श्री माधव जोशी, त्रि शताब्दी महोत्सव प्रमुख प्रा. विठ्ठल वाघीरकर, विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शशिकांत पसालकर यांनी केले तर स्वागत परिचय प्रा. दीपक देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन सौ. आरती कुलकर्णी व आभार प्रदर्शन सौ. सुजाता चिंचपूरकर तर कल्याणमंत्र प्रा. संतोष जोशी यांनी केले.

## ग्रंथाशी मैत्री करा आयुष्य बदलेल–दीपक मुळे

### सावरकर महाविद्यालयात वाचन कौशल्य कार्यशाळा




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

वाचन आपला श्वास झाला पाहिजे. वाचनाने विचार गतिमान होतात, जीवनात आनंद मिळतो. आपण ग्रंथाशी मैत्री केल्यास आपला आपले जीवन बदलेल असे प्रतिपादन दीपक मुळे यांनी केले. येथील सावरकर महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा निमित्त आयोजित वाचन कौशल्य कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे हे होते. पुढे बोलताना दीपक मुळे म्हणाले की आपली वाचनाची सवय कमी झाली आहे. ग्रंथ सारखा मित्र नाही ग्रंथाशी मैत्री केल्याने आपले जीवन आनंदी होईल. वाचनाचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो. प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ग्रंथांचे वाचन करावे. वाचनाने व्यक्तिमत्व विकसित होते. मान्यवरांचे स्वागत उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, डॉ. देविदास नागरगोजे यांनी केले. मान्यवरांचा परिचय डॉ. सोपान सुरवसे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले. सूत्रसंचालन ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर यांनी केले तर आभार प्राध्यापक संजय काळे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती

## नववर्षाच्या पूर्वसंध्येला बीड तालुक्यातील ए पी एल शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबाच्या खात्यात दोन कोटी एक्केचाळीस रुपये जमा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जानेवारी**

बीड तालुक्यात प्राधान्य कुटुंब योजनेचे ६३४८७ , अंत्योदय योजनेचे ७३८४ , ए पी एल योजनेचे शेतकरी १९०६६ , एन पी एच योजनेचे ९२७७ , शुभ्र शिधापत्रिका धारक १५६८ असे एकुण १००७८२ शिधापत्रिकाधारक आहेत . तालुक्यात एकुण ३४८ स्वस्त धान्य दुकाने आहेत . १९०६६ ए पी एल शेतकऱ्यापैकी ५८०० शिधापत्रिकाधारक यांना एपीएल डीबीटी द्वारे रोख रक्कम प्राप्त झाली असून त्यापैकी ३७८२ लाभार्थी यांच्या खात्यात प्रतिव्यक्ती १७० प्रमाणे २ कोटी ४१ लाख ४१०६१ रुपये महिला कुटुंब प्रमुख यांच्या खात्यात नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला जमा झाले आहेत . उर्वरित २०१८ शेतकरी लाभार्थी यांनी बँक खाते केवायसी न केल्याने खात्यात रक्कम जमा झालेली नाही . तरी त्यांनी बँक खाती केवायसी करून घ्यावीत , असे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर यांनी



केले आहे . तसेच ज्या एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी यांनी तहसील कार्यालयात फार्म भरुन दिलेला नाही त्या शिधापत्रिका धारक यांनी आपल्या कुटुंबातील महिलेचे बँक पासबुक , आधार कार्ड व कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीचा सातबारा तहसील कार्यालयात जमा करावा असे आवाहन अव्वल कारकून श्री संतोष मुळीक यांनी केले आहे .

तहसीलदार चंद्रकांत शेळके हे ऑगस्ट महिन्यात बीड तहसीलदार पदावर रुजू झाले . तेव्हापासून त्यांनी तालुक्यातील मंडळाच्या ठिकाणी बैठका घेण्याचा धडाका सुरू केला . या बैठकांना स्वस्त धान्य दुकानदार यांनाही बोलावण्यात आले . या बैठकीस सर्वसामान्य शेतकरी , नागरिक , स्वस्त धान्य दुकानदार समोरासमोर असल्याने त्यांच्या समस्यांचे समाधान तात्काळ होण्यास सुरुवात झाली . स्वस्त धान्य दुकानासंदर्भात काही तक्रारी असल्यास त्यांचे निराकरण करण्यासाठी पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर हे सुद्धा वेळोवेळी भेटी देतात .

सध्या पी एच एच व अंत्योदय शिधापत्रिका धारक यांची ईकेवायसी स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत करणे सुरू असून लहान मुले व वयस्कर कुटुंब प्रमुख यांची केवायसी सध्या होणार नसून कुटुंबातील इतर व्यक्ती यांनी केवायसी साठी स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे जाऊन शक्कल करावी . ही सुविधा निशुल्क उपलब्ध आहे . त्यासाठी कोणताही खर्च आकारण्यात येत नाही . याबद्दल सर्व बीड तालुक्यातील एकूण ३४८ स्वस्त धान्य दुकानदार यांना सूचित करण्यात आले आहे . तसेच जर स्वस्त धान्य दुकानदार हे ईकेवायसी करण्याकरिता शुल्क मागत असतील तर त्याबाबत तहसील कार्यालय बीड येथे तक्रार नोंदवावी असे आवाहन तहसीलदार शेळके यांनी केले आहे.तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी चऱ्हाटा येथील मंडळ स्तरीय बैठकीनंतर स्वस्त धान्य दुकानास भेट देऊन लाभार्थी यांना वेळेवर धान्य देण्यात येऊन ई केवायसी लवकरात लवकर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

तहसील कार्यालया अंतर्गत पुरवठा विभागातील निरीक्षण अधिकारी , पुरवठा निरीक्षक यांना धान्य वाटप संदर्भात स्वस्त धान्य दुकान अचानक भेट देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत असे यावेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले.

## चि.डॉ. किशोर बाबूराव दळवे हे पीएचडी देऊन सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१ जानेवारी**

केज तालुक्यातील चिंचोली( माळी) येथील भूमिपुत्र डॉ. किशोर दळवे यांनी एमजीएम युनिव्हर्सिटी संभाजीनगर या विद्यापीठाची मानाची पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

डॉ. किशोर दळवे यांनी बीबीए, एमबीए (एच आर) एमबीए (आर ए बी एम) ; एमसीए या पदव्या विविध विद्यापीठाकडून प्राप्त केल्या असून असून नुकतेच त्यांना मॅनेजमेंट सायन्स या विषयात पीएचडी ही पदवी दि.३१–१२–२०२४ रोजी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सपकाळ सर यांच्या हस्ते देऊन विद्यापीठाच्या विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

त्यांना डॉ.प्रवीण शास्त्री सरांचे मार्गदर्शन लाभले असून या पदवीदान कार्यक्रमास ईतर मार्गदर्शक व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ.किशोर दळवे त्यांचा सत्कार करण्यात आला त्यांच्या या यशामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत. त्यांचे अभिनंदन मुख्यतः पुढील पदाधिकारी, नातेवाईक व सहकारी यांनी केले आहे यात, दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, सौ.आशा दळवे; डॉ. दया पाटिल ;डॉ. कोरडे सर ;श्री बाबुराव दळवे;श्री दगडू भाऊ दळवे; श्री महादेव दळवे;श्री अशोक मिरगे श्री.वसंतभाऊ कातळे,श्री शिवाजीराव जाधव,श्री अशोक तारळकर तसेच त्यांचा मित्रपरिवार व सहकारी, पत्रकार बांधव यांचा समावेश आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## स्मार्टकार्ड नोंदणीसाठी १० जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने महिलांसाठी मोफत प्रवास बस योजना लातूर शहर बसमध्ये सध्या चालू आहे. शहर बस प्रवास करणा-या महिलांचा प्रवास सुखकर व्हावा व त्यांना अधिकाअधिक सेवा सुविधा देण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानरपालिका,मार्फत महिला शहर बस पास (स्मार्ट कार्ड) योजना चालू करण्यात आली आहे.

सदर योजनेचा लाभ घेणेसाठी महानगरपालिका हद्दीमधील राहणा-या महिलांनी आपल्या आधार कार्डची झेरॉक्स प्रत व सोबत फॉर्म भरून दिनांक १९.१२.२०२४ पासून संविधान चौक, पाण्याची टाकी, बार्शी रोड लातूर, जुना रेणापूर नाका शहर बस थांबा लातूर, गंजगोलाई शहर बस स्टॉप, क्रिडा संकुल शहर बसस्टॉप, लातूर शहर महानगरपालिका कार्यालय,लातूर, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक, लातूर, क्षेत्रीय कार्यालय सी, डाल्डा फॅक्ट्री लातूर येथे रजिस्ट्रेशन चालू आहे तसेच लातूर शहर हद्दीत राहणा-या महिलांनी आपल्या आधारकार्डची झेरॉक्स प्रत देऊन फॉर्म भरून आपल्या स्मार्ट कार्ड साठी महिला प्रवाशानी नजीकच्या केंद्रात जावून स्मार्ट कार्ड साठी नोंदणी करावी असे पण कळविण्यात आले होते व त्याची मुदत ३१.१२.२०२४ पर्यंत ठेवण्यात आली होती.

महिलांची स्मार्ट कार्डची मागणी लक्षात घेता ती मुदत व कार्ड वाटपाची मुदत १०.०१.२०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे व तोपर्यंत सदर ची योजना पुर्वीप्रमाणेच चालू राहील याची शहर बस मधुन प्रवास करणा-या लातूर शहर महानगरपालिका, लातूर हद्दीतील राहणा-या सर्व महिलांनी नोंद घ्यावी असे लातूर शहर महानगर पालिकेच्यावतीने कळविण्यात आले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## वीरशैव तेली समाजाच्या नुतन दिनदर्शिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
येथील वीरशैव तेली समाजातर्फे काढलेल्या नुतन दिनदर्शिकेचे प्रकाशन कार्यक्रम नुकताच भालचंद्र ब्लड बँक येथील हॉलमध्ये पार पडला. या दिनदर्शिका प्रकाशन सोहळा कार्यक्रमासाठी श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवालयाचे विश्वस्त अशोक भोसले, श्री जय जगदंबा नवरात्र महोत्सव मंडळ सचिव बसवंत आप्पा भरडे, वीरशैव समाजाचे सचिव उमाकांतआप्पा कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.
यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला वीरशैव समाजाचे अध्यक्ष किशोर भुजबळ यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात बोलताना म्हणाले की, यावर्षी महिलांतर्फे नवरात्रीमध्ये देवीला कुंकूमार्चम पूजा व महाशिवरात्री काळात श्री सिद्धेश्वरास ५०० महिलाच्यावतीने गंगेचा अभिषेक करण्यात आला होता. तेली समाज बांधवांनी समाजाभिमुख काम असेच चालू ठेवावे. सर्वांनी एकत्र येऊन काम करुया, अशी साद घातली. तसेच समाजातर्फे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाविषयी पाहुण्यांना माहिती देण्यात आली. श्री सिद्धेश्वर मंदिर विश्वस्त अशोक भोसले यांनी गंगेच्या पाण्याचे अभिषेक साठी आपण जेवढ्या महिला घेऊन याल त्या सर्वांची व्यवस्था मंदिर समितीतर्फे करण्यात येईल असे सांगितले.

## कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनः अनेकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय परिपत्रक यानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांच्या हस्ते लाल फीत कापून ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व वाचकांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर पुस्तकाची माहिती व प्रेरणा मिळावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.याप्रसंगी प्राचार्या रूपाली गिरी, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.माधुरी पोलकर , प्रा.शबनम शेख ,ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे,एस एन गायकवाड , शेबिर शेख आदी शिक्षक शिक्षकेतर व विद्यार्थी मोठ्या प्रमाणामध्ये उपस्थित होते .

## हरंगुळ-पुणे रेल्वे गाडीला मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
हरंगुळ-पुणे (गाडी क्र.०१४८७) या रेल्वेने केवळ लातूर तालुक्यातीलच नव्हे तर येडशी, धाराशिव आणि बार्शी तालुक्यातीलही प्रवाशांची सोय झाली आहे. मात्र, ३० डिसेंबरपर्यंतच या रेल्वे गाडीची मुदत होती. त्यामुळे भविष्यात या रेल्वे गाडीचे काय होणार असा प्रश्न उपस्थित होत असतानाच प्रवाशांचा प्रतिसाद व लोकप्रतिनिधींची मागणी यामुळे या रेल्वे गाडीला आणखीन मुदतवाढ मिळणार असल्याचे मध्य रेल्वेने स्पष्ट केले आहे.

लातूर तालुक्यातील हरंगुळहून पुण्याकडे जाण्यासाठी हरंगुळ येथील रेल्वे स्थानकातून दररोज दुपारी ३ वाजता गाडी क्र. ०१४८७ ही रेल्वे आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यासह धाराशिव जिल्ह्यातील येडशी, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, कुर्डुवाडी येथील प्रवाशांचीही सोय होत आहे. मध्य रेल्वेने ठरवून दिल्याप्रमाणे ३० डिसेंबर २०२४ पर्यंत ही रेल्वेसेवा सुरू राहणार होती. त्यानंतर सदर रेल्वे गाडी सुरू राहणार की नाही याबाबत मध्य रेल्वे निर्णय घेणार होते. मात्र, या रेल्वे गाडीला प्रवाशांचा मिळालेला प्रतिसाद, प्रवाशांची सोय आणि लोकप्रतिनिधींचा रेटा यामुळे ही रेल्वे सेवा कायम राहणार आहे. तर पुणे-हरंगुळ (गाडी क्र. ०१४८८) ही पुण्याहून येणारी रेल्वेही कायम राहणार आहे.

## लता लखादिवे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**



शहरातील महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षिका सौ. लता लखादिवे यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिव शरीरावर सिद्धेश्वर मंदीरच्या शेजारी असलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## लातुरमध्ये अभाविपचे आजपासून अधिवेशन

### मराठवाडा व खानदेशातील १ हजार विद्यार्थी प्रतिनिधी घेणार सहभाग




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रदेशाचे ५९ वे प्रदेश अधिवेशन दिनांक ०२ ते ०४ जानेवारी दरम्यान लातूर येथे संपन्न होणार आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती अभाविपच्या प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

यावेळी स्वागत समिती अध्यक्ष प्रमोद मुंदडा, स्वागत समिती सचिव सुनिल देशपांडे ,महानगर अध्यक्ष प्रा.डॉ. प्रसाद कदम, महानगर मंत्री तेजुमई राऊत उपस्थित होते.

पत्रकारांशी संवाद साधताना वैभवी ढिवरे म्हणाल्या की, गुरुवारी सकाळी ११:४५ वाजता अधिवेशन उद्घाटन समारंभ संपन्न होणार आहे. यावेळी अभाविपचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री एस. बालकृष्णजी उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर सायंकाळी ०५:२५ वाजता होणाऱ्या भाषण सत्रात अभाविपचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री देवदत्त जोशी मार्गदर्शन करणार आहेत. खान्देश आणि मराठवाडा विद्यार्थी परिषद कार्य प्रभाव व योजना या विषयावर ते अधिवेशनाला उपस्थित प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत. अधिवेशनादरम्यान दि. ०३ जानेवारी, शुक्रवार रोजी दुपारी ०३:३० वाजता शहरातून शोभायात्रा काढली जाणार आहे ही यात्रा ओडिया राज चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक - अशोक हॉटेल - महात्मा गांधी चौक - हनुमान चौक - गोलाई या मार्गाने जाणार आहे. सायंकाळी ०४:४५ वाजता गोलाई येथे जाहीर सभेने शोभा यात्रेचा समारोप होणार आहे. प्रदेश मंत्री कु.वैभवी ढिवरे व छात्र प्रतिनिधी या सभेस संबोधित करणार आहेत.

दि. ०४ जानेवारी, शनिवार रोजी सकाळी ०९ वाजता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर शिक्षणतज्ञ प्रा. डॉ. अनिल राव हे मार्गदर्शन करणार आहेत.या अधिवेशनात शैक्षणिक सामाजिक तसेच उद्योजकता या विषयावर प्रस्ताव पारीत करण्यात येणार आहेत. तसेच अधिवेशनाच्या शेवटी येणाऱ्या वर्षभरात विद्यार्थी परिषदेची आगामी दिशा प्रदेश मंत्री मांडतील व समारोप प्रसंगी अभाविप च्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा प्रांत अध्यक्ष करतील. या चार दिवस चालणाऱ्या अधिवेशनात सर्व नागरिकांनी उत्साहपूर्वक येणाऱ्या सर्व प्रतिनिधींचे स्वागत करावे व अधिवेशनात सहभाग घ्यावा,असे आवाहन स्वागत समिती अध्यक्ष प्रमोद मुंदडा यांनी केले.

अभाविपच्या ५९ व्या प्रदेश अधिवेशनात होणाऱ्या विविध भाषण व चर्चा सत्रांमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन अभाविप देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा. डॉ. सचिन कंदले, प्रदेश मंत्री कु. वैभवी ढिवरे, स्वागत समिती अध्यक्ष प्रमोद मुंदडा, स्वागत समिती सचिव सुनिल देशपांडे, अभाविप लातूर महानगर अध्यक्ष प्रा. डॉ. प्रसाद कदम व महानगर मंत्री तेजूमई राऊत यांनी केले आहे.

## कबड्डी, खो-खो स्पर्धेत मांजरेश्वर विद्यालयाचे यश

### कबड्डी स्पर्धेमध्ये मुलींचा संघ ठरला अव्वल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
मांजरा चॅरिटेबल ट्रस्टअंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांसाठी दोनदिवसीय लोकनेते विलासराव देशमुख आंतरशालेय क्रीडा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत कबड्डी व खो-खोमध्ये विलासनगर येथील श्री मांजरेश्वर हनुमान विद्यालयाच्या मुला मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

कबड्डी स्पर्धेमध्ये मांजरेश्वर विद्यालयातील मुलींचा संघ सर्वप्रथम आला. तसेच विद्यार्थ्यांचा संघ कबड्डी व खो-खो अशा दोन्ही स्पर्धामध्ये सर्वप्रथम आला आहे. विजेत्या खेळाडूंचा संस्थेच्या वतीने प्रशासकीय अधिकारी डॉ. अजय पाटील यांच्या हस्ते सन्मानपत्र, ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला. तसेच शाळेत मुख्याध्यापक बी. एल. पवार यांच्या हस्ते मंगळवारी सत्कार करण्यात आला.

क्रीडाशिक्षक नवनाथ कदम, बी. के. यचवाड, ए.ए. पवार, बी.यु, शेंडगे, व्ही.ए. सरवदे, जी.यु, जाधव, एन.यु, कोपले, ए.जी. राजे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या स्पर्धेत यश मिळविलेले गुणवंत खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.




## ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
लातूर जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची बैठक जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. लातूर जिल्हातील पक्षाची बांधणी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या बाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

विधानसभा निवडणुकी नंतर प्रथमच पक्षाची जिल्हा बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीत नवीन जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी व सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक यांचा जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या बैठकीस लिंबन महाराज रेशमे महिला जिल्हा संघटक जयश्री उटगे, सौ. सुनीता चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, युवती प्रमुख अँड. श्रध्दा जवळगेकर, युवा सेना प्रमुख दिनेश जावळे, निलंगा तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ सगरे, संतोष सुर्यवंशी, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विलास लंगर, सहकार सेना जिल्हाध्यक्ष किशोर जाधव, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, देवणी तालुका प्रमुख मुकेश सुडे शिवाजी चव्हाण, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष बसवराज मंगरूळे अँड. रवी पिचारे, संजय उजळबे, रेखा पुजारी, दैवशाला सगर, सुनीता भोसले, सतीश शिवणे, सुनील नाईकवाडे, शंकर रांजनकर, रमेश माळी आदी उपस्थित होते.

## राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे लातूर दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे गुरुवार, २ जानेवारी २०२५ रोजी लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे गुरुवार २ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता लातूर येथील दिवाणजी मंगल कार्यालय येथे आगमन होईल. येथे सकाळी ११. ४५ वाजता आयोजित अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या राज्यस्तरीय परिषदेला ते उपस्थित राहतील. दुपारी २.१५ वाजता लातूर येथून छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील. असे प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आजपासून व्याख्यानमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
महात्मा बसवेश्वरांच्या आचार-विचारांचा वसा आणि वारसा पुढे चालवण्याच्या एका व्यापक विचारातून आणि शिक्षणामुळेच समाजाची सर्वांगीण प्रगती होते या सकारात्मक दृष्टिकोनातून धर्मवीर श्री. देशीकेंद्र महाराज यांनी जून १९७० मध्ये श्री.महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेद्वारा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाची स्थापना केली.

श्री. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात गेली ४५वर्ष अविरतपणे सुरू असणारी प्रतिष्ठित महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला यावर्षी दि. ०२, ०३, ०४ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये महाविद्यालयातील ग्रंथालयातील विद्यार्थी अभ्यासिकेत दररोज सायं. ५:०० वा. आय. क्यू. एसी. आणि महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला संयोजन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

या व्याख्यानमालेचा उद्घाटन समारंभ गुरुवार दि. ०२ जानेवारी २०२५ रोजी श्री. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांची उपस्थिती असणार आहे. तर संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर यांचीही उपस्थिती लाभणार आहे. अस्वस्थ वर्तमानाच्या हाका या विषयावर महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथील प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के हे पहिले पुष्प गुंफणार आहेत.

या व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प शुक्रवार दि. ०३ जानेवारी २०२५ रोजी सोलापूर येथील सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. भीमाशंकर बिराजदार हे महात्मा बसवेश्वर विद्रोही कवी, समाज सुधारक या विषयावर गुंफणार असून अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांची उपस्थिती राहणार आहे.

शनिवार दि. ०४जानेवारी २०२५ रोजी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प आणि समारोप श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे संचालक राजेश्वर बुके यांच्या अध्यक्षस्थानी संपन्न होणार असून प्रमुख वक्त्या म्हणून बीड येथील सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या मनीषा तोकले ह्या भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त भारतीय संविधान आणि आपण या विषयावर गुंफणार आहेत. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सहसचिव सुनील मिटकरी, संचालक गुरुलिंग धाराशिवे आणि बसवराज येरटे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



## काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतीचा तिसरा स्थापना दिवस उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
आपल्या काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतीची स्थापना मागील ३ वर्षापुर्वी म्हणजे ३१ डिसेंबर २०२१ रोजी झाली होती. ग्रामपंचायतीच्या तिसऱ्या यशस्वी वर्षपूर्ती तथा स्थापना दिनानिमित्त आज ग्रामपंचायत परिसरात ग्रामस्थांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सकाळी ९ वाजता काशिलिंगेश्वर मंदिरात आरती करण्यात आली व आनंद साजरा करण्यात आला, दुपारी ३:३० वाजता मातोश्री वृद्धाश्रम येथील आजी आजोबांना ग्रामस्थांच्या वतीने फळवाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यानंतर ५ वाजता डी- मार्ट रिंग रोडवरील कृष्णा नगर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी काशिलिंगेश्वर नगर ग्रामपंचायतीचे निर्माते, संस्थापक ड.किरण बडे, ड.प्रभाकर केदार, महादेव जमादार, परमेश्वर बोराडे, खाजापाशा बागवान, संभाजी पवार, ड.सतिष धायगुडे, युवराज बोडके, प्रा.हनुमंत मुंडे ,अड.योगेश बनसुडे, श्रीमंत भताने, विष्णू काका शिंदे, ॲड. आत्मलिंग गोरे, पांडुरंग जाधव, उदय भैय्या गोजमगुंडे, श्रीहरी दुवे, प्रताप गोरे, गिरी महाराज, आकाश जमादार, बाळासाहेब माने, बस्वराज खानापूरे, सुर्यकांत पांचाळ, संभाजी गडदे, सदानंद गर्जे महाराज, माणिक दोडतले, दामोदर लहाने, शौकत शेख, प्रविण मुरकुटे आदी उपस्थित होते.

## महिला सशक्तीकरणाकडे महत्त्वपूर्ण पाऊल : अदिती देशमुख




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
विलासराव देशमुख फाउंडेशनने लातूर तालुक्यातील बाभळगाव येथील महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. फाउंडेशनच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ ट्वेंटीवन ग्री लीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

ग्रामीण भागातील महीलांसाठी हाताला काम उपलब्ध नाही, हा रोजगाराचा प्रश्न सोडवून त्यांच्या हाताला काम देण्यासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनकडून महिलांना मोफत प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी विलासराव देशमुख फाउंडेशनच्या पुढाकाराने मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे.

यावेळी बोलतांना ट्वेंटीवन ग्री लीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख म्हणाल्या, ग्रामीण भागातील महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रामध्ये महिलांना शिलाईचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःचे व्यवसाय सुरू करण्यासाठी सक्षम बनवले जाणार आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांनी मोठया प्रमाणात आपला सहभाग नोंदविला. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## संपूर्ण निविदा प्रक्रियांची चौकशी करावी

### ॲड. सूरज साळुंके यांची पत्रकार परिषदेत मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ डिसेंबर-**
लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांच्या कार्यकाळातील लातूर शहर महानगरपालिकेतील विविध विभागांमार्फत राबविण्यात आलेल्या संपूर्ण निविदा प्रक्रियेची विशेष व तज्ज्ञ समिती मार्फत सखोल चौकशी करून सदर नियमबाह्य , बेकायदेशीर निविदा प्रक्रियांमध्ये सहभागी कंत्राटदार, आयुक्त यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी - कर्मचाऱ्यांविरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार ,लातूर ग्रामीणचे जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. सूरज बी. साळुंके यांनी लातुरात पत्रकारांशी बोलताना केली.

शहरातील भूमिगत गटार योजनेच्या २३० कोटी रुपयांच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामाची नियमबाह्यरित्या निविदा प्रक्रिया तात्काळ रद्द करण्यात यावी अशी मागणीही आपण राज्याच्या मुख्य सचिवांकडे केल्याचे त्यांनी सांगितले. लातूर शहरातील भूमिगत गटार योजनेच्या टप्पा-२ च्या कामासाठी केंद्र शासन व राज्य शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे. या कामाची निविदा दि. ११ ऑक्टोबर २२०२४ रोजी लातूर महानगरपालिकेने प्रसिद्ध केली. दि. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी या कामाच्या निविदा भरलेल्या निविदाधारकांचा तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला. हे काम करण्यासाठी अंकिता कन्सट्रक्शन, भुगण इनफ्राकोन प्रा. लि., दिनेशचंद्र आर. अग्रवाल इनफ्राकोन प्रा. लि., जयवरुडी इनफ्राकोन प्रा. लि. आणि कालथिया इंजिनियरिंग अँड कन्सट्रक्शन लि. या पाच कंत्राटदारांनी निविदा भरल्या. मात्र त्यातील अहमदाबादच्या कालथिया इंजिनियरिंग अँड कन्सट्रक्शन लि. या कंत्राटदाराने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली नसतानाही त्यांनाच हे काम मॅनेज करून देण्यासाठीचे अर्थिक व्यवहार झाले. त्यासाठी चंद्रपुरच्या त तायडे नामक व्यक्तीने पुढाकार घेतला. या



निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी झालेली कालथिया इंजिनियरिंग अँड कन्सट्रक्शन लि.ही कंत्राटदार कंपनी ही निविदा भरण्यास तांत्रिक व आर्थिक दृष्टीकोणातून अपात्र आहे . एवढेच नव्हे तर, त्यांनी महाराष्ट्रात व इतर राज्यातील विविध महापालिकेमधील केलेल्या कामाचा पूर्वानुभव हा अत्यंत खराब व सदोषपूर्ण आहे. संबंधित कंपनीने सादर केलेले बहुतांश कागदपत्र देखिल खोटे, चुकीचे व बनावट आहेत. या कंपनीने गुलबर्गा (कलबुर्गी) महानगरपालिकेचे जोडलेले वर्कडन (काम पूर्ण केल्याचे) प्रमाणपत्र ४० कोटीच्या कामाचे असताना या कंत्राटदाराने गुलबर्गा महानगरपालिकेच्या अभियंत्याच्या खोट्या स्वाक्षरी व शिक्क्याचे १४० कोटीचे प्रमाणपत्र जोडले असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सहकारमंत्री पाटील व आ. बनसोडे यांच्या नागरी सत्काराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१ जानेवारी -**

उदगीर-जळकोट विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या व सर्व समस्त नागरीकांच्या वतीने राज्याच्या सहकारमंत्री पदी निवड झाल्याबद्दल बाबासाहेब पाटील व उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघाचे माजी मंत्री आ. संजयजी बनसोडे, माजी मंत्री, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. रमेश कराड, आ. अभिमन्यू पवार, माजी आ. गोविंदराव केंद्रे, अध्यक्ष (स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार मंडळ म. राज्य) या सर्व मान्यवरांचा सदगुरु गहिनीनाथ महाराज औसेकर सह. अध्यक्ष, विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थान समिती, श्रीक्षेत्र पंढरपूर यांच्या शुभहस्ते शनिवार दि.४ जानेवारी रोजी उदगीर शहरातील विद्यावर्धिनी हायस्कुल येथे सायं. ५ वाजता जाहीर सत्कार आयोजित करण्यात आला आहे.



तरी या सत्कार सोहळयास आपण उदगीर व जळकोट तालुक्यातील नागरीकांनी उपस्थित राहुन मान्यवरांचा आनंद द्विगुणीत करावा, असे आवाहन नागरी सत्कार सोहळा समिती उदगीरच्या वतीने करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**औसा, दि.१ जानेवारी -**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय परिपत्रक यानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन करण्यात आले. अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांच्या हस्ते लाल फीत कापून ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व वाचकांना अभ्यासक्रमाशिवाय इतर पुस्तकाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्या रूपाली गिरी, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. माधुरी पोलकर, प्रा. शबनम शेख, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कांबळे, एस.एन. गायकवाड, शेबिर शेख आदी शिक्षक शिक्षकेतर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### महात्मा गांधी महाविद्यालयात वाचन संकल्प कार्यशाळा

**अहमदपूर, दि.१ जानेवारी -**

येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयात ग्रंथालय विभाग, भाषा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागमार्फत वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत वाचन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. त्यानिमित्त दि.१ जानेवारी रोजी ग्रंथ प्रदर्शन व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. याप्रसंगी विचार विकास मंडळाचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष एडवोकेट किशनरावजी बेंडकुळे, सहसचिव सुरेश देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.आर. शेळके उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड. बेंडकुळे यांनी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा कमीत कमी वापर करून पुस्तक वाचनाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. बौद्धिक ज्ञान वाढवण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे आरोग्यावर अनेक वाईट परिणाम होत आहेत. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. शेळके यांनी उपक्रमाची पार्श्वभूमी व हेतू स्पष्ट करून पुस्तक वाचनामुळे माणसाचे मस्तक सशक्त होते, असे प्रतिपादन केले. या कार्यशाळेला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर. डी. गुळवे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. अनिल कांबळे यांनी केले तर ग्रंथपाल डॉ.एस.आर. सुळसुळे यांनी आभार मानले.



### आर.सी. स्वामी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त गौरव सोहळा

**वलांडी, दि.१ जानेवारी -**

देवणी तालुक्यातील दवणहिप्परगा येथील रहिवाशी राचोटी चंद्रया स्वामी हे सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने त्यांना मुंबई येथील म्हाडाचे कार्यालय गृहनिर्माण भवन कलानगर बांद्रा पूर्व मुंबई येथे मंगळवारी सपत्नीक कुटुंबासह सत्कार करून निरोप देण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी म्हाडा कोकण मंडळाचे मुख्याधिकारी रेवती गायकर हे होते. मंचावर मुख्यअभियंता पंदीरकर, मुख्यअभियंता आडे, मुख्यअभियंता अंकलगी, कार्यकारी अभियंता भदाणे, लातूर येथील सेवालय संचालक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. रवी बापटले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुंबईचे उपाभियंता लातूरचे ओमप्रकाश पाटील, मुख्याध्यापक संजय विभुते, भारतीय वायुदलात जामनगर येथे कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता प्रशांत स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या वतीने आर.सी. स्वामी यांच्या २३.५० वर्ष कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी म्हाडा विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### सहकार मंत्र्यांच्या हस्ते पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**औसा, दि.१ जानेवारी -**

विद्यार्थ्यांची जडण घडण व्यवस्थितपणे करता यावी. यासाठी ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांना दैनंदिन परिपाठात उपयुक ठरणाऱ्या औसा तालुका शिक्षक पतसंस्थेच्या शैक्षणिक दिनदर्शिकेचे प्रकाशन महाराष्ट्राचे नवनियुक्त सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे, व्हा. चेअरमन हरिश आयतनबोने, चाकुर शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन शरद हुडगे, आदर्श शिक्षक प्रमोद हुडगे, संचालक महेश कांबळे, संजय रोडगे, दिपक डोंगरे,राजू जाधव, रविंद्र शिंदे, ज्ञानेश्वर तोडकरी उपस्थित होते.

## टाळ मृदंगाच्या गजरात आ. अभिमन्यू पवारांच्या पदयात्रेचे जंगी स्वागत

**जेसीबीच्या साह्याने फुलांचा वर्षाव; हजारोच्या जनसमुदाचा सहभाग... अर्चनाताई पाटील यांचा रॅलीत सहभाग...**





**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१ जानेवारी -**

राज्याच्या कल्याणासाठी महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर यावे आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्हावे. यासाठी औशाचे आमदार अभिमन्यू पवार यांनी तुळजापूरची आई तुळजाभवानीच्या चरणी नवस केला होता. तो नवस पुर्ण झाल्याने बुधवार दि.१ जानेवारी रोजी सकाळी औसा येथून कार्यकर्त्यांसह हजारो नागरिकांनी नवसपूर्ती पदयात्रेत सहभाग घेतला. टाळ, मृदंगाच्या गजरातील पदयात्रेचे ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. तर जेसीबी च्या साह्याने पदयात्रेवर गावकऱ्यांनी फुलांचा वर्षाव केला.

बुधवारी सकाळी ७ वाजता आ. अभिमन्यू पवार यांच्या औसा येथील निवासस्थानापासून पदयात्रा निघाली. पालखी रस्त्याने बोरफळ येथे पदयात्रा आल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने पदयात्रेचे स्वागत करण्यात आले. यानंतर शिवलीमोड व शिदांळा (लो) याठिकाणी महिलांनी आमदार अभिमन्यू पवार यांचे औक्षण करून पदयात्रेचे स्वागत केले. पदयात्रा बेलकुंड येथे आल्यानंतर पदयात्रेचे स्वागत जेसीबीच्या साह्याने फुलांचा वर्षांव करण्यात आला. तर टाळ मृदंगाच्या गजरात पदयात्रेचे स्वागत वारकरी संप्रदायाने केले. क्रेनच्या साह्याने हार उभा करून आमदार अभिमन्यू पवारांचे जंगी स्वागत करण्यात आले.

तावशीताड, काजळे चिंचोली, वांगजी व आशीव याठिकाणीही पदयात्रेचे जंगी स्वागत भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.

या पदयात्रेत आ. अभिमन्यू पवार यांनी टाळ मृदंगाच्या गजरात भजनी मंडळांसह वारकरी सांप्रदायातील ताल ठरला.

बुधवारी पदयात्रा औसा ते आशीव २२ किलोमीटरचे अंतर पार करीत आशीव येथे मुक्कामी सायंकाळच्या सुमारास थांबली. रात्री शिवशाहीर संतोष साळुंके यांचा शिवचरित्र पोवाडा व स्फूर्तीगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी सकाळी नवसपुर्ती पदयात्रा तुळजापूरच्या दिशेने निघणार आहे.

### सहकारमंत्री पाटील व अर्चनाताई पाटील चाकूरकरांनी सहभाग नोंदविला...

राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी बेलकुंड येथे पदयात्रेत सहभाग नोंदवित आमदार अभिमन्यू पवार यांना शुभेच्छा दिल्या. तर औसा येथून निघालेल्या पदयात्रेत भाजपच्या अर्चना पाटील-चाकूरकर या औसा शहरात सहभागी होत आमदार अभिमन्यू पवारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मोठय़ा संख्येने पदयात्रेत भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक सहभागी झाले होते.

## आरीमोड येथे सरपंच संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१ जानेवारी -**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील लोकनियुक्त सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती.त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच सर्व आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी सरपंच संघटनेच्या वतीने शिवसेनेचे तालुकाध्यक्ष तथा आनंदवाडी येथील सरपंच भागवत वंगे यांनी केली आहे.

यांना देवून शिरूर अनंतपाळ तालुका सरपंच संघटनेच्या वतीने आरी मोड येथे आज रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यात सहभागी शिवसेना तालुकाध्यक्ष भागवत वंगे, दिलीप पाटील, अनिल शिंदे, इंद्रजीत माने, शेख माजीद, अशोक बेलुरे, व्यंकट कल्ले, गिरीधर कल्ले, शेख नबीसाब, संजय बिराजदार, मदन सुर्यवंशी, प्रभाकर चामले, ज्ञानेश्वर पाटील, मुळजे बाळु, नारायण पवार, गोविंद श्रीमंगल, सरोजा गायकवाड, यासह शिरूर अनंतपाळ, थेरगाव, रापका, आरी, लक्कडजवळगा, शिवपुर, गणेशवाडी, कांबळगा, आनंदवाडी, तुरुकवाडी, भिंगोली, उमरदरा, कासलेवाडी, बेवणाळ, हालकी, कळमगाव व तालुक्यातील असंख्य जनसमुदाय उपस्थित होता.

## आत्मा अंतर्गत हरभरा टोकन शेती शाळेच्या तिसऱ्या वर्गाचे आंबेगाव येथे आयोजन




**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१ जानेवारी -**

तालुक्यातील अबेगाव येथे प्रकल्प संचालक कार्यालय आत्मा कार्यालय लातूर यांच्या वतीने एस.व्ही. लाडके आणि उपप्रकल्प संचालक आत्मा बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तालुका कृषी अधिकारी कृष्णा मुंडे व मंडळ कृषी अधिकारी अश्विनी पाटील देवणी यांच्या नियोजनाने आंबेगाव येथील प्रगतिशील हरभरा टोकन शेतकरी सचिन पाटील यांच्या प्रक्षेत्रावरती रब्बी हंगामातील हरभरा टोकन या विषयावर तिसऱ्या सत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

प्रसंगी ए.एस. इनसुरे यांनी शेतकऱ्यांनी हरभरा उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान अवलंबावे यामध्ये हरभरा टोकन, ऊस हरभरा आंतरपीक, सरी वरती हरभरा लागवड, इत्यादी माध्यमातून उत्पन्न वाढवावे आणि अशी विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या कृषी खात्याच्या योजनांचे सविस्तर सखोल मार्गदर्शन केले. आत्मा विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असलेल्या विविध पिकांवरती हंगामनिहाय शेती शाळा या शेतकऱ्यांसाठी ज्ञानाचे भांडार आहेत. कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र प्रगतिशील पुरस्कार प्राप्त शेतकरी व कर्मचाऱ्यांचे उत्कृष्ट ज्ञान या सर्वांचे सर्वोत्कृष्ट एकत्रित ज्ञान शेतकऱ्यांना त्यांच्या बांधावरती सुलभ प्रकारे उपलब्ध होते व त्या माध्यमातून शेतकरी तांत्रिक दृष्ट्या वेगवेगळ्या पिकांच्या बाबतीत शेतीपूरक व्यवसायाच्या बाबतीत तांत्रिक दृष्ट्या सक्षम होऊन उत्पन्न आणि उत्पादन वाढीकडे वाटचाल होण्यास सुलभ होते, असे प्रतिपादन केले.

तसेच हरभरा पिक सध्या ४५ ते ६० दिवसांचे असून पीक अवस्था ही कुठे फलोरा मध्ये असून काही ठिकाणी पाच ते दहा टक्के घाटा अवस्था आहे. अशा स्थितीमध्ये शेतकऱ्यांनी घडलेली नियोजन करणे महत्त्वाचे असून आंतरप्रवाही कीटकनाशक वाढीसाठी टॉनिक व एक बुरशीनाशक या संमिश्र औषधाची फवारणी करण्याची शिफारस केली.

याप्रसंगी गावचे उपसरपंच व्यंकटराव शिंदे, माया श्रीनामे, प्रगतिशील शेतकरी दत्ताजी काकनाळे, व शेतकरी गटातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अहमदपूर येथे रंगले बहारदार कवी संमेलन

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१ जानेवारी -**

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पुरोगामी साहित्य परिषद, संवाद ग्रुप, मिथुन चक्रवर्ती क्लब अहमदपूर यांच्यावतीने दारू सोडा दूध प्या हा संदेश समाजाला देण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवाजी देशमुख हे होते. तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चांदबा पाटील हे उपस्थित होते.

याप्रसंगी शिवाजीराव देशमुख यांनी असे सांगितले की, दारू ही वेभीचाराची जननी आहे. दारू पिणारा माणूस कोणतेही वाईट काम करायला मागे पुढे बघत नाही म्हणून दारू मुक्त समाज निर्माण होणे ही काळाची गरज आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रशेखर भालेराव यांनी केले. या कार्यक्रमानंतर अनंत काशीकर यांच्या अध्यक्षतेखाली बहारदार कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या कवी संमेलनामध्ये शाहीर सुभाष साबळे, बी.व्ही. मुंडे, अनंत काशीकर, गारपीट कार प्राध्यापक भगवान अमलापुरे, लोकशाही कार एन.डी. राठोड, डॉ. शादुल्ला पठाण यांनी आपल्या कविता सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. शाहीर सुभाष साबळे यांनी माणसा इथे मी तुझे गीत गावे या कवितेचे पहाडी आवाजात गायन केले. कवी बी व्ही मुंडे यांनी शब्दांनो ही कविता सादर केली तर अनंत काशीकर यांनी जुळणी ही कविता सादर करून प्रेक्षकांची दाद घेतली. संविधानाचा जागल्या ही कविता प्राध्यापक भगवान अमलापुरे यांनी सादर केली.

डॉ. शादूला पठाण यांनी सर्वधर्मसमभाव ही कविता सादर करून प्रेक्षकांकडून वाहवा मिळवली.

## रामलिंग मुदगड येथे सुश्राव्य संगीतमय शिवपुराण कथा व भव्य यात्रेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१ जानेवारी -**

तालुक्यातील रामलिंग मुदगड येथील श्री देवाजीबाबा धर्माधिकारी यांच्या ४७८ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे शुक्रवार दि.३ जानेवारी पासून दि.७ जानेवारीपर्यंत श्री गुरु परमहंस परिव्राजकचार्य श्री.श्री. हरिहरानंद भारती स्वामीजी धारुरकर यांचे भव्य सुश्राव्य संगीतमय शिव पुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. मंदीर जिर्णोध्दार व भुमी पुजन व कालिका प्राण प्रतिष्ठा, श्रींची पालखी मिरवणुक सोहळा पुरंत व धर्म सभा आदी धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. तर सोहळा शुक्रवार ३ पासून मंगळवार ७ पर्यंत दररोज रात्री ७ ते ९ श्री गुरु परमहंस परिव्राजकचार्य श्री.श्री. हरिहरानंद भारती स्वामीजी धारुरकर यांचे शिवपुराण कथा होणार आहे. तरी परिसरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवाजीबाबा धर्माधिकारी संजीवन समाधी मंदिर समिती वतीने करण्यात आले आहे.

## निलंग्यात इज्तेमासाठी मुस्लिम बांधवाची गर्दी; अनेकांन मान्यवरांनी दिल्या भेटी



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१ जानेवारी -**

आजच्या धकाधकीच्या युगात माणसातील माणुसकी, प्रेम, बंधुभाव लोप पावत आहे. प्रत्येकाने प्रेम व माणुसकी जोपासणे आवश्यक असून, विश्वशांतीची गरज आहे. मानव कल्याणासह विश्वशांती, राष्ट्रीय एकात्मता आणि भाईचाऱ्यांचा संदेश देण्याबरोबर कुरआनच्या शिकवणीचा प्रसार व्हावा यासाठी सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. पवित्र कुराण जीवन जगण्यासाठी असून पवित्र ग्रंथ कुराण हे फक्त मुसलमानांसाठी नव्हे तर संपूर्ण मानवजाती आहे. इस्लाम धर्म हे भाईचारा व शांतीचा संदेश देणारे असून इस्लाम धर्माच्या अनुयायीनी शेवटचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांनी सांगितल्याप्रमाणे आपले आचरणात आणून त्याचे पालन करावे, असे आव्हान निलंगा येथे आयोजित इज्तेमात दुसऱ्या दिवशी जोहर, असर व मगरीबच्या नमाज नंतरच्या बायन प्रवचनमध्ये करण्यात आले.

मंगळवारी दुवाच्या वेळेपर्यंत अधिक जिल्ह्यातील समाजबांधवांनी उपस्थिती लावली. निलंगा शहरापासून इज्तेमास्थळापर्यंत जागोजागी स्वयंसेवक उभे आहेत. प्रत्येक वाहनधारकांना मार्ग दाखविण्याचे काम करीत सावकाश जाण्याचा सल्ला देणारे तरुण प्रेम आणि आपुलकी दाखवित होते. इज्तेमास्थळी दोन ठिकाणी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने वाहनांची पार्किंग करण्यात आली आहे. शिवाय, उपस्थित बांधवांना अत्यंत माफत दरात दर्जेदार जेवणाची व्यवस्थाही करण्यात आली होती.

शिवाय, इज्तेमास्थळी घेऊन जाण्यासाठी निलंगा शहरातील बसस्थानक, उदगीर मोडपासून मोफत सोय करण्यात आली आहे. सोमवारी सकाळपासून इस्लामचे अभ्यासक, धर्मगुरू कुरआन, हदीसवर बयाण (प्रवचन) करीत होते.

### दवाखाना, रुग्णवाहिकेची सोय...

इज्तेमास्थळी दोन दवाखने सुरू करण्यात आला होती. शिवाय, रुग्णवाहिकांची व्यवस्था केली आहे. याठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरही सेवा देत होते. हजारो नागरिक उपस्थित असतानाही कोणालाही त्रास होणार नाही, यासाठी शेकडो स्वयंसेवक काळजी घेण्याचे काम केले.

### मिठाई, कपडे, अत्तरांचा सुगंध...

इज्तमास्थळी विविध प्रकारच्या खजूर, मिठाई, उबदार कपड्यांची अनेक दुकाने लावण्यात आली आहेत. शिवाय, अत्तर, सुरमा, टोपी, मिस्वाकचीही दुकाने थाटली होती.

### मान्यवरांनी दिल्या भेटी...

राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, प्रदेश काँग्रेस सचिव अभय साळुंके राष्ट्रवादी, युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, आदींनी भेटी दिल्या.